कौशल्याने कीर्ती उपजीविकेच्या संधी
त्याविन संपत्ती आता मीळेचीना ।

बदलते हे जग बदल जीवनाचा भाग
काळासवे लगबग करावी ती।

आंतरजालाचे जाळे दावी विकास सोहळे
कृत्रिम बुद्धिमत्तेचे नि बळे जग प्रगती पावे।

तंत्रज्ञानाचे नि मिसे मुक्त साहित्य सौरसे,
करती कार्य विशेषे प्रसारमाध्यमे ही ।

आले विश्वाचे ज्ञान हाती श्रमे साध्य साधिती
मुले आविष्कारीती भविष्य आपले

# माणसातील हरवत चाललेली माणुसकी

**पायल कैलास जावळे**
एम.ए. प्रथम वर्ष

सिमेंटच्या या जंगलात आता
माणूस शोधूनही सापडत नाही
हातामध्ये हात आहेत पण;
हृदयाला हृदय भिडत नाही

ग्लोबल झाले सारे जग आता
आसपास काय घडत हे ठाऊक नसतं
समोर माणूस रडत असला तरी
लक्ष मात्र मोबाईलच्या स्क्रीनवर असतं

अपघाताच्या वळणावर जेव्हा
कोणी रक्ताच्या थारोळ्यात पडतं
मदतीचा हात देण्याऐवजी
कॅमेराचा शूटिंग मात्र जोरात घडतं
गरज नाही की मदत मोठीच असावी
फक्त संकटाच्या वेळी ती पाठीशी असावी

नाती आता काचेसारखी झाली
कधी तडा जाईल सांगता येत नाही
स्वतःच्या या बाजारात आज
निस्वार्थी प्रेम कोठे शोधूनही सापडत नाही

अहो-जनावरांनाही येते माया
पण माणूस मात्र पाषाण होतोय
हरवलीय ना त्यातील ती ऊब

वर्चुअल जगात मात्र ही पिढी आहे खुष
फेसबुक इन्स्टाच्या दुनियेत ही पिढी दंग आहे
लाइक्स आणि कमेंट्स मध्ये लपलेला खरा रंग आहे
दिसते वरून सुखी पण मनात विचाराचे काहूर आहे
स्पर्धेच्या या युगात आणि प्रगतीच्या या शर्यतीत
माणूस स्वतःपासून दुरावला आहे
स्वतःची माणुसकी तो हरवला आहे

श्रीमंती असून उपयोग नाही जर हात मदतीचा नसेल
माणूस म्हणून जगण्याचा अर्थ नाही
जर काळजात ओलावा नसेल
वेळ आली आता पुन्हा माणसाने माणूस होण्याची
गरज आहे आज जगाला
फक्त आणि फक्त माणुसकीची

माणुसकी हरवत चालली आहे या मागचं कारण नेमकं काय असेल तर आजच्या काळातील सर्वात मोठे वास्तव आणि चिंतेची बाब आहे. समाजातील बदलत्या मानसिकतेमागे कोणतीही एकच गोष्ट नाही तर अनेक सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक कारणाचा यात समावेश आहे. आजच्या काळात माणसाचे जीवन 'मी' आणि 'माझे' इथपर्यंत मर्यादित झाले आहे. भौतिक प्रगती आणि यश मिळवण्याच्या शर्यतीत माणूस इतरांच्या संवेदनाकडे दुर्लक्ष करू



लागला आहे. स्वतःचे हित जपताना दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती कमी होत चालली आहे. डिजिटल क्रांतीमुळे जग जवळ आले पण, माणसे एकमेकापांसून लांब गेली आहेत.

लाईक आणि कमेंट्स मिळवण्यात आपण इतके मग्न होतो की शेजारी बसलेल्या माणसाच्या भावनांकडे दुर्लक्ष होते. समोरच्या व्यक्तीच्या दुःखापेक्षा आपल्या पोस्टला मिळणारा रिस्पॉन्स महत्त्वाचा वाटू लागला आहे. माणसांकडे दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याचा संयम उरलेला नाही. धावपळीच्या आयुष्यात आपण दुसऱ्याला समजून घेण्यासाठी वेळ द्यायला तयार नाही आहोत.

सोशल मीडियावर आपण आपले आयुष्य 'आदर्श' दाखवण्याचा प्रयत्न करतो. या स्पर्धेतून तुलना वाढली आहे. आपण दुसऱ्याला सुखात आनंद मानण्याऐवजी त्यांच्या आयुष्याशी स्वतःची तुलना करून 'असुरक्षित' आणि 'असमाधानी' होत आहोत त्यामुळे माणसांमधील जिव्हाळा कमी होत आहे. आजच्या धावपळीच्या युगात तंत्रज्ञानाच्या अतिवापरात आणि स्वतःच्या गरजांच्या मागे धावताना कुठेतरी माणुसकी मागे पडते असे नक्कीच वाटते.

माणुसकी ही एखाद्या दिव्यासारखी असते ती वीझली आहे असे वाटले, तर एका छोट्याशा प्रेमाच्या कृतीने पुन्हा तेजू शकते.

माणुसकी टिकवण्यासाठी काय करता येईलः

डिजिटल दिवसातला काही वेळ सर्व उपकरणांपासून दूर राहा, आणि प्रत्यक्ष मानवी संवादाला वेळ द्या.

कोणाशीही बोलताना फोन बाजूला ठेवा आणि पूर्ण लक्ष देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घ्या.

केवळ सोशल मीडियावर कमेंट करण्याऐवजी गरजू व्यक्तीला प्रत्यक्ष मदत करा .माणुसकी डिजिटल पोस्टमध्ये नसून आपल्या कृतीत असते .

तंत्रज्ञान हे एक साधन आहे साध्य नाही डिजिटल होणे म्हणजे 'माणूस' असणे विसरणे नव्हे .आपण तंत्रज्ञानाचा वापर संवाद वाढवण्यासाठी केला पाहिजे, तो संपवण्यासाठी नाही. माणुसकी हरवलेली नाही, ती फक्त गर्दीत आणि स्क्रीनच्या मागे कुठेतरी दबली गेली आहे. तिला पुन्हा जागृत करण्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा 'माणसांकडे' वळण्याची गरज आहे.

# नाती आणि बदलते जीवन

**अनुराधा दिगंबर जंगबाड**
बी. ए. प्रथम वर्ष

आजच्या काळात मानवाचे जीवन हे खूप बदलत जात आहे. या बदलत्या डिजिटल युगात मानव हा खूप गुंतागुंतीचे जीवन जगत आहे. आता सध्याच्या परिस्थितीत मानव हा स्वतःसाठीच काही वेळ काढू शकत नाही. कारण आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे मनोरंजनाचे साधन नसून उत्पन्नाची एक मोठी संधी आहे. त्यामध्ये मानव हा फार गुंतलेला आहे. लहानपनापासून ते मोठ्यापर्यंत सगळेजण इंटरनेटमध्ये गुंतले गेले आहेत. मोबाईल हा सगळ्यासाठी उपयुक्त ठरला आहे. जणू काही हा मित्र बनला आहे. आता मोबाईल हाच आपला सगळं काही आहे असे झाले आहे. यामुळे मानव हा आपली नाती सुद्धा विसरत आहे. मानवाचे राहणीमान, पोशाख, अन्न हे सुद्धा या डिजिटल युगात बदलत गेले आहे. या काळात नातेसंबंधात विश्वास, सहनशीलता आणि एकमेकांना आधार देणे, एकमेकांना स्वीकारणे हे काही राहिलेच नाही.

आता फक्त आणि फक्त मानवाचे जीवन हे धावत्या रेल्वे मागे पळणे असे झाले आहे. पूर्वीच्या काळी मानव हा कुटुंब पद्धतीमुळे नाती घट्ट होती आणि सर्वजण घरामध्ये मिसळून रहात होते. पण आता हे नाही आता सध्याचे जीवन हे वेगवान आणि यांत्रिक पद्धतीचे झाले आहे. जसे की 'हम दो हमारे दो' असे झाले आहे. त्यामुळे नात्यांची किंमत सुद्धा राहिली नाही. आता सगळं काही मोबाईल वरून अगदी सोपं झालेलं आहे. हे पुढील कवितेवरून समजून जाईल.

धावपळीच्या या युगात, सुटली हातातून नाती,
मोबाईलच्या स्क्रीनवर, हरवली साधी संवादाची रीत
हसरे चेहरे प्रोफाईलवर, काळजात दाटली उदासी,
या दगदगीच्या दुनियेत जगताना,
माणूस झालाय प्रवासी

सुखदुःखाची चर्चा आता, व्हाट्सअप ग्रुप वर होते,
जवळचे जवळ असूनही, कित्येक कोसावर राहते.
आपुलकीच्या रक्तापेक्षा, 'लाइक्स' ला जास्त किंमत,
बदलत्या या बाजारात, प्रेमाची झालीये घुसमट.

एकेकाळी होते घर, गजबजलेले माणसांनी,
आता मुक्त झाली घरे, राहिल्या फक्त आठवणी,
संयम सुटलाय मनातून, अपेक्षाचे ओझे वाढले,
नात्यांच्या गाठी सोडवता, मन मोकळे झाले.

बदला हा आता नियम, मान्य किती करावे लागेल,
पण माणसाने माणसाशी, माणुसकीने वागावे लागेल,
मशीन बनू नको मित्रा, थोडा ओलावा जपून ठेव,
बदलत्या या काळातही, नात्यांची जाणीव ठेव.

# तंत्रज्ञान आणि साहित्य

**वैभवी श्रीहरी इंगळे**
बी. ए. प्रथम वर्ष

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान आणि साहित्य यांचे नाते अधिक घट्ट झाले आहे. तंत्रज्ञान म्हणजे नवीन साधने यंत्रे आणि माहिती तंत्राच्या मदतीने कामे अधिक सोपी व जलद करण्याची पद्धत. साहित्य म्हणजे मानवी भावना, विचार, अनुभव आणि कल्पना याची अभिव्यक्ती. या दोन्ही क्षेत्रांनी समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

पूर्वी साहित्य लिहिणे, जतन करणे, आणि लोकांपर्यंत पोहोचवणे हे खूप कठीण काम होते. लोकांना हस्तलिखित तयार करावे लागत आणि ती मर्यादित लोकांपर्यंत पोहोचत. परंतु तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संगणक इंटरनेट आणि ई-पुस्तिकांच्या माध्यमातून साहित्य सहजपणे लिहिता, जतन करता, आणि जगातील वाचकापर्यंत पोहोचवता येते. आज अनेक लेखक ब्लॉग, वेबसाईट, आणि सामाजिक माध्यमांच्या सहाय्याने आपले लेखन प्रकाशित करतात.

तंत्रज्ञानामुळे वाचनाची पद्धत ही बदलली आहे. मोबाईल, टॅबलेट आणि इ-रिडरमुळे लोक कुठेही आणि कधीही पुस्तके वाचू शकतात. तसेच ऑडिओ बुकमुळे ऐकून साहित्याचा आनंद घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे साहित्य अधिक लोकांपर्यंत पोहोचत आहे.

तथापि तंत्रज्ञानाचा अतिवापर कधी कधी पारंपारिक वाचनाची सवय कमी करू शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य आणि संतुलित वापर करणे आवश्यक आहे. एकूणच तंत्रज्ञान आणि साहित्य हे एकमेकांना पूरक आहेत. तंत्रज्ञानामुळे साहित्याचा प्रसार अधिक वेगाने आणि व्यापक प्रमाणात होत आहे. तर साहित्य मानवी विचारांना दिशा देत समाज अधिक संवेदनशील आणि समृद्ध बनवते. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रांचा समतोल विकास समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो तर तंत्रज्ञान हे प्रगतीचे साधन आहे. पूर्वी साहित्य आणि तंत्रज्ञान हे दोन भिन्न प्रवाह मानले जात असत. परंतु आजच्या आधुनिक युगात या दोन्ही क्षेत्रांचा संगम झाला आहे. या संगमाने साहित्याची निर्मिती, प्रसार आणि वाचन संस्कृतीमध्ये क्रांती घडवून आणली आहे.

तसेच तंत्रज्ञानामुळे नवोदित लेखकासांठी



प्रकाशनाचे मार्ग सुलभ झाले आहेत. आता प्रकाशकांकडे चकरा मारण्याची गरज उरली नाही. ब्लॉग्स, सोशल मीडिया आणि स्वयंप्रकाशन प्लॅटफॉर्म मुळे लेखक थेट वाचकांशी जोडू शकतात. फेसबुक इंस्टाग्राम यासारख्या माध्यमावर कविता, लघुकथांना मिळणारी पसंती ही तंत्रज्ञानाची देणगी आहे.

तंत्रज्ञानामुळे श्राव्य साहित्याचा उदय झालेला आहे. ज्या लोकांना साहित्य वाचायला वेळ मिळत नाही त्यांच्यासाठी ऑडिओ बुक्स हा एक उत्तम पर्याय ठरत आहे. प्रवासात किंवा काम करताना आपण थोर लेखकांचे विचार ऐकू शकतो त्यामुळे साहित्याची पोहोच केवळ साक्षर किंवा वाचकापुरतीच मर्यादित न राहता ती व्यापक झाली आहे.

तंत्रज्ञानातला सर्वात मोठा बदल म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आज चॅट- जीपीटी सारखी साधने लेखकांना कल्पना सुचवण्यासाठी, मजकुरांची भाषांतर करण्यासाठी आणि व्याकरण दुरुस्त करण्यासाठी मदत करत आहे. यामुळे साहित्याची निर्मिती जलद झाली आहे. तंत्रज्ञानातील 'मशीन ट्रान्सलेशन' मुळे एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत रूपांतरित करणे सोपे झाले आहे. त्यामुळे साहित्यातील विचारांची देवाण-घेवाण वेगाने होत आहे. जो या संगमाचा मोठा फायदा आहे. मात्र यंत्राकडे माहिती असली तरी, मानवी संवेदना आणि भावनांची खोली केवळ मानवी लेखकच साहित्यात उतरवू शकतो.

तसेच तंत्रज्ञानाचा आणखी एक फायदा म्हणजे आज लेखक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपल्या वाचकांशी थेट संवाद साधू शकतात, वाचकांच्या प्रतिक्रिया त्वरित मिळाल्यामुळे लेखकाला आपल्या लेखनात सुधारणा करण्यास किंवा वाचकांच्या आवडीनुसार लिहिण्यास मदत होते.

तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृती लोप पावत नसून ती विस्तारत आहे. स्क्रीनवरील वाचनामुळे एकाग्रतेची आव्हाने असली तरी तंत्रज्ञानाने साहित्याला ग्लोबल केले आहे तंत्रज्ञान हे आधुनिक लेखणीचे रूप आहे. ज्याचा वापर करून आपण साहित्याचा वारसा अधिक समृद्ध करू शकतो.

साहित्य आणि तंत्रज्ञानाचे नाते याबद्दल सांगताना चार ओळी सांगाव्याशा वाटतात त्या पुढील प्रमाणे;

"साहित्य जेव्हा शब्दांच्या चौकटी ओलांडून
तंत्रज्ञानाच्या वेगाशी नाते जोडते, तेव्हा
विचारांची एक नवी क्रांती जन्म घेते.
कालपर्यंत लेखणीने कागदावर उमटणारे
शब्द आज कीबोर्डच्या माध्यमातून डिजिटल
पडद्यावर आपली मोहर उमटवत आहेत."

आपला समृद्ध साहित्यिक वारसा, जुनी दुर्मिळ पुस्तके आणि मोडी लिपीतील कागदपत्रे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डिजिटलाईज करून पुढील पिढ्यांसाठी जतन केली जात आहेत.



# सामाजिक माध्यमे आणि रोजगाराच्या संधी

**दिव्या धोंडीराम मगर**
एम.ए. द्वितीय वर्ष

आजच्या आधुनिक युगात सामाजिक माध्यमांचे महत्त्व खूप वाढले आहे. इंटरनेटच्या प्रसारामुळे जग जवळ आले आहे आणि माहितीचे आदान प्रदान करणे खूप सोपे झाले आहे. पूर्वी सामाजिक माध्यमे केवळ मित्रपरिवाराशी संवाद साधण्यासाठी वापरली जात होती, परंतु आज ती रोजगाराच्या संधी निर्माण करणारे प्रभावी साधन बनली आहेत. अनेक तरुण आज सामाजिक माध्यमांचा वापर करून स्वतःचे करिअर घडवत आहेत. विविध कंपन्या आपल्या उत्पादनांची जाहिरात आणि ग्राहकांची संपर्क साधण्यासाठी सामाजिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे सोशल मीडिया मॅनेजर, कन्टेन्ट क्रिएटर, डिजिटल मार्केटिंग तज्ञ अशा अनेक नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. काही लोक व्हिडिओ तयार करून, लेखन करून किंवा फोटो शेअर करूनही उत्पन्न मिळवत आहेत. त्यामुळे घरबसल्या काम करण्याची संधीही उपलब्ध झाली आहे. सामाजिक माध्यमामुळे स्वतःच छोटा व्यवसाय सुरू करणे ही सोपे झाले आहे. अनेक लोक आपल्या वस्तू आणि सेवा सामाजिक माध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यामुळे उद्योजकतेला चालना मिळत आहे आणि बेरोजगारी कमी करण्यास मदत होत आहे.



तथापि सामाजिक माध्यमांचा वापर करताना जबाबदारीने व सजगतेने वागणे आवश्यक आहे. चुकीची माहिती पसरवणे वेळेचा अपव्यय करणे किंवा अति वापर करणे टाळले पाहिजे. योग्य कौशल्य आणि आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक माध्यमांचा उपयोग केला तर ते रोजगार आणि प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन ठरू शकते. म्हणूनच सामाजिक माध्यमांचा सुज्ञपणे आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास तरुणासाठी उज्वल भविष्य आणि अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

कंपन्याचे सोशल मीडिया खाते सांभाळणे, पोस्ट तयार करणे , ग्राहकांशी संवाद साधने हे काम सोशल मीडिया मॅनेजर करतो. व्हिडिओ ब्लॉग फोटो किंवा माहितीपूर्ण पोस्ट तयार करून लोकांपर्यंत पोहोचवणे अनेक लोक युट्युब किंवा instagram वरून उत्पन्न कमवतात.

कंपन्यांच्या उत्पादनांची जाहिरात सामाजिक माध्यमांवर करणे यामध्येSEO, जाहिरात मोहीम आणि ग्राहकांपर्यंत पोहोचणे यांचा समावेश होतो. लेखन, ग्राफिक्स डिझाईन, व्हिडिओ एडिटिंग, फोटो एडिटिंग अशी अनेक कामे सामाजिक माध्यमांमुळे घरबसल्या मिळू शकतात. सामाजिक माध्यमांचा वापर करून कपडे, हस्तकला ,खाद्यपदार्थ इत्यादी वस्तूंची विक्री करता येते.

आजच्या आधुनिक युगात सामाजिक माध्यमांचा प्रभाव अधिक प्रमाणात वाढला आहे. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे समाजातील प्रत्येक व्यक्ती काही ना काही सामाजिक माध्यमांचा वापर करत आहे. आज अनेक कंपन्या आपल्या नोकरीच्या जाहिराती सामाजिक माध्यमांवर प्रसिद्ध करतात. त्यामुळे उमेदवारांना वेगवेगळ्या कंपन्या मधील नोकरीच्या संधीबद्दल त्वरित माहिती मिळते. सामाजिक माध्यमांमुळे छोटी मोठी उद्योग आणि व्यवसाय यांना खूप फायदा झाला आहे. व्यापारी आपली उत्पादने आणि सेवा सामाजिक माध्यमावर जाहिरात करून अधिक ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे व्यवसाय वाढतो आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झालेल्या दिसून येतात. सामाजिक माध्यमांवर अनेक शैक्षणिक पेजेस, व्हिडिओ आणि ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध असतात. त्यामुळे युवकांना नवीन कौशल्य शिकण्याची संधी मिळते. ही कौशल्य भविष्यात रोजगार मिळवण्यासाठी उपयुक्त ठरतात. सामाजिक माध्यमांद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ उद्योगपती आणि कंपन्याशी संपर्क साधने सोपे झाले आहे.

भारतात 100 कोटी पेक्षा अधिक लोक मोबाईल वापरतात शेत मजुरापासून उद्योगपतीपर्यंत प्रत्येक जण मोबाईलचा वापर करतो आहे. याचा मोठा प्रभाव समाज जीवनावर पडला असून त्यामुळे नवनवीन क्षेत्रे विकसित झाली आहेत. त्यात समाज माध्यमे, डिजिटल माध्यमे, ऑनलाईन माध्यमे यांचा प्रामुख्याने समावेश करता येतो. या नव्या  क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधीही वाढल्या आहेत. एखाद्या विचाराचे, कार्याचे समर्थन करण्यासाठी, समाजाचा पाठिंबा मिळविण्यासाठी केल्या जाणाऱ्या कामगिरीला मीडिया एडवोकसी असे म्हटले जाते. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांमध्येही नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. सामाजिक माध्यमांमुळे लोकांना त्यांच्या कौशल्यांचा उपयोग करून पैसे कमवण्याची संधी मिळते. एखाद्याला फोटोग्राफी, लेखन किंवा डिझाईनिंगची आवड असेल तर तो त्याच्या कामाचे प्रदर्शन सामाजिक माध्यमांवर करू शकतो आणि त्यातून रोजगार मिळवू शकतो. सामाजिक माध्यमांचा वापर करताना सावधगिरी पाळणे आवश्यक आहे. चुकीची माहिती, वेळेचा अपव्यय आणि व्यसन यासारख्या समस्या टाळणे गरजेचे आहे. योग्य आणि सकारात्मक वापर केल्यास सामाजिक माध्यमे रोजगारासाठी मोठे व्यासपीठ ठरू शकतात.

योग्य कौशल्य, मेहनत आणि योग्य वापर केल्यास सामाजिक माध्यमांमुळे अनेक युवकांना उज्वल भविष्य घडवण्याची संधी मिळू शकते.

# Gen-Z व डिजिटल कौशल्य

**श्रद्धा राजेंद्र सरवदे**
एम.ए. द्वितीय वर्ष




आजचा काळ हा पूर्णपणे डिजिटल तंत्रज्ञानाचा आहे. मोबाईल, संगणक आणि इंटरनेट यामुळे आपले जीवन खूप सोपे झाले आहे. या डिजिटल युगात वाढलेली पिढी म्हणजे Gen-Z होय. साधारणपणे 1997 नंतर जन्मलेली पिढी Gen-Z म्हणून ओळखली जाते. ही पिढी लहानपणापासूनच मोबाईल आणि इंटरनेट वापरत असल्यामुळे डिजिटल तंत्रज्ञानात खूप पुढे आहे.

Gen-Z पिढीला नवीन ॲप्स, वेबसाईट आणि सोशल मीडियाचा वापर करणे खूप सोपे वाटते. शिक्षणासाठी ऑनलाईन क्लासेस, माहिती शोधण्यासाठी गुगल, मित्रांशी संपर्क ठेवण्यासाठी सोशल मीडिया अशा अनेक गोष्टींसाठी ते डिजिटल साधनांचा वापर करतात. त्यामुळे त्यांची डिजिटल कौशल्य खूप चांगले विकसित झाले आहे.

आज अनेक तरुण डिजिटल

माध्यमातून स्वतःचे करिअर घडवत आहेत. युट्युब, इंस्टाग्राम, ब्लॉगिंग, डिजिटल मार्केटिंग यासारख्या क्षेत्रामंध्ये Gen-Z पिढी मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. काही तरुण ऑनलाईन व्यवसाय सुरू करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. त्यामुळे डिजिटल कौशल्य हे आजच्या काळात खूप महत्त्वाचे बनले आहे.

तरीसुद्धा डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करताना काळजी घेणे ही तितकेच आवश्यक आहे. इंटरनेटचा अतिवापर, चुकीची माहिती आणि सायबर गुन्हे यापासून सावध राहणे गरजेचे आहे. योग्य पद्धतीने आणि मर्यादित डिजिटल साधनांचा वापर केल्यास ते आपल्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते.

शेवटी असे म्हणता येईल की Gen -Z ही डिजिटल कौशल्यात प्रगत आणि हुशार पिढी आहे. योग्य दिशेने या कौशल्याचा वापर केला तर ही पिढी भविष्यात देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देऊ शकते.

आजच्या काळात सोशल मीडियाचा Gen-Z पिढीवर मोठा प्रभाव दिसून येतो. विविध सोशल मीडिया ॲप्सच्या माध्यमातून ही पिढी जगाशी जोडलेली आहे. उदाहरणार्थ फेसबुक या ॲपच्या माध्यमातून लोक एकमेकांशी संपर्क साधतात माहिती शेअर करतात आणि विविध ग्रुपमध्ये सहभागी होतात. अनेक विद्यार्थी फेसबुक वर शैक्षणिक ग्रुप तयार करून त्यामध्ये अभ्यासाशी संबंधित माहिती आणि नोट्स शेअर करतात. डिजिटल माध्यमातून शिक्षण घेणे अधिक सोपे झाले आहे.

तसेच इंस्टाग्राम हे ॲप Gen-Z पीडित खूप लोकप्रिय आहे. या ॲपवर फोटो, व्हिडिओ आणि रीलच्या माध्यमातून तरुण आपली कला आणि सर्जनशीलता व्यक्त करतात. काही जण इंस्टाग्राम च्या माध्यमातून फोटोग्राफी, फॅशन, मेकअप, कुकिंग किंवा इतर कौशल्य लोकापर्यंत पोहोचवतात. त्यामुळे त्यांना नवीन संधी मिळतात आणि आत्मविश्वास वाढतो.

Whatsapp हे ॲप दैनंदिन संवादासाठी खूप उपयुक्त आहे. मित्र, कुटुंब आणि शिक्षकांसाठी संपर्क ठेवण्यासाठी व्हाट्सअपचा वापर केला जातो. विद्यार्थी अभ्यासाचे ग्रुप तयार करून त्यामध्ये नोट्स, पीडीएफ, आणि महत्त्वाची माहिती शेअर करतात. त्यामुळे माहितीची देवाणघेवाण खूप जलद आणि सोपी होते.

टेलीग्राम हे ॲपही माहिती मिळवण्यासाठी आणि शेअर करण्यासाठी खूप उपयुक्त आहे. अनेक शैक्षणिक चॅनेल्स आणि ग्रुप टेलिग्राम वर उपलब्ध असतात त्यामुळे विद्यार्थी अभ्यास, साहित्य, ई-बुक्स आणि स्पर्धा परीक्षांची माहिती सहज मिळवू शकतात. यामुळे डिजिटल शिक्षणाला खूप मोठी मदत होते.

ट्विटर या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लोक आपले विचार आणि मते व्यक्त करतात. देश विदेशातील घडामोडी, बातम्या आणि सामाजिक विषयाबंद्दल माहिती ट्विटरवर मिळते. त्यामुळे Gen-Z पिढीला समाजातील विविध घडामोडी समजण्यास मदत होते.

युट्युब हे ॲप शिक्षणासाठी आणि मनोरंजनासाठी खूप महत्त्वाचे ठरले आहे. अनेक विद्यार्थी युट्युब वर अभ्यासाचे व्हिडिओ, मार्गदर्शन आणि नवीन कौशल्य शिकतात. काही तरुण स्वतःचे यूट्यूब चैनल तयार करून व्हिडिओ बनवतात आणि डिजिटल माध्यमातून आपले करियर ही घडवतात.

स्नॅपचॅट या आजच्या माध्यमातून तरुण मित्रांची फोटो आणि व्हिडिओ शेअर करतात. विविध फिल्टर्स आणि इफेक्ट्स मुळे हे ॲप तरुणामंध्ये खूप लोकप्रिय आहे. या माध्यमातून ते मनोरंजनही करतात आणि मित्रांची संवादही ठेवतात.

विविध सोशल मीडिया ॲपच्या माध्यमातून Gen-z पिढीची डिजिटल कौशल्य अधिक विकसित होत आहे. योग्य पद्धतीने आणि मर्यादित ॲपचा वापर केल्यास शिक्षण, माहिती आणि करिअरच्या दृष्टीने अनेक संधी निर्माण होऊ शकतात.

# कौशल्य - यशाचा खरा मार्ग

**मयुरी हणमंत भंडगे**
बी. ए. (ॲनिमेशन) प्रथम वर्ष

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जगात फक्त शिक्षण पुरेसे नसते, तर त्यासोबत कौशल्य असणे ही तितकेच महत्त्वाचे असते. कौशल्य म्हणजे एखादे काम योग्य पद्धतीने, आत्मविश्वासाने आणि परिणामकारक रीतीने करण्याची क्षमता. शिक्षण आपल्याला ज्ञान देते, पण कौशल्य त्या ज्ञानाचा योग्य वापर कसा करायचा हे शिकवते.

प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीना काही विशेष कौशल्य दडलेले असते. कोणाला चांगले बोलता येत, कोणाला सुंदर चित्र काढता येते, तर काही जण तंत्रज्ञान कामामंध्ये निपुण असतात. या कौशल्यांचा शोध घेऊन यांचा सातत्याने सराव केल्यास व्यक्ती आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावी बनवू शकतो.

आज भारतातही कौशल्याधारीत शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जात आहे. कारण कौशल्य असलेली व्यक्ती केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर समाजाच्या आणि देशाच्या प्रगतीतही मोठा वाटा उचलते.

म्हणूनच प्रत्येकाने शिक्षणाबरोबरच विविध कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. ज्ञान आणि कौशल्य यांचा संगम झाला तरच खरे यश मिळते. त्यामुळे असे म्हणता येईल की "कौशल्य हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे".

शिक्षणासोबत कला पारंगत असणे महत्त्वाचे आहे आजच्या युगात शिक्षणाबरोबर कला असणे अत्यंत आवश्यक आहे.

पत्रकार, संपादक, साहित्यिक, पटकथा लेखक, चित्रकार, शिल्पकार, वक्ता, शाहीर, गायक, ढोलकी वादक, नृत्यांगना, आदींनी क्षेत्रात अनेक तपश्चर्या करून आपले कौशल आत्मसात केलेले असते, त्यामुळे त्या व्यक्ती त्यांच्या जीवनामध्ये यशस्वी झालेल्या दिसतात. कोणतेही काम शांतचित्ताने व मन लावून कौशल्यपूर्णरित्या लेखन केल्यास यश मिळते, याचाच अर्थ मानवी जीवन यशस्वी करण्यासाठी कौशल्य महत्त्वाचे ठरते.

डॉ. दत्तात्रय गंधारे म्हणतात, "कोणत्याही शास्त्राचे, कलेचे किंवा हस्तकलेचे सादरीकरण व व्यावहारिक जीवनात उपयोजन करण्याची क्षमता म्हणजे कौशल्य".

**लेखन कौशल्य आणि करिअर :**

आपल्या जीवनात लेखन कौशल्य कसे महत्त्वाचे आहे. हे आपण पाहिले. आज मराठी भाषेचे पदवीधर, नेट, सेट, पी.एच.डी धारक यांना बेकारीच्या झळा सोसाव्या लागत आहेत. या मराठीच्या पदवी धारकांना लेखन कौशल्यांनी संधी ओळखून योग्यरीत्या उपयोजन केल्यास त्यांना चांगल्या संधी मिळविता येतात.

कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र,

चरित्र इत्यादींचे साहित्याच्या प्रांतात उत्तम करिअर करणारी नावे अनेक आहेत.

कला ही एक सुंदर अशी गोष्ट आहे, जी आपल्या आयुष्याला एक रंग देऊन जाते. नवीन रित्या आपल्यात सामावून जाते. उत्साह, उमंग, आतुरता, प्रभावीपणा, आपुलकी, चाहूल आणि आनंद याचा मेल यांचा संगम म्हणजे 'कला'.

ती कला आत्मसात करून त्यात सामावून जाणे त्यालाच कौशल्य असे म्हणतात जे की खूप पूर्वीपासून प्रकृतीत झालेली आहे.

ती कला आणि कौशल्य आता आसमंताला ही स्पर्श करत आहे. कौशल्याच्या अनेक पद्धती ,अनेक विविधता, आहेत ज्यापूर्वी आणि आत्ताच्या युगातही कार्य करतच आहे. काही मध्ये बदल झाला पण काही कौशल्य आणि कला अजूनही तशाच पारंगत आहेत.

एका कोऱ्या कागदावर जसे रंग भरून त्या कागदाची शोभा वाढवली जाते तसेच आयुष्यातील अनेक गोष्टीत कला, आणि कौशल्याचे रंग भरले की आयुष्याचे पानही खूप सुंदर आणि आकर्षक होत जाते.

आज कालच्या युगात त्यात खूपसे बदल झाले चित्रकला आधी कागदावर होत असे तर आता मात्र कम्प्युटर, टॅब, मोबाईल, लॅपटॉपवर ही केली जाते. जी चित्रे फक्त चित्र स्वरूपात दिसत होती, ती आज संगणकावर चालती बोलती होत आहेत. स्वप्नताही विचार न केलेल्या गोष्टी आज मात्र AI, Google Gemini, ChatGpt यासारख्या गोष्टींच्या माध्यमातून करता येत आहेत.

नृत्य, गायन, वादन सगळ्यात बदल झाला पण त्यातली जादू आणि वात्सल्य मात्र अजूनही तेच आहे. नृत्य म्हणजे घुंगराच्या बोलावर आणि ढोलकीच्या तालावर फिरकणारे पाय आज फोन मधल्या संगीतावर फिरकत आहेत.

कला तीच पण नवीन एकदा त्यावरच प्रेम होणे म्हणजे माझ्या भाषेत पूर्वी आणि आत्ताच्या कौशल्यावर आणि स्टार्टअप संस्कृती कौशल्याच्या मदतीने आज स्वप्नातला चंद्र पाहिला आज त्यावर जाणे शक्य होत आहे. हे पण एक कौशल्य आहे जे एक वेगळ्या दिशेने आपले अस्तित्व मांडले आहे.

मानवी जीवनातील सर्वात सुंदर आणि प्रभावी गोष्ट म्हणजे प्रत्येक व्यक्तीमधील कला आणि कौशल्य कौशल्यांच्या बलामुळे यशाची प्राप्ती होऊ शकते.

आणि ती कला आणि ती संस्कृती जपणे हे आपले कर्तव्य आहे. असे मला वाटते.

कला ही एक सुंदर जादू आहे.
जी आयुष्याला जादूच्या प्रयोगाने
नाविन्य देऊन जाते.
कौशल्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे.
ती जोपासणे आणि पारंगत ठेवणे
आपले काम आहे.



# सोशल मीडिया : उत्पन्नाच्या संधी

**राजश्री संजय कर्णे**
बी. ए. प्रथम वर्ष

आजच्या काळातील मुलांना किंवा पिढीला सोशल मीडिया ही एक सोपी उत्पन्नाची संधी प्राप्त झाली आहे. सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे साधन राहिली नसून ते उत्पन्नाचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येक व्यक्तीला या जगाशी जोडणे शक्य झाले आहे. सोशल मीडियाद्वारे परिसरातील हॉटेल, जिम व्यवसाय इत्यादी गोष्टीच्या सोशल मीडियावर जाहिराती दाखवायच्या असतात त्यामुळे त्या गोष्टी प्रसिद्ध होत असतात.

सोशल मीडियामुळे प्रत्येकाची कला विकसित होत आहे. त्यांच्या कलाच्या आधारे त्या व्यक्तीचे उत्पन्न वाढत आहे. आपली कला मीडियाद्वारे जाहिरातीमधून फॉलोवर्स वाढवून ब्रँड कोलाब्रेशन किंवा जाहिरातीद्वारे उत्पन्न घेता येते. सोशल मीडिया या माध्यमातून व्यक्ती आपल्या दुकानाच्या जाहिराती करून सोशल मीडियामध्ये प्रसिद्धी करतात आपले ग्राहक वाढवीत असतात.

सोशल मीडियामुळे व्यक्ती तंत्रज्ञानाशी जुळत आहेत थोडक्यात मीडियामुळे प्रत्येक व्यक्ती तंत्रज्ञानाकडे वळत आहे. असे आपणास दिसून येते. लोकांना मीडियाद्वारे उत्पन्नाच्या संधी कशा विकसित होत असतात ते कळत आहे. तुमच्या आवडीनुसार आणि कौशल्यातून तुमच्या इच्छेनुसार तुम्ही सोशल मीडिया वापरून पैसे कमवण्याची एक चांगली संधी मिळविता येते. मीडिया अनेक उत्पन्नाच्या संधी मिळवून देते. मीडियामुळे विविध उत्पन्नाचे साधने मिळतात. सोशल मीडिया उत्पन्न मिळवण्याच्या काही मुख्य संधी आहेत जसे की, युट्युब, इंस्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅट. या साधनांद्वारे उत्पन्न मिळवता येते. आपल्या दररोजच्या जीवनातील माहिती किंवा आपल्या कला, कृती आपण युट्युब किंवा instagram द्वारे सादर करता येते त्यासाठी त्याचे उत्पन्न वाढते कारण माहितीपूर्ण किंवा मनोरंजक व्हिडिओ बनवून ॲप्सद्वारे जाहिरातीमधून पैसे मिळवता येतात. इंस्टाग्राम आणि फोटोच्या माध्यमातून फॉलोवर्स वाढवून ब्रँड कोलाब्रेशन किंवा जाहिरातीद्वारे उत्पन्न करता येते.

सोशल मीडियाद्वारे मोठ्या व्यक्ती व छोट्या व्यक्ती मीडियाचा वापर करतात. मिडियामध्ये मोठ्या कंपन्या आणि सेलिब्रिटी आपल्या स्वतःच्या कला किंवा आपल्या वस्तूंची प्रसिद्धी करतात. फेसबुक किंवा गुगल ॲप चालवून तुम्ही लहान व्यवसायांना विक्री वाढवण्यासाठी मदत करू शकता. त्या बदल्यात फी घेऊ शकता. पर्यटन, कला, हस्तकला, किंवा उत्पादने फेसबुक इंस्टाग्रामच्या माध्यमातून विकून नफा मिळवणे

हे एक डिजिटल मार्केटिंग उत्पन्न म्हणता येईल.

कोरोनाच्या काळात मीडियाद्वारे लोकांनी आपल्या वस्तू किंवा चित्र इत्यादी गोष्टी मीडियावर शेअर केल्या असे आपणास दिसून येते.

थोडक्यात सोशल मीडिया ही एक अशी यंत्रणा आहे की ज्यामध्ये व्यक्तीचे गुण इतर लोकांना माहीत होतात. त्या कलाद्वारे त्या व्यक्तीचे चागंले उत्पन्न सोशल मीडियाद्वारे होत असते. त्यासाठी आपल्या पिढीसाठी सोशल मीडिया एक उत्पन्नाचे चागंले साधन आहे. आता ग्राहक सोशल मीडिया सोडल्याशिवाय द्वारे वस्तूंचे खरेदी करू शकतात.

इंस्टाग्राम, किंवा टिक टॉक शॉप वर उत्पादने टॅग करून तुम्ही थेट विक्रीतून कमिशन मिळवू शकता. फेसबुक कंटेंट मॉनिटायझेशन फेसबुक वर आता केवळ व्हिडिओ वरच नाही तर इमेज पोस्ट आणि टेक्स्ट पोस्टवर ही जाहिरातीद्वारे पैसे मिळवण्याची सोय उत्पन्नाचे सर्वात मोठे साधन ठरत आहे.

आता फक्त एआय वापरून मजकूर तयार करणे पुरेसे नाही चॅट जीपीटी सारखी साधने वापरून व्हिडिओचे हुक्स आणि व्हिडिओ शॉटची नियोजन वेगाने करणे हा मोठा व्यवसाय बनला आहे. क्लीनपिंग सेवा मोठ्या मालिकामंधील रंजक भाग कापून ते सोशल मीडियावर व्हायरल करणे ही सुद्धा क्रिएटिव्ह साठी एक उत्पन्नाची संधी आहे. इन्फ्लुएन्सर मार्केटिंग जर तुमचे फॉलोवर्स जास्त असतील तर विविध ब्रॅड्स त्यांच्या उत्पादनांच्या जाहिरातीसाठी तुमच्याशी संपर्क साधतात. प्रयोजित पोस्टद्वारे तुम्ही मोठे मानधन मिळूवू शकता. सलग्न विपणन उत्पादनाच्या लिंक शेअर करून आणि त्याद्वारे विक्री झाल्यास कमिशन मिळवणे इत्यादी.

यासारख्या तुमच्या खास ज्ञानासाठी व्हाट्सअप, टेलिग्राम किंवा instagram वर पेड सबस्क्रीप्शन सुरू करून दर महा निश्चित उत्पन्न मिळवता येते. अशा प्रकारे आजच्या पिढीला सोशल मीडिया आपल्या कलाद्वारे उत्पन्न मिळवून देते.



# बदलते मानवी जीवन व नवकौशल्य

**निकिता बालाजी कांबळे**
एम.ए. द्वितीय वर्ष

बदलते मानवी जीवन व नव कौशल्य आजच्या आधुनिक युगात मानवी जीवन झपाट्याने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अधिक जवळ आले आहे. इंटरनेट, संगणक, मोबाईल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यासारख्या साधनांमुळे मानवी जीवनाची गती वाढली आहे. या बदलत्या परिस्थितीत केवळ पारंपरिक ज्ञान पुरेसे राहिलेले नाही. तर नव्या कौशल्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

म्हणूनच बदलत्या मानवी जीवनासोबत नव कौशल्यांचे महत्त्वही वाढत आहे. पूर्वीचे जीवन साधे आणि मर्यादित साधनांवर आधारित होते. लोकांचे कामकाज मुख्यतः शारीरिक श्रमावर अवलंबून होते. परंतु आज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक कामे सहज आणि जलद होत आहेत.

ऑनलाइन शिक्षण, डिजिटल व्यवहार, घरबसल्या नोकरी (Work From Home) यासारख्या संकल्पना आता सामान्य झाल्या आहेत.त्यामुळे मानवी जीवनाची कार्यपद्धती पूर्णपणे बदलली आहे.

या बदलामुळे शिक्षण पद्धतीतही मोठे परिवर्तन झाले आहे. आज विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातील ज्ञान घेणे पुरेसे नाही, तर संवाद कौशल्य, सृजनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता, तांत्रिक ज्ञान, डिजिटल साक्षरता यासारखी नव कौशल्य आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. ही कौशल्य व्यक्तीला स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी मदत करतात.

नवकौशल्यामंध्ये तंत्रज्ञानाचा योग्य वापर टीमवर्क, नेतृत्व गुण, वेळेचे व्यवस्थापन, आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती याचा समावेश होतो.

बदलत्या परिस्थितीत जो व्यक्ती नवीन कौशल्य शिकण्यास तयार असतो तोच यशस्वी ठरतो. त्यामुळे आजीवन शिक्षण (Lifelong Learning) ही संकल्पना अधिक महत्त्वाची बनली आहे.

या बदलासोबतच काही आव्हानेही निर्माण झाली आहेत. तंत्रज्ञानावर वाढते अवलंबित्व, मानसिक ताण आणि मानवी नात्यामंध्ये येणारे अंतर ह्या काही समस्या आहेत. म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी मुल्ये संवेदनशीलता आणि जबाबदारी जपणे आवश्यक आहे.

एकूणच पाहता, बदलते मानवी जीवन आणि नव कौशल्य हे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत आधुनिक काळात प्रगतीसाठी व्यक्तीने वेळेनुसार स्वतःला बदलणे आणि नवीन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. यामुळेच व्यक्ती समाज आणि राष्ट्र याची प्रगती शक्य होते.

# नवकौशल्य आणि बदलते जीवन

**रेणुका बाळकृष्ण जोशी**
इ. १२ वी

काळाचे चक्र फिरले वेगाने
जगण्याचे संदर्भ बदलले
कालचे जे होते नवल मोठे
ते आज साधे सहज झाले
हातातल्या एका छोट्या पडद्यात
सामावले आहे सारे विश्व
बदलत्या या प्रवाहामध्ये
मानवाचे सुरू झाले नवे पर्व
यंत्रांशी आता मैत्री झाली
बुद्धीला लाभली तंत्राची जोड
कल्पकतेच्या या नव्या युगात
यशाची लागली वेगळीच गोड
केवळ पुस्तकी ज्ञानाने आता
प्रगतीची दारी उघडत नाहीत
नवकौशल्यांच्या साठी शिवाय
यशाची शिखरे सर होत नाहीत
संवाद बदलला भाषा बदलली
बदलली कामाची रीत
अनुकूलन हाच आता
जीवनाचा खरा जित
संगणकीय अज्ञावली अन
विदा -विज्ञान ही आजची शस्त्रे
सर्जन सर्जनशीलतेच्या पालवीनेच
फुलतील प्रगतीची नवे वस्त्रे
मातीचा गंध जपता जपता
आभाळाला भिडणारी जिद्द हवी
बदलत्या मानवी जीवनाला
नवकौशल्यांची साद हवी
जुने ते सोनेच राहील,
पण नव्याची कास धरायला हवी

उत्क्रांतीच्या या महामार्गावर
आपली मोहर उमटवायला हवी
काळ धावतो सुसाट वेगाने
दिशा बदलल्या जगण्याच्या
पद्धती आता उरल्या नाहीत
त्या केवळ ठोकताळ्याच्या
चाकाचा शोध लागला मागे
आज चीपचे राज्य आले
मातीच्या हातात आता
तंत्रज्ञानाचे वलय आले
दोन टोकावर बसून लोक
आज एकत्र काम करतात
व्हर्चुअल जगातही माणसे
मनाचे बंध गुंफतात
भाषिक अडथळे संपले आता
संवाद झाला प्रभावी
पण शब्दांमागची भावना
ओळखण्याची नवी दृष्टी हवी
पर्यावरण आणि प्रगतीचा
साधायचा आहे आता वेळ
शाश्वत जगण्याचे नवकौशल्य
हाच भविष्याचा खेळ
जुने विसरू नका कधी
पण नव्याला घाबरू नका
प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे
सामर्थ्य मात्र सोडू नका

# कौशल्यातून शेती-माती आणि नाती

**निकिता बालाजी कांबळे**
एम.ए. द्वितीय वर्ष

मानवी जीवन सतत बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवनाची गती वाढली असली तरी या बदलामंध्ये माणसाने आपल्या मुळाशी जोडलेले राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. माणसाचे जीवन शेती , माती आणि नाती याच्याशी घट्ट जोडलेले आहे. आजच्या काळात नव कौशल याच्या मदतीने या तिन्ही गोष्टी अधिक सक्षम आणि समृद्ध करता येतात.

भारतीय समाजात शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शेतकरी हा देशाचा कणा मानला जातो. पूर्वी शेती पारंपारिक पद्धतीने केली जात होती; परंतु आज आधुनिक यंत्रसामग्री, हवामानाचा अंदाज घेणारी तंत्रे याचा वापर करून शेती अधिक उत्पादनक्षम होत आहे.

ही सर्व नव कौशल्य शेतकऱ्याला कमी कष्टात अधिक उत्पन्न मिळवून देतात. मातीही केवळ सुपीकता टिकवणे ही आपली जबाबदारी आहे. आज सेंद्रिय खतांचा वापर, माती परीक्षण, पिकांची फेरपालट यासारख्या नव्या पद्धतीमुळे मातीचे आरोग्य जपले जात आहे. माती जपली तरच शेती टिकेल आणि शेती टिकली तरच समाजाचे जीवन समृद्ध राहील.

शेती आणि माती इतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे नाती. आधुनिक जीवनात तंत्रज्ञानामुळे माणसामंधील संवाद वाढला असला तरी प्रत्यक्ष नात्यामंधील संवादातील तसेच जीवनात दुरावा निर्माण झालेला दिसतो.

अशावेळी नाती जपण्यासाठी समजूतदारपणा, सहकार्य, संवेदनशीलता आणि संवाद कौशल्य यासारखी नव कौशल्य आवश्यक ठरतात.

कुटुंब समाज आणि निसर्ग याच्याशी जुळवून घेण्याची क्षमता ही एक महत्त्वाची कौशल्य आहेत. आजच्या तरुण पिढीने नव्या कौशल्यांच्या माध्यमातून शेतीला आधुनिकतेची जोड देणे, मातीचे संवर्धन करणे आणि मानवी नाती जपणे ही काळाची गरज आहे.

नव कौशल्य केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ती जीवन समृद्ध करण्यासाठी ही महत्त्वाची असतात. एकूणच शेती ,माती आणि नाती ही मानवी जीवनाची मूलभूत तत्वे आहेत. नव कौशल्यांच्या सहाय्याने या तिन्ही क्षेत्रांना बळकटी दिल्यास समाज अधिक सुदृढ समृद्ध आणि संवेदनशील होऊ शकतो.

त्यामुळे बदलत्या काळात आधुनिकता स्वीकारताना आपल्या मुळाशी जोडलेले राहणे हेच खरे जीवनाचे सौंदर्य आहे.

# तंत्रज्ञान कौशल्य आणि साहित्य

**ज्योत्सना राम रणदिवे**
बी. ए. प्रथम वर्ष

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. संगणक, मोबाईल, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया अशा विविध साधनामुळे मानवाचे जीवन अधिक सोपे आणि  वेगवान झाले आहे. या आधुनिक साधनामुळे मानवाची जीवन अधिक सोपे आणि वेगवान झाले आहे. या आधुनिक साधनाचा योग्य वापर करण्याची क्षमता म्हणजे तंत्रज्ञान कौशल्य होय. शिक्षण, उद्योग, आरोग्य, प्रशासन यासोबत साहित्य क्षेत्रातही तंत्रज्ञान कौशल्याचे मोठे महत्त्व निर्माण झाले आहे.

पूर्वीच्या काळात साहित्यनिर्मिती आणि प्रसार हे मुख्यतः हस्तलिखित छापील पुस्तके आणि प्रसार हे मुख्यतः हस्तलिखित होते. लोकांना आपले साहित्य प्रकाशित करण्यासाठी खूप वेळ आणि खर्च करावा लागे. परंतु तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या प्रक्रियेत मोठा बदल झाला आणि आज लेखक संगणकावर सहजपणे लेखन करू शकतात. विविध टायपिंग सॉफ्टवेअर आणि संपादन साधनामुळे लेखन अधिक सुबक आणि शुद्ध करता येते.

इंटरनेटमुळे साहित्याचा प्रसार खूप वेगाने होऊ लागला आहे. लेखक ब्लॉग, वेबसाईट, सोशल मीडिया आणि ई-बुकच्या माध्यमातून आपले लेखन जगभर पोहोचू शकतात. त्यामुळे लेखक आणि वाचक याच्यातील  अंतर कमी झाले आहे. वाचकांना मोबाईल किंवा संगणकावर कोणतेही पुस्तक, कथा, कविता, किंवा लेख सहज वाचता येते.

तंत्रज्ञानामुळे संशोधन कार्य ही अधिक सोपे झाले आहे. लेखकांना विविध संदर्भ ग्रंथ, माहिती, चित्रे आणि ऐतिहासिक माहिती इंटरनेटवर सहज मिळते. त्यामुळे साहित्य अधिक समृद्ध आणि माहितीपूर्ण बनते. तसेच ऑडिओ बुक, पॉडकास्ट आणि डिजिटल ग्रंथालय यासारख्या साधनामुळे वाचनाची नवी साधने उपलब्ध झाली आहेत.

तथापि, तंत्रज्ञानाचा वापर करताना काही आव्हानेही आहेत इंटरनेटवरील माहितीची सत्यता तपासणी आवश्यक असते. तसेच छापील पुस्तकांच्या वाचनाची सवय कमी होण्याची शक्यता देखील असते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य आणि संतुलित वापर करणे महत्त्वाचे आहे.

अशाप्रकारे तंत्रज्ञान कौशल्य आणि साहित्य, याचा परस्पराशी घनिष्ठ संबंध आहे. तंत्रज्ञानामुळे साहित्य निर्मिती, संपादन, प्रकाशन आणि प्रसार अधिक सोपा, जलद आणि प्रभावी झाला आहे. त्यामुळे आधुनिक काळात साहित्य क्षेत्रात प्रगती करण्यासाठी तंत्रज्ञान कौशल्य अत्यंत आवश्यक ठरले आहेत.

# कौशल्य

**तेजस्विनी बाबासाहेब कांबळे**
बी. ए. (ॲनिमेशन) प्रथम वर्ष




**एआय साक्षरता:**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स(AI) मुळे कामाच्या पद्धती बदलत आहेत. आता फक्त कम्प्युटर चालवणे पुरेसे नाही तर AI चा वापर करून काम वेगाने करणे हे एक महत्त्वाचे कौशल्य आहे. प्रॉम्प्ट इंजीनियरिंग, चॅट जीपीटी सारख्या साधनांना योग्य सूचना देऊन त्यांच्याकडून काम करून घेणे, डेटा विश्लेषण उपलब्ध माहिती, भविष्यातील अंदाज वर्तवणे, तंत्रज्ञान वेगाने बदलत असल्याने जुन्या पद्धती सोडून नवीन गोष्टी पटकन शिकण्याची क्षमता आहे.

जेव्हा कौशल्यामुळे व्यक्ती आत्मविश्वास, स्वावलंबी बनने कौशल्य म्हणजे आपल्यामधील कला सादर होते त्याला आपण कौशल्य असे म्हणतात. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करणे ते देखील एक कौशल्य असू शकते. कौशल्य करणे व्यक्तीला कामाच्या ठिकाणी अधिक क्षमता बनवतात.

युवक-युवती आधारित शिक्षणावर भर असतो विद्यार्थिनी केवळ तंत्रज्ञानाच्या वेगळ्या वेगाने बदलत असल्याने स्वतःच्या आवडीप्रमाणे निवडण्याची संधी सोडणारे न राहता नवीन कल्पना मांडणारे रोजगाराच्या संधी केवळ पदवीपेक्षा हाताशी कौशल्य असलेल्या नोकरी लवकर मिळू शकते. जेव्हा आपण काम करतो एखादे उत्तम पदार्थ सादर करतो त्याला आपण एखादे काम उत्कृष्ट आणि आत्मविश्वासाने करण्याची पद्धत म्हणतो.

**कौशल्य म्हणजे काय:**

तुमच्याकडे कोणतेही काम करण्यासाठी ज्ञान आणि क्षमता असणे आवश्यक आहे काम करण्याच्या या गुणांना कौशल्य म्हणतात. हे गुण एखाद्या व्यक्तीमध्ये त्याच्या कामाच्या अनुभवाच्या आधारे विकसित होतात. प्रशिक्षण घेऊनही कौशल्य वाढवतात.

कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी कौशल्य असणं खूप महत्त्वाचं आहे. तुमच्याकडे कौशल्य असेल तर त्या कामात यश मिळवण्याची शक्यता वाढते. नोकरी असो किंवा व्यवसाय सर्वत्र कौशल्य महत्त्वाची असतात. आजच्या लेखात आम्ही तुम्हाला  कसे सुधारावे याबद्दल मराठीमध्ये माहिती देणार आहोत.

**तांत्रिक कौशल्य :**

हे कौशल्य प्रशिक्षण घेऊन तसेच एखाद्याच्या आयुष्यातील अनुभवातून आत्मसात केले पाहिजे. तुम्हाला हे जे कौशल्य सुधारायचे आहे त्या कौशल्याबद्दल प्रथम जर तुमची कौशल्य पूर्वीपेक्षा किती सुधारले आहे हे पहा तुम्ही कौशल्यात परफेक्ट होता आणि आज तुम्ही पाहतात स्वतः तुमचे कौशल्य सुधारू शकत जर नसाल तर कोचिंग सेंटरची मदत घेऊ शकतात कारण कोचिंग सेंटरमध्ये चांगले ज्ञान प्राप्त झाले आहे.

नवीन कौशल्य कसे आत्मसात करावेः

**कौशल्य आवड-ओळख :**

तुम्हाला कोणत्या विषयात रस आहे ते शोधा आणि प्रशिक्षण घ्या. ऑनलाईन कोर्स, वर्कशॉप किंवा पुस्तकांचा आधार घ्यावा लागतो. सराव करा कोणतेही कौशल्य सरावाशिवाय आत्मसात करता येत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रातील तंत्रज्ञाकडून सल्ला घ्या.  शिका आणि प्रगती करा हे आजच्या युगाचे सूत्र आहे. तुम्हाला भविष्यात कोणत्या क्षेत्रातील उदाहरणार्थ शिक्षण, व्यवसाय किंवा तंत्रज्ञान कौशल्याबद्दल जाणून घ्यायला आवडेल.  कौशल्य विकासाच्या क्षेत्रात काळानुसार मोठे बदल दिसून येतील.

आजच्या आधुनिक काळात केवळ पुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही तर त्यासोबत कौशल्य असणे ही अत्यंत आवश्यक झाले आहे. कौशल्य म्हणजे एखादे काम करत असताना योग्य पद्धतीने करावे आणि आत्मविश्वास परिणामकारकपणे करण्याची क्षमता शिक्षणासोबत कौशल्य विकसित क्षमता आणि यशस्वी आणि स्वावलंबी बनवते.

आज अनेक क्षेत्रामध्ये नोकरी मिळवण्यासाठी केवळ पदवीक्षेत्रामध्ये नोकरी मिळण्यासाठी नव्हे तर व्यवहारी कौशल्य पण महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ संगणक संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन इत्यादी पण गोष्टी गरजेचे असते अनुभव मिळणे पण गरजेचे असते ते प्रत्यक्ष काम करून त्यांचा आत्मविश्वास आवश्यक आहे.

# सोशल मीडिया : उत्पन्नाच्या संधी

**ऋतुजा शालिक पवार**
बी. ए. प्रथम वर्ष

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे साधन राहिले नाही, तर ते उत्पन्नाचे एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे अनेक लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून चागंले उत्पन्न कमवत आहेत. त्यामुळे सोशल मीडिया हे करियर आणि व्यवसायाच्या दृष्टीनेही एक मोठे व्यासपीठ बनले आहे.

सोशल मीडिया म्हणजे लोकांना एकमेकांशी जोडणारे आणि माहिती, विचार, फोटो, व्हिडिओ इत्यादी शेअर करायचे माध्यम Facebook, Instagram, Youtube, Twitter (x) यासारख्या प्लॅटफॉर्मवर लाखो लोक दररोज सक्रिय असतात. या प्लेटफॉर्मवर कंटेंट तयार करून लोक प्रसिद्धी मिळवतात आणि त्यातून पैसेही कमवू शकतात.

दुसरी महत्त्वाची संधी म्हणजे इन्फ्लुएंसर मार्केटिंग जे लोक सोशल मीडियावर लोकप्रिय होतात त्यांना विविध कंपन्या त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी पैसे देतात.

उदा :- एखादा इन्फ्लुएंसर कपडे, सौंदर्यप्रसाधने किंवा मोबाईल ॲप्स यांची माहिती आपल्या फॉलोवर्सना देतो आणि त्याबदल्यात त्याला मानधन मिळते. 21व्या शतकात सोशल मीडियाने संवादाच्या व्याख्या बदलल्या आहेत. 5.25 अब्जाहून अधिक वापरकर्ते दररोज इंटरनेटवर सक्रिय असल्याने हे व्यासपीठ जागतिक बाजारपेठ बनले आहे.

इंटरनेट आणि स्मार्टफोन्सच्या सुलभतेमुळे, सोशल मीडिया हे केवळ लोकांच्या संपर्कात राहण्याचे साधन न राहता, आता 'क्रिएटर इकॉनोमिक'(creator economy) चे मुख्य केंद्र बनले आहे.

सोशल मीडिया वरून पैसे कमावण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत.

1) कंटेंट क्रिएशन आणि जाहिराती :

युट्युब, फेसबुकवर व्हिडिओ अपलोड करून, त्यातून मिळणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून (Adsense) मोठी कमाई करता येते.

2) इन्फ्लुएंसर मार्केटिंग :

जर तुमच्याकडे चांगला 'फॉलोवर बेस' असेल, तर ब्रँड्स त्यांच्या उत्पादनांच्या जाहिरातीसाठी तुम्हाला स्पॉन्सरशिप देतात.

3) एफिलीएट मार्केटिंग:

उत्पादनाची लिंक सोशल मीडियावर शेअर करून, त्याद्वारे होणाऱ्या विक्रीवर कमिशन मिळवणे, हा उत्तम मार्ग आहे.

4) स्वतःची उत्पादने किंवा सेवा विकणे:

कलाकार, छोटे व्यवसायिक (SMBS) त्यांचे हस्तकला कपडे, किंवा डिजिटल कोर्सेस इंस्टाग्राम/ फेसबुक शॉपद्वारे थेट विकू शकतात.

5) सोशल मीडिया मॅनेजर :




कंपन्यांसाठी सोशल मीडिया अकाउंट्स हँडल करूनही पगार किंवा फ्रीलान्सिंगद्वारे कमावता येते.

सोशल मीडियामुळे व्यवसाय जागतिक स्तरावर पोहोचवता येतात. हे मार्केटिंगचे कीफायदेशीर साधन आहे. मात्र यात तोटेही आहेत, जसे की चुकीच्या माहितीचा प्रसार, सायबर गुन्हे आणि योग्य माहिती अभावी वेळेचा अपव्यय. सोशल मीडिया ही आजच्या काळातील एक मोठी डिजिटल संधी आहे. योग्य कौशल्य, सर्जनशीलता आणि सातत्य ठेवल्यास सोशल मीडिया हे केवळ उत्पादनाचे साधन न राहता करिअरचा एक मुख्य मार्ग बनू शकतो. योग्य नियोजन आणि जबाबदार वापरासह, या व्यासपीठाचा उपयोग आर्थिक सक्षमीकरणासाठी केला जाऊ शकतो.

सोशल मीडियावर फ्रीलान्सिंग ही देखील एक महत्त्वाची संधी आहे. ग्राफिक डिझाईन, फोटो एडिटिंग, व्हिडिओ एडिटिंग, लेखन डिजिटल मार्केटिंग अशा कौशल्यांचा वापर करून अनेक  तरुण सोशल मीडियावरून काम मिळवतात आणि उत्पन्न कमावतात. त्यामुळे तरुणांना स्वतःचे कौशल्य विकसित करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळते.

तथापि, सोशल मीडियाचा वापर करताना काही गोष्टींची काळजी घेणे ही आवश्यक आहे. चुकीची माहिती पसरवणे, वेळेचा अपव्यय करणे किंवा फसवणूक होणे यांसारख्या समस्या देखील सोशल मीडियावर दिसतात. त्यामुळे सोशल मीडियाचा योग्य आणि जबाबदारीने वापर करणे महत्त्वाचे आहे.

शेवटी असे म्हणता येईल की सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते उत्पन्नाचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. योग्य कौशल्य, मेहनत आणि सातत्य यांच्या मदतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक लोक आपले करिअर घडवत आहेत. भविष्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्पन्नाच्या संधी अजून वाढतील आणि अनेक लोकांना रोजगार मिळेल.

सोशल मीडिया हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

# बदलते मानवी जीवन व नवकौशल्य

**नेहा शालिंग राऊत**
बी. ए. प्रथम वर्ष

आजचे मानवी जीवन तंत्रज्ञान, वेग आणि विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वेगाने बदलत आहे. जिथे शारीरिक क्षमातेपेक्षा बौद्धिक व डिजिटल कौशल्यांना (नवकौशल्य) महत्त्व आले आहे. या युगात टिकून राहण्यासाठी तात्रिक साक्षरता भावनिक संतुलन आणि अनुकूलन क्षमता ही नवीन जीवन कौशल्य आत्मसात करणे अनिवार्य झाले आहे.

21 व्या शतकात मानवी जीवन अमुलाग्र बदलत आहे. कोरोना सारख्या संकटांनी मानसिक स्वास्थ्य आणि जीवनशैलीवर परिणाम केला आहे, ज्यामुळे आरोग्य व मन व्यवस्थापनावर भर दिला जात आहे. पूर्वीचे निवांत आयुष्य आता डिजिटल स्पर्धेत रूपांतरित झाले आहे.

**कौशल्य आधारित शिक्षण व स्टार्टअप संस्कृती :**

पारंपारिक शैक्षणिक शिक्षणाच्या विपरीत जे शिक्षण, कला असे प्रत्यक्ष शिक्षण व कौशल्य शिक्षण यावर भर दिला जातो. कौशल्य आधारित शिक्षणामुळे अनेक फायदे मिळतात. या शिक्षणामुळे करिअरच्या



संधीचा फायदा होतो. भविष्य घडविण्यासाठी कौशल्य आधारित शिक्षण स्वीकारणे गरजेचे आहे.

**तंत्रज्ञान कौशल्य आणि साहित्य :**

संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावर भाषेचा विकास करणे शक्य आहे. तंत्रज्ञानाचा वापर करूनही मराठी भाषा ही ज्ञानभाषा करणे शक्य होईल. इंटरनेटमुळे कोणत्याही क्षेत्रातील माहिती सहज मिळू शकते. विद्यार्थ्यांना विषयाचा सखोल आणि गतीने अभ्यास करता येतो. ई-बुक्स, ऑनलाइन प्रकाशन कविता, कादंबरी, आत्मचरित्र आणि वैचारिक पुस्तकांचा समावेश होतो.

**Gen-Z व डिजिटल कौशल्य :**

इंटरनेटसह वाढणारी पहिली पिढी जनरेशन झेड आहे. प्रत्येक पिढीप्रमाणे जनरेशन झेड चे वर्तन ते कसे वाढले यावर आकार घेतात. Gen-Z ही पिढी सोशल मीडियावर सक्रिय असून, या जनरेशन मध्ये स्वातंत्र्य, विविधता आणि समावेश महत्त्वाचे मानले जातात. Gen-Z हा एक विचारशील, सामर्थ्यवान आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक जनरेशन आहे. जो आधुनिक जगातील बदलांसाठी तयार आहे. Gen-Z ही डिजिटल नेटिव्हि पिढी आहे.



**नव कौशल्य व शासकीय धोरणे :**

तंत्रज्ञानावर भर दिला पाहिजे, नव कौशल्य विकास कार्यक्रम सादर करून सर्वसमावेशक शिक्षण दिले पाहिजे. वेगवेगळ्या शासकीय सोयींचा लाभ सर्वांनी घेतला पाहिजे. राज्य कौशल्य विकास मिशनद्वारे प्रकल्प त्या त्या राज्यात राबवला जातो.

**अभ्यासक्रमातील बदल व उद्याची कौशल्य :**

अभ्यासक्रमातील बदल हा भविष्याभिमुख क्षमता विकसित करण्यासाठी असावा. जीवन कौशल्य शिक्षणाची गरज असावी. विद्यार्थ्यांना कलागुण, आनंद मिळणारे शिक्षण मिळावे. लवचिकता आणि चपळता या कौशल्यांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. कामाची नीतिमत्ता मौखिक व लेखी संवाद आणि नेतृत्व कौशल्य याचा सराव करणे.

**सोशल मीडिया : उत्पन्नाच्या संधी :**

सोशल मीडियावर उत्पन्नाच्या अनेक संधी उपलब्ध असतात. युट्युब, इंस्टाग्राम वर माहिती शेअर करून चांगले उत्पन्न मिळवता येते. व्हिडिओ, फोटो टाकून लोकप्रिय होणे, जाहिरातीतून पैसे कमवणे स्वतःची उत्पादने थेट ग्राहकांना विकणे.

**नव कौशल्यातून शेतीमाती व नाती :**

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत पीक लागवड केली जाते. चांगल्या मातीत चांगले पीक येते. मातीतील कस कमी होऊ नये म्हणून रासायनिक खताचा वापर कमी केला पाहिजे. शेतात चांगले उत्पन्न झाले तरच घरातील नाती ही टिकण्यास मदत होते. नाही तर आर्थिक कमतरता भासल्यास नात्यात दुरावा निर्माण होतो. एकत्र कुटुंब पद्धतीत सर्वांच्या गरजा पूर्ण होत नाहीत. म्हणून शेतीवर आधारित कुटुंबाने नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून भरपूर उत्पन्न मिळवून आनंदी जीवन जगावे.

# शिक्षण व्यवस्थेत बदलाची गरज

**आकाश धर्मराज बनसोडे**
**बी ए प्रथम वर्ष**

आजचा काळ बघितला तर सगळं किती लवकर बदलत आहे. रोज नवीन टेक्नॉलॉजी येतेय. बाहेरचे देश त्यांच्या शिक्षण व्यवस्थेत वेळेनुसार बदल करतात. जेणेकरून मुलांना आजच्या काळाला टेक्नॉलॉजीवर आधारित शिक्षण मिळेल. पण आपल्या भारतात मात्र हे बदल खूप संथ (हळू) गतीने होताना दिसतात. त्यामुळे आता आपल्या शिक्षण पद्धतीत बदल होणे खूप गरजेचे आहे.

आपली आत्ताची शिक्षण पद्धत बघितली तर ती अजूनही रट्टा मारण्यावर' (पाठांतरावरच) अडकून आहे. विषय समजून घेण्यापेक्षा फक्त परीक्षेत जास्त मार्क्स कसे मिळतील यावरच मुलांचा भर असतो. यामुळे होतं काय तर मुलांमधली विचार करण्याची ताकद, काहीतरी नवीन करण्याची धडपड आणि आयुष्यात येणाऱ्या समस्या सोडवण्याची क्षमता म्हणावी तशी वाढतच नाही.

अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्याकडची ट्युशन संस्कृती आणि परीक्षेचे दडपण. दहावी बारावी म्हटलं की मुलांवर एवढं टेन्शन टाकलं जातं की विचारू नका. मुलांना मार्क मिळवणारी मशीन बनवण्यापेक्षा त्यांना एक चांगलं माणूस बनवणं जास्त महत्त्वाचं आहे. आपल्याकडे आजही डॉक्टर किंवा इंजिनियर याच पदाला सगळ्यात भारी मानलं जातं. पण आता जग खूप पुढे गेला. कला, संगीत, ॲनिमेशन, बिझनेस अशा अनेक क्षेत्रात मुलं खूप पुढे जाऊ शकतात. शिक्षण फक्त पुस्तकी न राहता ते प्रॅक्टिकली असायला हवं. मुलांना फक्त वर्गात बसवून शिकवण्यापेक्षा प्रॅक्टिकली अनुभवता आले पाहिजे आणि स्वतः काहीतरी शोधून काढण्याची सवय लावली पाहिजे. आताच्या काळात AI (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), कोडिंग, डिजिटल टेक्नॉलॉजी या गोष्टींना खूप महत्त्व दिल जात आहे. विकसित देशामंध्ये लहानपणापासूनच मुलांना या सगळ्यांची ओळख करून दिली जाते. त्यामुळे तिथली मुलं भविष्यातल्या नोकऱ्यासाठी आधीच तयार असतात. आपल्याकडेही या नवीन विषयांचा शालेय शिक्षणात लवकरात लवकर समावेश व्हायला हवा. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे आधुनिक शिक्षण फक्त शहरातल्या मोठ्या आणि महागड्या शाळांपुरतं मर्यादित न राहता गावागावातल्या आणि खेड्यातल्या शाळांपर्यंत ही पोहोचायला हवं, जेणेकरून तिथल्या मुलांनाही पुढे जाण्याची संधी मिळेल.

थोडक्यात सांगायचं तर बदलत्या काळानुसार आपल्या शिक्षण पद्धतीत बदल होणं ही आता काळाची गरज बनली आहे. जर आपण नवीन टेक्नॉलॉजी, स्किल्स आणि मुलांच्या नवीन विचारांना प्रोत्साहन दिलं तरच आपली मुलं जगातल्या इतर मुलांच्या खांद्याला खांदा लावून उभी राहू शकतील. जगातील प्रत्येक विद्यार्थ्याला समान शिक्षणाची संधी मिळायला पाहिजे. नवीन टेक्नॉलॉजी कौशल्य आणि सृजनशील विचारांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचा आणि शाळेचा विकास होईल.

# अभ्यासक्रमातील बदल व उद्याची कौशल्ये

**रवी गोविंद वाघमारे**
एम.ए. प्रथम वर्ष

विषय समजून घेण्यापूर्वी विषयाची सूत्रात्मक भाषा अथवा वाक्यातील शब्दावली समजून घेणे महत्त्वाचे ठरते. जोपर्यंत शब्दाचे यथार्थ ज्ञान होत नाही तोपर्यंत तो शब्द वाक्यात कोणत्या अर्थाने प्रयुक्त केला गेला हे नीटपणे लक्षात न येण्याचे लक्षण ठरते. या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे थोर अध्वर्यू श्री गुरु धुंडा महाराज देगलूरकर असे म्हणायचे की, "शब्दाची शक्ती जेव्हा लक्षात येईल तेव्हा सूत्राची गाठ आपोआप सुटेल" या विचारालाच अनुसरून मी हा विषय सोडवू इच्छितो.

सर्वप्रथम मला या विषयात प्रत्येक शब्दाचा मतितार्थ ध्यानात घ्यावा लागेल. हा विषय आधुनिक



काळातील बदलत जाणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचा प्रत्यक्षदर्शी वाचक आहे असे मी म्हणेन. या विषयात दोन प्रथम उपस्थित संघटनांचा विचार येतो,

1) अभ्यासक्रमातील बदल 2) उद्याची कौशल्य.

सर्वप्रथम प्रथमोपस्थित पदबंधानुसार
अभ्यासक्रमातील बदल मला लक्षात घ्यावा लागेल.

पण त्या अगोदरही नेमका अभ्यास म्हणजे तरी काय हे जाणून घेणे अपरिहार्य ठरते.

अभ्यास - अभि + आस = अभ्यास (यणादेश संधी)

अभी - हे उपसर्ग आहे (अर्थ पूर्वी, जवळ, सर्वत्र, पुढे)

या ठिकाणी मी क्रिया रूपाने याचा अर्थ लावू इच्छितो.

अभ्यास म्हणजे एक अशी क्रिया जिच्यात विश्वास, सातत्य आणि संघर्ष नित्य रूपाने असतो त्यालाच "अभ्यास" म्हणतात.

या अभ्यासाचे महत्त्व दिग्दर्शित करीत असताना संत ज्ञानेश्वर म्हणतात की,

पै अभ्यासाचे नि बळे | एका गती अंतराळे ||
व्याघ्र सर्प प्रांजळे | केले एकी ||
एकी वाग्ब्रम्ह योकडे | अभ्यासे केले ||
म्हणोनि अभ्यासासी काही | सर्वथा दुष्कर नाही ||

अभ्यास या संकल्पनेचा विविध बाजूने अभ्यास करता येतो. थोडक्यात तिच्या निरनिराळ्या उत्पत्ती ही पाहता येतात. आता मर्यादा अभावी मला ते लिहिता येणार नाही पण विचाराला दिशा देण्याकरता काही विशिष्ट संकेत देता येतील तेवढे देऊन जातो. अभ्यास म्हणजे.

संत साहित्याच्या दृष्टीने केलेला विचार,
योग ग्रंथात येणारा विचार
नाथपंथात केलेला उपक्रम
आधुनिक विचार प्रणाली
भक्तीच्या अंगाने येणारी उपासना
पूर्वदृष्टी आणि उत्तर दृष्टी मीमांसा.

अशा अनेक अंगाने याचा विस्तार करता येतो. पण मला पुढे सरकावे लागेल. आता पहिला प्रश्न असा आहे की अभ्यासक्रम म्हणजे तरी काय? क्रम म्हणजे सुनियोजित पद्धत. व्यक्तीच्या बुद्धीची, वयाची परिणीती लक्षात घेऊन त्याला योग्य तो विषय देणे अथवा योग्य त्या विषयाची मांडणी करणे म्हणजेच अभ्यासक्रम होय. अगदी थोडक्यात सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, देश, काल, वस्तू, व्यक्ती विचार भेदानुसार योग्य ती सोपवलेली क्रिया म्हणजेच अभ्यासक्रम होय.

याचाही वैविध्यरुपाने विस्तारित विचार करता येतो. तो असा,
प्राचीन तथा अर्वाचीन काळातील अभ्यासक्रम कसा होता?
विषयाची निवड कोणत्या निकषांवर केली जात असे?
उद्देश काय होता?
आधुनिक काळात कसा बदल झाला?
बदलण्याच्या पाठीमागची मीमांसा.

आजच्या काळात जो अभ्यासक्रम म्हणून प्रत्येक शालेय विद्यालय महाविद्यालयाला तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांकरता नियोजिला जातो त्याची सकसता पातळी कशी आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तसेच काळानुसार त्यास काय काय बदल करावा लागतो? कसा होतो? बरं, का होतो याची चर्चाही करावी लागेल. पहिला प्रश्न असा, बदल का होतो? असं नेमकं काय घडतं की आम्ही बदल झाला असं म्हणतो? याचे संक्षेप उत्तर असे देता येईल की, माणसाच्या सामान्य विचारात जेव्हा विशेष विचारांची भर पडते तेव्हा 'बदल झाला' असे आपण म्हणतो. बदल का होतो या प्रश्नाचे हे मुख्य कारण सांगता येईल असो. पुढचा प्रश्न, बदल कसा होत जातो?

प्रतिकूलतेकडून अनुकूलतेकडे अथवा परोक्षत्वाकडून अपरोक्षत्वाकडे जेव्हा विचारांची दिशा समन्वयाची भूमिका घेत समुच्चयाच्या रूपात पुढे सरकते तेव्हा उत्क्रांती, विरुद्धार्थी बदल होत जाऊ लागतो. आता प्रश्न तिसरा काळानुसार अभ्यासक्रमात बदल कशा पद्धतीने करावा लागतो? याचे उत्तर देत असताना मी तर असं म्हणेन की, बदल करावा लागतच नाही तो

आपोआप होत जातो. कारण बदल ही संकल्पना जड नसून क्रियारूप आहे. स्वाभाविकपणे तिथे विकृती संभवतेच. तसे पाहिले तर निसर्गतः हे सर्व जीव (सजीव/निर्जीव, चर /अचर, स्थावर/जंगम) कोणीही असोत शेवटी हे सर्व विकार रूप आहेत. म्हणजेच बदलणारे आहेत. म्हणूनच या सर्वांना आध्यात्मिक भाषेत प्रकृती असे म्हणतात. प्रकर्षाने निर्माण होणारी कृती व तितक्याच प्रकर्षाने क्षय पावणारी असल्यामुळे तिला प्रकृती म्हणतात. असो म्हणून या प्रश्नाचे उत्तर असेच देता येईल की अभ्यासक्रमात बदल करावा लागत नाही तर तो सहजच होत जातो. हा पण भौतिक रूपाने विषयाचे वैविध्य स्तर रूपाने बदलावे लागते हे खरे ! त्यात दुमत नाही!

आजच्या काळाच्या अनुषंगाने सांगायचे झाले तर या सद्यस्थितीत अभ्यासक्रमात फार मोठा बदल होत चाललेला आहे. मग ते विद्यापीठाच्या स्तरावर, NTPL, स्वयंम, असे उपक्रम असो किंवा विद्यालयीन जीवनात कौशल्याधिष्ठित शिक्षणावर दिलेला भर असो हा सर्व बदलच म्हणावा लागेल.

आज प्रत्येक मुलाच्या विचारात होणारा बदल त्याच्या उद्याच्या कौशल्याचे दिग्दर्शन करणारे ठरते. म्हणजे एकुणतः अभ्यासक्रमात काय आहे हे पाहूनच त्यावरून कौशल्याचे मूल्य सहज लक्षात येतात. म्हणजे शितावरून भाताची परीक्षा असे म्हटल्यासारखेच आहे. आम्ही विद्यार्थ्यांना काय देत आहोत यावरूनच पुढे त्याला स्वतःचे कौशल्य सृजन करता येईल की नाही हे सहज तपासता येते. म्हणजे कौशल्य ही बाब जर अभ्यासक्रमावरूनच सहज लक्षात येत असेल तर तो अभ्यासक्रम किती सकस परिपक्व असला पाहिजे याची जाण ठेवावी लागेल.

म्हणून आज जर त्या अर्थाने काही बदल होत असेल, उद्याच्या कौशल्याची जाणीव लक्षात घेऊन आम्ही समाजाच्या प्रगती करिता काही बदल करत असू तर ते योग्यच आहे असे मला वाटते. शेवटी मी असेच म्हणेन की, जर कौशल्याला वाव द्यायचा असेल तर नुसता अभ्यासक्रम बदलून चालणार नाही तर व्यक्तीच्या व्यक्तीत्वाला ओळखून त्याच्या गुणसंपदेला योग्य तो न्याय देता आला पाहिजे. तेव्हा मी असे म्हणू शकतो की खऱ्या अर्थाने उद्याची कौशल्य ही आविष्काराची रूप घेऊन व्यासांच्या मतीला आव्हाने देणारे ठरतील.



# हिन्दी विभाग

# डिजिटल कौशल और साहित्य

**देवांश बालाजी पाचंगे**
बी.ए. तृतीय वर्ष

मानव के हाथ आई तकनीक,
तो खुले विश्व ज्ञान के द्वार |
तकनीक के 'पर' लगाए,
साहित्य करें विश्व में मुक्त संचार |

मानव के जीवन में,
जब था घना अंधियारा |
साहित्य का दीपक तब,
करता है उजियारा |

पुस्तकों के चौकोन छोड़,
साहित्य को मिले मध्यम अपार |
ब्लॉग,फेसबुक, इंस्टाआदि,
डिजिटल कौशल से रोजगार |

तकनीकियों ने दी सुलभता,
साहित्य साधता मूल्य विकास |
मानव के लिए दोनों जरूरी,
एक है भूमि, एक आकाश |

बड़े-बूढ़े भी सिखने लगे,
यूट्यूब से कुछ नया पुराना |
डिजिटल कौशल आने से,
आसान हुआ कमाना |

डिजिटल कौशल से,
शोध-बोध की बदली ना परिभाषा |
माध्यम बदला है,
साहित्य सृजन होता रहेगा हमेशा |

साहित्य होगा उज्ञवल जब,
डिजिटल कौशल का मिलेगा सहारा |
ज्ञान विज्ञान संग समृद्ध,
होगी मानव के जीवन की धारा |

पग पग आगे बढ़ते साहित्य,
को मिली है आज तेज गति |
हे मानव तुम कब होंगे जागृत,
यह सवाल मेरा पुराना अति |

# नव कौशल के अंतर्गत: खेती,मिट्टी और रिश्ते

**वसंत कृष्णा कुलकर्णी**
बी.ए. तृतीय वर्ष

नव कौशल की राह पर चलता है आज किसान,
हाथों में अनुभव आंखों में सुनहरा आसमान |
मिट्टी की खुशबू में छिपा है जीवन का सार.
बीजों में बसता है उसका सपना अपार |

खेती अब केवल हल और बैल की बात नहीं,
तकनीक संग जुड़कर बढ़ती है हरियाली यही |
प्रकार के कौशल सीखना भी आवश्यक हो गया है। इसी को नव कौशल कहा जाता है। नया कौशल का अर्थ है समय और तकनीक के अनुसार नए प्रकार के कौशल सीखना। वर्तमान समय में उद्योग व्यापार और सेवा क्षेत्र में नई तकनीक का उपयोग तेजी से बढ़ रहा है। इसलिए युवाओं को भी आधुनिक कौशल सीखना आवश्यक हो गया है।

नव कौशल का महत्व आधुनिक समाज में बहुत अधिक है। वर्तमान समय में कंपनियों और उद्योगों को ऐसे कर्मचारियों की आवश्यकता होती है जो नई तकनीक और आधुनिक कार्य प्रणाली को समझ सके। नव कौशल के लाभ में युवाओं को रोजगार के अधिक अवसर प्राप्त होते हैं। नव कौशल में बेरोजगारी की समस्या कम होती है। कौशल के अंतर्गत व्यक्ति आत्मनिर्भर और आत्मविश्वासी बनता है। उद्योगों को कुशल और प्रशिक्षित कर्मचारी मिलते हैं। नया कौशल के आधार से देश की आर्थिक और सामाजिक प्रकृति होती है। इस प्रकार नव कुशल व्यक्ति और राष्ट्र दोनों के विकास के लिए आवश्यक है।

नव कौशल और सरकारी नीतिया ं आधुनिक समाज के विकास के लिए अत्यंत आवश्यक है। नव कौशल में उचित प्रशिक्षण और अवसर मिलते हैं। इससे युवा न केवल स्वयं का विकास कर सकते हैं बल्कि देश की प्रगति में भी महत्वपूर्ण योगदान दे सकते हैं। इसलिए सरकार शैक्षणिक संस्थाओं और समाज को मिलकर कौशल विकास को बढ़ावा देते हैं।

आज के समय में तकनीक और उद्योग तेजी से बदल रहे हैं। बदलते दौर में युवाओं को केवल पारंपरिक शिक्षा ही नहीं बल्कि नए कौशल सीखना भी आवश्यक हो गया है। नया कौशल से मतलब है जैसे नए कौशल्या जो आधुनिक उद्योग, तकनीक और सेवाओं में काम आते हैं जैसे डिजिटल कौशल आर्टिफिशियल इंटेलिजेंस डेटा विश्लेषण और आधुनिक तकनीक की कार्य। सरकार भी यह समझता है कि यदि युवाओं को सही कौशल दिया जाए तो रोजगार के अवसर बढ़ सकते हैं और देश की अर्थव्यवस्था मजबूत हो सकती है। इसलिए सरकार ने नीतियों और योजनाएं शुरू की है।

नए कौशल की विकास के लिए सरकारी नीतिया ं भी बहुत है। भारत सरकार ने युवाओं को कौशल प्रदान करने के लिए कई योजनाएं शुरू की है। इसमें स्किल इंडिया मिशन इस मिशन का उद्देश्य युवाओं को विभिन्न क्षेत्रों में कौशल प्रशिक्षण देना है। इसमें नव कौशल में अनेक बहुत सारी योजनाएं शुरू की है। नए कौशल में विकास की चुनौतिया ं है, इसमें ग्रामीण क्षेत्र में प्रशिक्षण संस्थानों की कमी है ऐसा उदाहरण नव कौशल में है।

नव कौशल की विकास की चुनौतियों में जागरूकता का अभाव भी है। और इसमें प्रशिक्षण और उद्योग के बीच में अंतर भी दिखाई देता है। और इस विकास की चुनौतियों में तकनीकी संसाधनों की कमी भी है। इसलिए इन चुनौतियों को दूर करना आवश्यक है ताकि कौशल विकास कार्यक्रम अधिक प्रभावी बना सके।

नव कौशल में आधुनिक कौशल और उचित प्रशिक्षण दिया जाता है। और सरकारी नितियोंद्वारा योजनाएं इस दिशा में महत्वपूर्ण कदम है। आवश्यकता है कि इन योजनाओं का सही तरीके से क्रियान्वयन हो और अधिक से अधिक युवाओं तक इनका लाभ पहुंचे। नव कौशल केवल एक विकल्प नहीं है बल्कि एक आवश्यकता बन गया है। सरकार ने इस आवश्यकता को पहचानते हुए कई महत्वपूर्ण नीतियों और योजनाएं लागू की है।



# सामाजिक शास्त्रे विभाग

# सोशल मीडिया : उत्पन्नाची संधी

**निकिता शिवकुमार गायकवाड**
बी ए प्रथम वर्ष

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही, तर ते उत्पन्नाचे एक मोठे व्यासपीठ बनले आहे. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे जगभरातील लोक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर, व्यवसाय, मार्केटिंग आणि कमाई साठीही करत आहेत. त्यामुळे सोशल मीडियामुळे अनेक नवीन रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

सर्वप्रथम सोशल मीडियावर कंटेंट क्रिएशन ही मोठी उत्पन्नाची संधी बनली आहे. अनेक लोक व्हिडिओ, फोटो, ब्लॉग किंवा माहितीपूर्ण पोस्ट तयार करून त्यांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करतात. जर त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर प्रेक्षक मिळाले तर जाहिराती, ब्रँड प्रमोशन आणि स्पॉन्सरशिप मधून त्यांना उत्पन्न मिळू शकते. अनेक युवक आज युट्युब, इंस्टाग्राम किंवा फेसबुकच्या माध्यमातून लाखो रुपये कमवत आहेत. यासाठी सृजनशीलता सातत्य आणि प्रेक्षकाशी संवाद ठेवणे आवश्यक असते.

दुसरे म्हणजे सोशल मीडिया, इन्फ्लुएंसर ही नवी करिअर संधी निर्माण झाली आहे. काही व्यक्ती त्यांच्या विशेष कौशल्यामुळे किंवा लोकप्रियतेमुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फॉलोवर्स मिळवतात. अशा व्यक्तींना कंपन्या त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी आमंत्रित करतात. यामुळे इन्फ्लुएन्सर्सना जाहिराती आणि ब्रँड प्रमोशन मधून चांगले उत्पन्न मिळते. फॅशन फिटनेस, प्रवास शिक्षण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये अनेक इन्फ्लुएन्सर्स यशस्वी झालेले दिसतात.

तिसरे म्हणजे ऑनलाईन व्यवसायासाठी सोशल मीडिया हे अत्यंत प्रभावी साधन बनले आहे. अनेक लहान लहान उद्योग गृहउद्योग आणि स्टार्टअप सोशल मीडियाचा वापर करून त्यांच्या उत्पादनांची विक्री करतात. उदाहरणार्थ घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला, वस्तू, कपडे, दागिने किंवा सौंदर्य प्रसाधने याची जाहिरात सोशल मीडियावर करून, ग्राहकापर्यंत सहज पोहोचवता येते. यामुळे कमी खर्चात व्यवसाय सुरू करता येतो. आणि बाजारपेठ मोठी होते.

चौथी म्हणजे सोशल मीडिया मार्केटिंग आणि डिजिटल मार्केटिंग या क्षेत्रातही रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. अनेक कंपन्या त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी सोशल मीडिया कंटेंट रायटर ग्राफिक्स डिझायनर आणि डिजिटल मार्केटर्स यासारख्या नोकऱ्याची मागणी वाढत आहे.

त्यामुळे युवकांना नवीन कौशल्य शिकून या क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळत आहे. तथापि, सोशल मीडियाचा वापर करताना काही आव्हानेही आहेत. खोटी माहिती, वेळेचा अपव्यय, गोपनीयता आणि मानसिक ताण यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने आणि मर्यादित करणे आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि नैतिकतेचा विचार करून सोशल मीडियाचा वापर केला तर त्यातून सकारात्मक परिणाम मिळू शकतात.

शेवटी, सोशल मीडिया हे आजच्या काळातील उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन बनले आहे. त्यामुळे अनेक लोकांना रोजगार आणि स्वावलंबनाची संधी मिळाली आहे. योग्य कौशल्य, मेहनत आणि सृजनशीलतेच्या जोरावर सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठे यश मिळवता येते. त्यामुळे भविष्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्पन्नाच्या संधी आणखी वाढतील, असे निश्चितपणे म्हणता येईल.

सोशल मीडिया म्हणजे आजच्या डिजिटल युगातील एक शक्तिशाली माध्यम आहे. त्यामुळे लोकांना एकमेकांशी जोडले जाते, विचार सामायिक केले जातात, आणि व्यवसायांना त्यांच्या उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्याची संधी मिळते. सोशल मीडियावर उत्पन्न मिळवण्याच्या अनेक संधी आहेत, ज्यामुळे लोकांना त्यांच्या रुचीनुसार आणि कौशल्यानुसार पैसे कमवता येतात.



# उत्पन्नाच्या संधी आणि सोशल मीडिया

**ऐश्वर्या दत्तात्रय यादव**
बी. ए. द्वितीय वर्ष

आजच्या २१ व्या शतकात सोशल मीडिया हे केवळ गप्पा मारण्याचे किंवा फोटो शेअर करण्याचे साधन राहिले नसून ते ' डिजिटल क्रांती' चे एक मुख्य केंद्र बनले आहे. पूर्वी विद्यार्थी फावल्या वेळेत केवळ मनोरंजनासाठी सोशल मीडियाचा वापर करायचे, परंतु आता या माध्यमाचा सकारात्मक वापर करून अनेक विद्यार्थी स्वतःचा खर्च स्वतः उचलत आहेत.

आजचे जग हे माहिती तंत्रज्ञानाचे जग आहे. एकेकाळी केवळ रिकाम्या वेळेत मनोरंजनासाठी वापरले जाणारे सोशल मीडिया आता ' डिजिटल अर्थव्यवस्थेचा' मुख्य कणा बनले आहे. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सांभाळून आर्थिक स्वावलंबन मिळविण्याचे हे एक प्रभावी माध्यम ठरत आहे. एकेकाळी केवळ मित्र-मैत्रिणींशी गप्पा मारण्यासाठी किंवा फोटो शेअर करण्यासाठी वापरले जाणारे सोशल मीडिया आता उत्पन्नाचे एक अत्यंत प्रभावी आणि मोठे माध्यम बनले आहे.

आजच्या युगात फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्युब ही डिजिटल करिअरची मुख्य केंद्रे बनली आहेत. यातून आजची पिढी मोठ्या प्रमाणावर पैसा कमवत आहे.

**उत्पन्नाचे प्रमुख मार्ग :**

**कंटेंट क्रिएशन**

जर तुमच्याकडे एखादी कला किंवा कौशल्य असेल उदाहरणार्थ गायन, अभिनय, कोडींग किंवा शैक्षणिक माहिती इत्यादी. तर तुम्ही युट्युब किंवा इंस्टाग्राम वर त्याचे व्हिडिओ शेअर करू शकता. एकदा तुमचे फॉलोवर्स किंवा सबस्क्राईब वाढले की जाहिरातीच्या माध्यमातून तुम्हाला चागंले उत्पन्न मिळणे सुरू होते. तुम्ही तुमचे दररोजचे आयुष्य दाखवून सुद्धा पैसे कमवू शकता. त्याला डेली ब्लॉग्स असे म्हणतात.

शैक्षणिक माहिती, शेती विषयक सल्ले, स्वयंपाक किंवा तंत्रज्ञान अशा कोणत्याही विषयात तुमचे प्रभुत्व असेल, तर जगभरातील प्रेक्षक तुमचे ग्राहक बनू शकतात.

**इन्फ्लुयेन्सर मार्केटिंग**

जर तुमच्याकडे एखाद्या विषयातील कौशल्य आणि मोठ्या प्रमाणात फॉलोवर्स असतील तर विविध ब्रँड्स त्याांच्या जाहिरातींसाठी तुमच्याशी करार करतात. हे आधुनिक मार्केटिंगचे एक प्रभावी रूप आहे. इंस्टाग्राम किंवा इतर प्लॅटफॉर्मवर तुमचे फॉलोवर्स जास्त असल्यास विविध कंपन्या त्याांच्या उत्पादनांच्या जाहिरातींसाठी तुम्हाला पैसे देतात. इन्फ्लुएन्सर

मार्केटिंग ही आजच्या डिजिटल युगातील एक अत्यंत प्रभावी आणि लोकप्रिय संकल्पना आहे.

जेव्हा एखादी कंपनी किंवा ब्रँड त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी सोशल मीडियावरील लोकप्रिय व्यक्तींची मदत घेतात. तेव्हा त्याला ' इन्फ्लुएन्सर मार्केटिंग' असे म्हणतात. हे आधुनिक जाहिरातबाजीचे एक प्रमुख रूप आहे. आज अनेक तरुण ' इन्फ्लुएन्सर' म्हणून नाव कमावून लाखो रुपये कमवत आहेत. एखाद्या विशिष्ट विषयात उदाहरणार्थ- शिक्षण, फॅशन, टेक्नॉलॉजी, कौशल्य असल्यास, यांच्या जाहिरातीसाठी तुमच्याशी संपर्क साधतात या कामातून आज अनेक लोकाचे घर चालते व लोकांना अनेक ठिकाणांची माहिती मिळते. जर लोकांचा तुमच्यावर विश्वास असेल तर ते तुम्हाला फॉलो करतात. व नंतर तुम्ही जे सांगाल ते प्रॉडक्ट घेण्याचा प्रयत्न करत असतात. आणि या कामातून आताचे विद्यार्थी खूप मोठ्या प्रमाणावर पैसे कमवत आहेत.

### ॲफिलिएट मार्केटिंग

ॲफिलिएट मार्केटिंग हा पण आत्ताच्या युगात पैसे कमवण्याचा एक चांगला मार्ग बनला आहे. यात आपल्याला एखाद्या उत्पादनाची लिंक आपल्या प्रोफाईलवर शेअर करून त्या लिंक वरून जर कोणी खरेदी केली तर त्याचे ठराविक कमिशन मिळते. ' ई-कॉमर्सच्या' युगात हा उत्पन्नाचा एक अत्यंत सोपा आणि प्रभावी मार्ग आहे.

कंपन्यांच्या उत्पादनांची लिंक शेअर करून, त्याद्वारे होणाऱ्या विक्रीवर कमिशन मिळवणे हा एक प्रभावी मार्ग आहे. आपण जे व्हिडिओ पाहतो तेव्हा जर आपल्याला त्यांनी दिलेली किंवा दाखवलेली वस्तू आवडते तेव्हा ते त्या वस्तूची लिंक त्यांनी टॅग केलेली असते जर ती आपल्याला आवडली तर आपण खरेदी करू शकतो. आजच्या युगात लाखो लोक व्हिडिओ करून सोशल मीडियावर टाकतात. परंतु प्रत्येकाला यश मिळते असे नाही. ज्यांना मिळते ते याद्वारे खूप मोठ्या प्रमाणावर पैसे कमवत आहेत.

### सोशल मीडिया मॅनेजमेंट

अनेक व्यावसायिक आणि संस्थांना त्यांचे डिजिटल अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी तज्ञांची गरज असते तेथे सोशल मीडिया मॅनेजर म्हणून काम करण्याची मोठी संधी आहे. अनेक छोटे मोठे व्यावसायिक किंवा सेलिब्रिटींना त्यांचे सोशल मीडिया अकाउंट्स सांभाळण्यासाठी वेळेची कमतरता असते. अशावेळी 'सोशल मीडिया मॅनेजर' म्हणून काम करून त्यांच्या पोस्ट शेड्युल करणे ग्राफिक डिझाईन करणे आणि प्रेक्षकांशी संवाद साधणे यातून चांगला पगार किंवा फी घेता येते.

### स्वतःच्या कौशल्यांची विक्री

जर तुम्ही शिक्षक असाल किंवा इतर काही करत असाल तर तुम्ही तुमचे ऑनलाईन कोर्सेस किंवा प्रॉडक्ट विकू शकता. जर तुम्ही कलाकार असाल तर तुमची चित्रे किंवा हस्तकला सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट ग्राहकांना विकू शकतात. 'इंस्टाग्राम शॉप' सारखी फीचर्स यासाठी खूप फायदेशीर ठरतात.

### ब्रँड कन्सल्टिंग आणि जाहिरात तज्ञ

सोशल मीडियावर 'पेड जाहिराती' (फेसबुक ॲड /गुगल ॲड) कशा चालवायच्या याचे ज्ञान असल्यास, तुम्ही कंपन्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सल्लागार म्हणून काम करू शकता.

### निष्कर्ष

सोशल मीडिया हे एक दुधारी शस्त्र आहे. पण जर त्याचा वापर ' कौशल्य' म्हणून केला, तर ते भविष्यातील एक सुरक्षित आणि प्रगतशील करिअर होऊ शकते.

# अभ्यासक्रमातील बदल व उद्याची कौशल्य

**वेदवती रामहरी माने**
बी. ए. द्वितीय वर्ष

जागतिक बदलानुसार शिक्षण पद्धतीत क्रांतिकारक बदल होत असून आता केवळ पुस्तकी ज्ञान ऐवजी प्रत्यक्ष जीवन कौशल्य आणि तंत्रज्ञान शिक्षणावर भर दिला जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) नुसार, समस्या निवारण, डिजिटल साक्षरता, सृजनशील आणि व्यावसायिक कौशल्य आत्मसात करणे भविष्यातील करिअरसाठी अनिवार्य झाले आहे. ज्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी बनतील.

21 वे शतक हे तंत्रज्ञान आणि वेगाने बदलणाऱ्या ज्ञानाचे शतक आहे. जुन्या काळातील केवळ पाठांतरावर आधारित शिक्षण आता कालबाह्य झाले आहे. आजची गरज 'नोकरी मागणारा' नव्हे तर 'नोकरी देणारा' विद्यार्थी तयार करणे आहे. त्यामुळे अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल करणे गरजेचे झाले आहे.

आजचा काळ हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा काळ आहे. जगामध्ये झपाट्याने बदल होत आहेत आणि त्या बदलानुसार शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत अभ्यासक्रमात अनेक बदल केले जात आहेत. या बदलांचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्य देणे हा आहे.

पूर्वीच्या काळी शिक्षण पद्धती मुख्यतः पाठांतरावर आधारित होती, विद्यार्थ्यांनी पुस्तकातील माहिती लक्षात ठेवून परीक्षा देणे यावर भर दिला जात होता. परंतु आजच्या या स्पर्धात्मक जगात केवळ पाठांतर पुरेसे नाही. विद्यार्थ्यांनी समजून घेणे, विचार करणे, प्रश्न विचारणे आणि समस्यांची निवारण करणे ही कौशल्य आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नवीन अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. आजच्या अभ्यासक्रमात 'तंत्रज्ञानाचा वापर' प्रात्यक्षिक शिक्षण, प्रकल्पाधारीत शिक्षण आणि डिजिटल कौशल्य, संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, टीमवर्क आणि नवकल्पना यासारखी कौशल्य आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाची मानली जातात. या कौशल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये नोकरीची संधी अधिक मिळू शकते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढण्यास मदत होते. ही कौशल्य नोकरीच नव्हे तर नवीन उद्योजक तयार करू शकतात. स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी ही उपयुक्त ठरतात.

अभ्यासक्रमातील बदलामुळे विद्यार्थ्यांना

केवळ पुस्तकातील ज्ञान मिळत नाही, तर प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारे अनुभवही मिळतात. यामुळे विद्यार्थी अधिक सक्षम, जागरूक, जबाबदार आणि आत्मनिर्भर बनतात. तसेच समाजाच्या आणि देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. म्हणूनच असे म्हणता येईल की, अभ्यासक्रमातील बदल आणि उद्याची कौशल्य याचा एकमेकांशी कनिष्ठ संबंध आहे. आधुनिक युगाच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षण व्यवस्थेत केलेले बदल हे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

नवीन अभ्यासक्रमात झालेले बदल केवळ सिद्धांताऐवजी प्रत्यक्ष कृती आणि प्रयोगावंर भर देण्यात आला. तंत्रज्ञानामुळे डिजिटल साधनांचा, कोडींगचा आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (AI) प्राथमिक अभ्यासक्रम यांचा देखील समावेश केला गेला. व्यावसायिक कौशल्यामुळे शालेय स्तरापासूनच कौशल्य विकास(Vocational Training) सुरू करणे. व्यक्तिमत्व विकास, नैतिक मूल्य आणि जीवन कौशल्य(Life Skills) यांचा समावेश करण्यात आला आहे.

भविष्यातील जगामध्ये /स्पर्धेच्या जगामध्ये टिकून राहण्यासाठी अनेक कौशल्यांची आवश्यकता आहे. जसे समस्यांचे निवारण करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता असणे गरजेचे आहे. संगणक, डेटा विश्लेषण आणि सायबर सुरक्षा या महत्त्वाच्या बाबी आहेत. आपल्याकडे संवाद साधण्याचे कौशल्य (Communication Skill) असायला हवे. आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता असायला हवी. अनुकूल आणि लवचिकता- बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची क्षमता सर्वांमध्ये सामावून जाण्याची क्षमता, सृजनशीलता(creativity) नवीन कल्पना शोधणे अत्यंत आवश्यक आहे.

अभ्यासक्रमातील बदल विद्यार्थ्यांना भविष्यातील गरजांसाठी तयार करतात. योग्य कौशल्य विकसित केल्यास विद्यार्थी केवळ चांगले शिक्षितच होत नाहीत तर ते समाजासाठी उपयुक्त नागरिक बनतात. त्यामुळे शिक्षणामध्ये कौशल्याधारित, तंत्रज्ञानाधारित आणि अनुभवाधारित शिक्षण पद्धतीचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.

अभ्यासक्रमातील हे बदल विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना उद्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवतात. तंत्रज्ञान आणि मानवी कौशल्य याचा योग्य मेळ घातल्यास भारत नक्कीच जागतिक पातळीवर एक महासत्ता म्हणून उभा राहील. शिक्षण हे आता केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून ते जीवन जगण्याचे आणि यशस्वी होण्याचे माध्यम बनले आहे.

# तंत्रज्ञान कौशल्ये आणि साहित्य

**मुक्ताई धनराज उजळंबे**
बी. ए. द्वितीय वर्ष

आधुनिक तंत्रज्ञान हे साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वाचे साधन बनले आहे. ज्यामुळे साहित्य निर्मिती, वितरण आणि वाचन या प्रक्रिया अधिक सोप्या आणि वेगवान झाल्या आहेत. डेस्कटॉप पब्लिशिंग पासून इंटरनेट पर्यंत तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन व्यासपीठे दिली आहेत. वाचकांना साहित्य उपलब्ध करून दिले आहे. त्याचबरोबर साहित्याला एक नवीन स्वरूप दिले आहे. मराठी साहित्य ही महाराष्ट्रातील मराठी भाषेत रचलेली एक समृद्ध कलाकृती आहे. त्यात लोकगीते, गद्य आणि कविता यांचा समावेश होतो. तंत्रज्ञान हे केवळ मराठी भाषेला अभिव्यक्तीचे साधन देत नाही तर, माहितीचा संग्रह, सादरीकरण आणि प्रसारातही मदत करते. ज्यामुळे साहित्याचा विस्तार होतो.

मराठी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञान याचे एक



अतूट नाते आहे. कारण भाषेचा विकास हा तंत्रज्ञानाच्या साह्याने होत जातो. तंत्रज्ञान जसे विकसित होते, तशी तशी भाषा विकसित होते. साहित्य व तंत्रज्ञान याचे संबंध हे सृजन व अभिव्यक्तीच्या साधनांमधील संबंध आहेत. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावर भाषेचा विकास करणे शक्य आहे. मराठी भाषेच्या संदर्भात आपणास विचार करावयाचा झाल्यास, आपली भाषा ही ज्ञानभाषा होणे अत्यंत गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून भाषेला विकसित करणे सहज शक्य आहे.

मराठी साहित्य म्हणजे मराठी भाषेत निर्माण झालेले मौखिक आणि लिखित साहित्य होय. ज्यामध्ये कविता, कादंबऱ्या, लोकगीते, अभंग, पोवाडे आणि इतर अनेक प्रकारांचा समावेश असतो.

**मौखिक साहित्य:**

मौखिक साहित्य म्हणजे बोलून किंवा गाऊन प्रसारित केले जाणारे साहित्य होय, ज्यामध्ये चालत आलेल्या कथा, दंतकथा, म्हणी आणि मंत्र यांचा समावेश आहे. हे साहित्य लिखित स्वरूपात नसून तोंडी परंपरेने जपले जाते. आणि पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होते. ज्यामुळे मराठी संस्कृती आणि परंपरेची समृद्ध वारसा जपला जातो.




**लिखित साहित्य:**

लिखित साहित्य म्हणजे मराठी भाषेत लिहिलेल्या कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके, प्रवासवर्णने, चरित्र आणि आत्मचरित्रांसारख्या विविध प्रकारच्या रचनांचा संग्रह होय.यामध्ये अनेक नाटके आणि खंडकाव्य यांचा समावेश आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान:**

तंत्रज्ञानाला अनुकूल आपले साहित्य करण्यापेक्षा साहित्याला अनुकूल असे तंत्रज्ञान आपण जर केले तर साहित्य खूप प्रगतीपथावर जाणे शक्य आहे. त्यासाठी साहित्याचे लोकशाहीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. जगभरातील अनेक देशांचा अभ्यास केल्यास आपणास असे दिसून येते की आपल्यापेक्षा कितीतरी कमी लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये माहिती तंत्रज्ञानाला आपल्या साहित्यानुसार बदल करण्यास तेथील लोकांनी भाग पाडले आहे.

आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे नवनवीन वैज्ञानिक शोधांचा वापर करून तयार केलेली साधने, यंत्रे, पद्धती आणि प्रणाली होय. तंत्रज्ञान आपल्या दैनंदिन जीवन, शिक्षण, उद्योग, शेती, आरोग्य, वाहतूक, संवाद या सर्व क्षेत्रात वापरले जाते. आजचा काळ जागतिकीकरणाचा आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वेगामुळे संस्कृती, भाषा, व्यापार, सेवा, यांचा देवाणघेवाणी बरोबरच विविध भाषेतील साहित्य सुद्धा सातासमुद्रापलीकडे अगदी सहज उपलब्ध होणे, सहज शक्य झाल्याचे दिसून येते.

# कौशल्य आधारित शिक्षण व स्टार्टअप संस्कृती

**पुनम सुरेश राठोड**
बी. ए. द्वितीय वर्ष

कौशल्य आधारित स्टार्टअप संस्कृती म्हणजे नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवहारीक कौशल्यांची जोड देऊन निर्माण केलेली परिसंस्था होय. हे स्टार्टअप तरुणांना तांत्रिक व सॉफ्ट स्किल्स देऊन आत्मनिर्भर बनवतात. त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात. डिजिटल इंडिया आणि स्किल इंडिया मुळे डिजिटल साक्षरता, AI आणि डेटा सायन्स सारख्या क्षेत्रात नवउद्योजक तयार होत आहेत.

21 व्या शतकात भारताची ओळख जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टीम अशी झाली आहे. पारंपरिक उद्योगांच्या पलीकडे जाऊन, जेव्हा एखादी नाविन्यपूर्ण कल्पना( idea) आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक तांत्रिक कौशल्य एकत्र येतात, तेव्हा कौशल्य आधारित स्टार्टअप जन्माला येतात. ही संस्कृती केवळ नफा कमवणाऱ्या नाही तर समस्यांचे निराकरण आणि कौशल्य विकास करण्यावर भर देते.

स्टार्टअप संस्कृती(Startup culture) म्हणजे नवनिर्मिती, लवचिकता, जोखीम पत्करण्याची वृत्ती आणि वेगवान विकासावर आधारित कार्य संस्कृती होय. ही संकल्पना पारंपरिक व्यवसायापेक्षा वेगळी असून, मुक्त संवाद, सृजनशीलता आणि सामूहिक जबाबदारीवर भर देते. भारतात डिजिटल क्रांतीमुळे स्टार्टप्सने मोठी भरारी घेतली असून, आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीत ते महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**कौशल्य विकासाचे महत्त्व:**

स्टार्टअप्स मध्ये काम करताना कर्मचाऱ्याना बहु कौशल्य शिकावे लागते. कौशल्य विकास म्हणजे अंगभूत गुणांना प्रशिक्षण व शिक्षणाद्वारे विकसित करून अत्याधुनिक काळासाठी सक्षम बनवणे होय. हे करिअरमध्ये वाढ, चांगली नोकरी किंवा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ते उत्पादकता वाढवते, स्पर्धात्मक युगात टिकून ठेवते आणि व्यक्तीला आत्मविश्वासी व स्वावलंबी बनवते.

केवळ तांत्रिक ज्ञान (Hard Skill) नाही, तर संवाद कौशल्य, टीमवर्क आणि निर्णय क्षमता विकसित होते. आजचे स्टार्टअप्स हे शिकण्याचे केंद्र बनले आहेत. जेथे नवीन तरुण तंत्रज्ञान शिकून स्वतःला भविष्यासाठी सक्षम बनवत आहेत.

**तांत्रिक कौशल्य :**

AI , मशीन लर्निंग, क्लाऊड कम्प्युटिंग आणि डिजिटल मार्केटिंग. समस्या निवारण- दैनंदिन समस्यांवर नाविन्यपूर्ण तोडगा काढणे ,अनुकूलन क्षमता- वेगाने बदलणाऱ्या बाजारपेठेनुसार स्वतःला बदलणे, बूट स्ट्रेपिंग- मर्यादित संसाधनांचा वापर करून जास्तीत जास्त परिणाम साधणे.

उच्च अपयश दर हे मोठे आव्हान असले तरी, ही संस्कृती शिकण्याची प्रवृत्ती वाढवते. युनिकॉन

कंपन्या हे सिद्ध करतात की, योग्य कौशल्य आणि कल्पकतेचा वापर केल्यास यश निश्चित आहे. 'स्टार्टअप्स' इंडिया 'आणि 'स्किल इंडिया' सारख्या उपक्रमांनी या संस्कृतीला बळकट केले आहे.Digital India, UPI, आणि आधार मुळे स्टार्ट अप्सना पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. ज्यामुळे ग्रामीण भागात तरुणही डिजिटल कौशल्यांचा वापर करून स्टार्टअप्स सुरू करत आहेत. कौशल्य आधारित संस्कृती भारताला 'नोकरी मागणारा' ऐवजी 'नोकरी देणारा' देश बनवत आहे. नवीन पिढी आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाला कौशल्य आणि नाविन्यपूर्णतेच्या जोरावर प्रत्यक्षात आणत आहे.

नवनिर्मिती आणि सृजनशीलता मध्ये स्टार्ट अप्स नेहमीच नवीन कल्पना आणि समस्यांवर स्मार्ट उपाय शोधण्यावर भर देतात, अनौपचारिक वातावरणाच्या कार्पोरेट संस्कृतीच्या विरुद्ध येथे पदानुक्रम कमी असतो आणि संवाद मुक्त असतो. जोखीम घेण्याची क्षमता ही अपयशाला घाबरून न जाता चाचणी आणि त्रुटी पद्धतीने शिकण्यावर भर दिला जातो. जलद विकास हे व्यवसाय वेगाने कौशल्याधारित होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतात.

नाही केवळ पदवीचे ओझे,
कौशल्य शिक्षणाने उघडू ज्ञानाचे दरवाजे,
कृतीतून शिकू अनुभवातून घडू,
उद्याच्या जगात सन्मानाने चालू

स्टार्टअप इंडिया उपक्रमामुळे, भारत आता जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप्स इकोसिस्टीम बनला आहे. आरोग्य, शिक्षण, इ- कॉमर्स आणि फिनटिक अशा विविध क्षेत्रात युनिकॉन कंपन्यांची संख्या वेगाने वाढत आहे. स्टार्टअप्स संस्कृती केवळ व्यवसाय सुरू करणे नाही, तर ती एक विचारसरणी आहे. ती तरुणांना नोकरी शोधणाऱ्याऐवजी नोकरी देणारे बनण्यास प्रोत्साहित करते आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.



# सोशल मीडिया : उत्पन्नाचे प्रभावी माध्यम

**ऋतुजा शरद सूर्यवंशी**
बी. ए. प्रथम वर्ष

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर ते उत्पन्न मिळवण्याचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे अनेक लोक सोशल मीडियाचा उपयोग करून स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होत आहेत.

आज फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब आणि व्हाट्सअप सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे लोकांना आपली कला, कौशल्य आणि व्यवसाय जगासमोर मांडण्याची संधी मिळते. अनेक तरुण या माध्यमांवर व्हिडिओ, फोटो किंवा माहितीपूर्ण पोस्ट शेअर करून प्रसिद्धी मिळवतात आणि त्यातून उत्पन्नही मिळवतात.

उदाहरणार्थ, काही लोक युट्युब वर शैक्षणिक व्हिडिओ, स्वयंपाक, प्रवास किंवा तंत्रज्ञानाविषयी माहिती देतात. त्याचे चैनल लोकप्रिय झाल्यानंतर त्यांना, जाहिराती स्पॉन्सरशिप आणि प्रमोशन मधून पैसे मिळतात. तसेच इंस्टाग्राम वर अनेक लोक आपली उत्पादने विकतात, ब्रँड प्रमोशन करतात आणि ऑनलाइन व्यवसाय करतात.

सोशल मीडियामुळे छोट्या उद्योजकांनाही बाजारपेठेत पोहोचण्यासाठी संधी मिळाली आहे. घरबसल्या ऑनलाईन व्यवसाय सुरू करणे आज खूप सोपे झाले आहे. यामुळे अनेक युवक युवती आणि गृहिणी आर्थिक दृष्ट्या सक्षम होत आहेत.

सोशल मीडियावर उत्पन्न मिळवण्याचे काही प्रमुख मार्ग आहेत. त्यापैकी एक म्हणजे कंटेंट क्रिएशन, लोक प्रशिक्षण, स्वयंपाक, शेती, तंत्रज्ञान,



विनोद किंवा प्रवास यासारख्या विषयावर व्हिडिओ किंवा पोस्ट तयार करतात. अशा चॅनलला मोठी प्रेक्षक संख्या मिळाली की जाहिरातीमधून पैसे मिळू लागतात.

दुसरा मार्ग म्हणजे ब्रँड प्रमोशन किंवा स्पॉन्सरशिप. अनेक कंपन्या त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी लोकप्रिय सोशल मीडिया सरशी त्या उत्पादनाची माहिती देतात आणि त्याबद्दल त्यांना पैसे मिळतात.

यूट्यूब चैनल म्हणजेच युट्युब हे उत्पन्नाचे सर्वात मोठे स्रोत मानले जाते. Google Adsense: व्हिडिओवर येणाऱ्या जाहिरातीद्वारे आपण डॉलर्समध्ये कमाई करू शकतो. Affiliate Marketing व्हिडिओच्या डिस्क्रिप्शन मध्ये वस्तूंच्या लिंक देऊन त्या विक्रीतून कमिशन मिळवता येते.

सोशल मीडियाद्वारे सोशल मीडिया मॅनेजर असाही व्यवसाय करता येतो. जसे अनेक छोटे-छोटे व्यवसायिक, सेलिब्रिटी आणि राजकारणी यांना त्यांचे सोशल मीडिया हँडल सांभाळण्यासाठी जाणकाराची गरज असते.

सोशल मीडियाद्वारे ऑनलाईन कोर्सेस आणि कन्सल्टन्सी करता येते. तुमच्याकडे विशेष ज्ञान असेल तर तुम्ही त्याचे कोर्सेस विकू शकता. सोशल मीडियाचा वापर करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकता आणि पैसे लावून बेबिनार किंवा वर्कशॉप्स घेऊ शकता.

मात्र सोशल मीडियाचा वापर करताना जबाबदारीने आणि योग्य पद्धतीने वापर करणे गरजेचे आहे. चुकीची माहिती पसरवणे किंवा वेळेचा अपव्यय टाळणे आवश्यक आहे. गोपनीयतेचा अभाव यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने आणि सकारात्मक हेतूने करणे आवश्यक आहे.

एकूणच सोशल मीडिया हे केवळ संवादाचे साधन नसून उत्पन्न आणि करिअर घडवण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. आजचे तरुण सोशल मीडियाच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनत आहेत.



# स्टार्टअप  व कौशल्य आधारित शिक्षण

**सानिका कृष्णकुमार बांगड**
बी. ए. प्रथम  वर्ष

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात पारंपरिक शिक्षण पद्धती सोबत कौशल्य आधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्याकडे प्रत्यक्ष काम करण्याचे कौशल्य असणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने शिक्षणामध्ये कौशल्य विकास उद्योजकता आणि नवोपक्रम यांना प्राधान्य दिले आहे.

कौशल्य आधारित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी दिली जाते. तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता डिजिटल सुरक्षितता आणि टीमवर्क यांसारख्या गुणांचा विकास केला जातो. यामुळे विद्यार्थी नोकरी शोधणारे न राहता नोकरी निर्माण करणारे बनू शकतात.

याच ठिकाणी स्टार्टअप संस्कृती भूमिका



महत्त्वाची ठरते. नवीन कल्पना, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि बाजारातील गरज ओळखून स्वतःचा व्यवसाय उभारण्याची वृत्ती म्हणजेच स्टार्टअप संस्कृती. भारतात स्टार्टअप इंडिया सारख्या उपक्रमामुळे तरुणांना आर्थिक मदत, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळत आहे. त्यामुळे अनेक युवक युवती स्वतःचे उद्योग सुरू करून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहेत.

कौशल्य आधारित शिक्षण आणि स्टार्टअप संस्कृती यांचा परस्पराशी घनिष्ठ संबंध आहे. शिक्षणातून मिळालेली कौशल्य उद्योजकतेसाठी भक्कम पाया घालतात तर स्टार्टअप संस्कृती विद्यार्थ्यांना सृजनशील विचार आणि धाडस करण्याची प्रेरणा देते.

एकूणच देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी कौशल्य आधारित शिक्षण व स्टार्टअप संस्कृती विद्यार्थ्यांना सृजनशील विचार आणि धाडस करण्याची प्रेरणा देते.

कौशल्य आधारित शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता त्यांना विविध व्यवहारिक कौशल्य शिकवणे यामध्ये तात्रिक कौशल्य, डिजिटल कौशल्य, संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, टीमवर्क आणि उद्योजकता यांचा समावेश होतो. अशा प्रकारचे विभाग



होतात.

स्टार्टअप संस्कृती म्हणजे नवीन कल्पनांवर आधारित उद्योग उभारण्याची प्रक्रिया. तरुण पिढी आज नोकरीच्या शोधात न राहता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकडे अधिक आकर्षित होत आहेत. नवीन तंत्रज्ञान ,डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नवकल्पना यांच्या सहाय्याने अनेक तरुणानी लहान कल्पनांपासून मोठ्या कंपन्या उभ्या केल्या आहेत. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात स्टार्टअप चा मोठा वाटा आहे.

कौशल्य आधारित शिक्षण हे स्टार्टअप संस्कृतीसाठी मजबूत पाया तयार करते. जेव्हा विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच समस्या ओळखणे, त्यावर उपाय शोधणे, प्रकल्प तयार करणे आणि कल्पनांची अंमलबजावणी करणे शिकवले जाते तेव्हा त्यांच्यात उद्योजकतेची भावना विकसित होते. उदाहरणार्थ एखादा विद्यार्थी तंत्रज्ञानाचे कौशल्य शिकला तर तो नवीन मोबाईल ॲप तयार करू शकतो किंवा डिजिटल सेवा सुरू करू शकतो. त्याचप्रमाणे कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यटन यासारख्या क्षेत्रातही अनेक स्टार्टप्स निर्माण होऊ शकतात.

भारतात सरकार देखील प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवत आहे.'स्टार्ट अप इंडिया', 'स्किल इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' यासारख्या उपक्रमामुळे तरुणांना प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि मार्गदर्शन मिळत आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्येही इनोवेशन सेल इनक्युबेशन सेंटर आणि उद्योजकता विकास कार्यक्रम सुरू करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतर करण्याची संधी मिळते.

कौशल्य आधारित शिक्षण आणि स्टार्टअप संस्कृती यामुळे केवळ रोजगार निर्मितीच होत नाही तर समाजातील अनेक समस्या सोडवण्याची संधीही निर्माण होते. उदाहरणार्थ शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, पर्यावरण पूरक उत्पादने तयार करणे किंवा ग्रामीण भागात डिजिटल सेवा उपलब्ध करून देणे यासारख्या कल्पना समाजासाठी उपयुक्त ठरतात.

# बदलते मानवी जीवन व नव कौशल्य

**सोनाली प्रल्हाद टेकाळे**
बी. ए. द्वितीय वर्ष

21 व्या शतकात मानवी जीवन वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान जागतिकीकरण आणि कोरोनानंतर काळानुसार जीवनशैलीत अभूतपूर्व बदल झाले आहेत. या बदलत्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नसून नव कौशल्य (New Skills) आत्मसात करणे अनिवार्य झाले आहे.

आजचे जीवन डिजिटल झाले आहे. कामाच्या पद्धती बदलल्या आहेत. Work from Home , ऑनलाइन शिक्षण, ई-कॉमर्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) मुळे मानवी जीवन सोपे झाले असले तरी, शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. तरी शारीरिक वाढती धावपळ ताण तणाव आणि डिजिटल व्यसनामुळे आरोग्य समस्या वाढत आहेत. निसर्गापासून मानवाचे दूर जाणे हे या बदलाचे मोठे आव्हान आहे.

आधुनिक युगात मानवी जीवनात झपाट्याने बदल होत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील प्रगतीमुळे जीवनशैली अधिक गतिमान झाली आहे. पूर्वीचे साधे, पारंपरिक जीवन आता डिजिटल आणि तंत्रज्ञानावर आधारित झाले आहे. मोबाईल आणि तंत्रज्ञानावर आधारित इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण, यामुळे जग एकमेकांच्या अधिक जवळ आले आहे. त्यामुळे बदलत्या मानवी जीवनाशी जुळवून घेण्यासाठी नव कौशल्यांची गरज निर्माण झाली आहे.

नव कौशल्य म्हणजे नवीन परिस्थितीनुसार विकसित केलेली कौशल्य. आजच्या काळात केवळ पुस्तकातील ज्ञान पुरेसे नसून संवाद कौशल्य, संगणकज्ञान, समस्या सोडवण्याची क्षमता, सृजनशीलता, वेळेचे व्यवस्थापन आणि संघभावना ही कौशल्य आवश्यक ठरली आहेत. डिजिटल साक्षरता हे आजचे महत्त्वाचे कौशल्य आहे. ऑनलाइन व्यवहार, ई लर्निंग, वर्क फ्रॉम होम यासाठी तांत्रिक ज्ञान गरजेचे आहे.

तसेच बदलत्या सामाजिक परिस्थितीत भावनिक बुद्धिमत्ता आणि सकारात्मक दृष्टिकोनही महत्त्वाचा आहे. स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी सतत नवीन गोष्टी शिकण्याची तयारी असावी लागते. आज अनेक नवीन व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. अनेक नवी कौशल्या आत्मसात करणे आवश्यक आहे.

कौशल्य आधारित शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, तांत्रिक कौशल्य या पार्श्वभूमीवर संस्कृती उदयास आली आहे. स्टार्टअप म्हणजे नवीन कल्पनेवर आधारित नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरू करणे. भारतात स्टार्ट अप इंडिया या उपक्रमामुळे तरुण उद्योजकांना

प्रोत्साहन मिळाले आहे. अटल इनोवेशन मिशन सारख्या उपक्रमामुळे नवकल्पना आणि उद्योजकता वाढीस लागली आहे. कौशल्य आधारित शिक्षणामुळे तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास मिळतो.

स्टार्टअप संस्कृतीमुळे रोजगार निर्मिती होते. नवीन तंत्रज्ञान विकसित होते. आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. तरुण पिढी नोकरी शोधणारी न राहता नोकरी देणारी बनते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्य उद्योजकवृत्ती जोपासणे गरजेचे आहे. आधुनिक युगात तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात मोठे परिवर्तन झाले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दैनंदिन व्यवहार अधिक सोयीस्कर व वेगवान आणि कार्यक्षम झाले आहेत. मोबाईल, संगणक, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या साधनांनी जग जवळ आले असून संवाद, शिक्षण ,व्यापार आणि मनोरंजन या क्षेत्रामध्ये क्रांती घडवली आहे. त्यामुळे बदलत्या जीवनमानाशी जुळवून घेण्यासाठी तंत्रज्ञान कौशल्य आवश्यक बनले आहे.

तंत्रज्ञान कौशल्य म्हणजे डिजिटल साधनांचा योग्य प्रभावी वापर करण्याची क्षमता होय. आज ऑनलाईन शिक्षण, डिजिटल बँकिंग, इ गव्हर्नन्स, तांत्रिक ज्ञान यामुळे शिक्षण पद्धतीतही तंत्रज्ञानाचा



समावेश वाढत आहे.

Gen-Z म्हणजे 1997 ते 2012 या कालावधीत जन्मलेली पिढी होय ही पिढी पूर्णपणे डिजिटल युगात वाढलेली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण या साधनांचा वापर त्यांना लहानपणापासून परिचित आहे. त्यामुळे Gen-Z ला डिजिटल नेटिव्ह असे म्हटले जाते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर सोशल मीडिया, मल्टी टास्किंग कौशल्य, तात्रिक कोडींग, ग्राफिक डिझाईन, व्हिडिओ एडिटिंग या सर्वांमध्ये Gen-Z पारंगत झाली आहे. डिजिटल कौशल्यामुळे त्यांना शिक्षण, रोजगार व नवकल्पना यामध्ये मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.Gen-Z देशाच्या डिजिटल प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

नव कौशल्य व शासकीय धोरण हे जागतिकीकरणाचा आणि तंत्रज्ञान प्रधान युगात 'नव कौशल्य' यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्योग, व्यापार, सेवाक्षेत्र, शेती आणि प्रशासन या सर्व क्षेत्रामंध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने वापर वाढत आहे. संगणक साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा, संवाद कौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता, टीम वर्क, उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा यांचा विकास केल्यास बेरोजगारी कमी होते. उत्पादनक्षमता वाढते. भारत सरकारने नव कौशल्य विकासासाठी शासकीय धोरण व योजना राबवल्या आहेत. Skill Indian Mission -2015 सुरू झाले. प्रधानमंत्री कुशल विकास योजना (PMKVY) अंतर्गत तसेच नॅशनल एज्युकेशन पॉलिसी 20-20 नवकौशल्य विकास शैक्षणिक विकास होय.

### सोशल मीडिया व उत्पन्नाची संधी:

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे केवळ संवादाचे साधन नसून हे उत्पन्नाचे प्रभावी माध्यम बनले आहे. इंटरनेट, स्मार्टफोनच्या प्रसारामुळे युवक, गृहिणी, उद्योजक, विद्यार्थी सोशल मीडियाचा वापर करून आर्थिक लाभ घेत आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब आणि ट्विटर यासारख्या अनेक प्लॅटफॉर्ममुळे व्यक्तींना आपली कला, ज्ञान आणि व्यवसाय जगासमोर मांडण्याची संधी मिळते. कंटेंट क्रिएशन, व्हिडिओ लॉगिन, डिजिटल मार्केटिंग, इन्फ्लुएन्सर मार्केटिंग इत्यादी मार्गाने उत्पन्न मिळवता येते.

### नव कौशल्यातून शेती माती व नाती:

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात जीवनमान झपाट्याने बदलत आहे. शहरीकरण औद्योगिकीकरण, आणि डिजिटल क्रांतीमुळे जीवनशैलीत मोठे परिवर्तन झाले. या पार्श्वभूमीवर शेती, माती आणि मानवी नाती यांचे महत्त्व अधिक झाले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती आजही लाखो लोकांना रोजगार देते. परंतु पारंपरिक पद्धतीवर अवलंबून राहिल्यास उत्पन्न मर्यादित राहते, त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, ड्रोन तंत्रज्ञान, हवामान अंदाज यासारखे नवकौशल्य आत्मसात करणे आवश्यक झाले आहे. सरकारने 'प्रधान मंत्री फसल बीमा योजना' आणि 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' यासारख्या योजनाद्वारे मदत केली आहे.

माती ही केवळ शेतीसाठी साधन नसून ती आपल्या संस्कृतीची आणि ओळखीची मूळ आहे. माती परीक्षण, सेंद्रिय खताचा वापर, पाणी व्यवस्था ही कौशल्य जमिनीची सुपीकता टिकवून ठेवतात. पर्यावरण हे शेतीमुळे उत्पादन वाढवते आणि निसर्गाचा समतोल राखते.

बदलत्या जीवनमानात 'नाती' जपणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानामुळे संवाद सुलभ झाला असला तरी, प्रत्यक्ष भेटीगाठी आणि भावनिक बंध कमी होत आहेत. शेती आणि गावाकडील जीवन एकत्र आणते, सहकार्याची भावना वाढवते आणि सामाजिक एकता टिकवते. बदलत्या जीवनमानात नव कौशल्य स्वीकारून शेती अधिक सक्षम करता येईल. मातीचे संवर्धन करता आणि मानवी नाती अधिक दृढ होतील आधुनिक आणि मानवी परंपरा समतोल राखूनच सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे नव कौशल्य आत्मसात करणे आणि शेती, माती आणि नाती याचे महत्त्व जपले पाहिजे.

# अभ्यासक्रमातील बदल व उद्याची कौशल्य

**पूनम किसन जाधव**
बी. ए. द्वितीय वर्ष

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात शिक्षण पद्धतीत मोठे बदल होत आहेत. पूर्वीचा अभ्यासक्रम मुख्यतः पाठांतरावर आधारित होता. परंतु आजच्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे अभ्यासक्रम अधिक कौशल्य आधारित, प्रयोगशील आणि जीवन उपयोगी होत आहे.

आजच्या काळात फक्त पुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान, संवाद कौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सृजनशीलता या गोष्टी शिकणे आवश्यक झाले आहे. संगणक, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांचा अभ्यासक्रमात समावेश केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थी भविष्यातील स्पर्धेला सामोरे जाण्यास सक्षम होतात.

उद्याच्या काळात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व गुण, संघ भावना आणि नवकल्पना करण्याची वृत्ती असणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळांमध्ये प्रकल्प, प्रयोग, गटचर्चा, सादरीकरण यांना महत्त्व दिले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा विचार करण्याचा दृष्टिकोन विकसित होतो.

जगात दररोज नवीन शोध लागत आहेत. आणि तंत्रज्ञान झपाट्याने प्रगती करत आहे. पूर्वीच्या काळानुसार शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकातील धडे पाठ करणे असे मानले जात होते. परंतु आता शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना जीवनासाठी तयार करणे हा आहे. त्यामुळे अभ्यासक्रमात अनेक नवीन गोष्टींचा समावेश केला जात आहे.

आजच्या नवीन अभ्यासक्रमात कौशल्य आधारित शिक्षणावर भर दिला जातो. संगणक ज्ञान, डिजिटल कौशल्य, इंग्रजी संवाद, विज्ञान तंत्रज्ञान, तसेच व्यवहारीक ज्ञान यांना महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षा पास होण्यासाठी नव्हे तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण घ्यावे हा या बदलाच्या मागचा मुख्य उद्देश आहे.

उद्याच्या काळात यशस्वी होण्यासाठी सृजनशीलता, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन, समस्या सोडवण्याची क्षमता, आणि नवीन गोष्टी शिकण्याची तयारी ही कौशल्य आवश्यक असतील, त्यामुळे शाळांमध्ये प्रकल्प पद्धती, प्रयोग, गटकार्य, भाषण, चित्रकला, क्रीडा आणि संगणक शिक्षण यांना प्रोत्साहन दिले जात आहे.

अभ्यासक्रमातील हे बदल विद्यार्थ्यांना अधिक



सक्षम, आत्मनिर्भर आणि जबाबदार बनवतात. असे शिक्षण घेतलेले विद्यार्थी भविष्यात देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देऊ शकतात. म्हणूनच यातील बदल आणि उद्याची कौशल्य यांना आजच्या शिक्षणात खूप महत्त्वाचे स्थान आहे.

आजच्या युगात संगणक आणि इंटरनेटचे ज्ञान खूप महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे शाळांमध्ये शिक्षण डिजिटल शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण यांना प्राधान्य दिले जात आहे. तसेच पर्यावरणाचे रक्षण, आरोग्याची काळजी आणि समाजातील जबाबदारी याबद्दलही विद्यार्थ्यांना शिकविले जाते.

उद्याच्या काळात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांकडे काही विशेष कौशल्य असणे आवश्यक आहे. चांगले संवाद कौशल्य आत्मविश्वास, वेळेचे नियोजन, समस्या सोडवण्याची क्षमता, गटामध्ये काम करण्याची सवय आणि सृजनशील विचार ही कौशल्य खूप महत्त्वाची आहेत. भविष्यात अनेक कामे यंत्राद्वारे होणार आहेत. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आपल्या क्षेत्रात चांगली प्रगती करू शकतात.

शेवटी असे म्हणता येईल की, अभ्यासक्रमातील बदल ही काळाची गरज आहे, योग्य शिक्षण आणि योग्य कौशल्य मिळाल्यास विद्यार्थी भविष्यातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाऊ शकतील आणि देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावतील.

# बदलते मानवी जीवन व नव कौशल्य

**रेणुका सत्यवान साळुंके**
बी. ए. द्वितीय वर्ष

मानवी जीवन हे सतत बदलणारे आहे. काळानुसार माणसाच्या जीवन पद्धतीत, विचारसरणीत आणि काम करण्याच्या पद्धतीत बदल होत असतात. पूर्वीचे जीवन आणि आजचे जीवन यामध्ये खूप मोठा फरक दिसून येतो. विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण यामुळे मानवी जीवन अधिक वेगवान आणि प्रगत झाले आहे. आजचा माणूस माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहे. त्यामुळे जीवनातील अनेक गोष्टी सोप्या आणि सुलभ झाल्या आहेत. परंतु या बदलामुळे नवीन आव्हानेही निर्माण झाली आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि बदलत्या परिस्थितीला जुळवून घेण्यासाठी माणसाला नवीन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक झाले आहे. या नवीन कौशल्यांना नव कौशल्य असे म्हणतात.

पूर्वीच्या काळात मानवी जीवन साधे आणि मर्यादित होते. बहुतेक लोक शेती, पशुपालन किंवा पारंपरिक व्यवसायावर अवलंबून होते. त्यावेळी जीवनशैली ही साधी होती. आणि लोकांच्या गरजाही कमी होत्या. शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या आणि माहिती मिळण्यासाठी फारसे साधनही नव्हते. लोक एकमेकांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधत आणि सामाजिक नातेसंबंध अधिक मजबूत होत असत. परंतु काळ बदलत गेला तसे समाजात आणि जीवन पद्धतीत बदल होत गेला. औद्योगिक क्रांती नंतर उद्योगधंदे वाढले आणि लोक शहराकंडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या आणि जीवन अधिक गतिमान झाले.

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर खूप मोठा प्रभाव पडला आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट आणि विविध डिजिटल साधनामुंळे जग खूप छोटे झाले आहे. आज माणूस घर बसल्या जगातील कोणतीही माहिती मिळवू शकतो. शिक्षण, आरोग्य, व्यापार, बँकिंग, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रामंध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. उदाहरणार्थ ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या शिक्षण घेणे शक्य झाले आहे. तसेच ऑनलाईन खरेदीमुळे लोकांना विविध वस्तू सहज उपलब्ध होतात. सर्व गोष्टीमुळे मानवी जीवन अधिक सोयीस्कर आणि जलद झाले आहे.

परंतु या प्रगती सोबत स्पर्धा ही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात यश मिळवण्यासाठी

अधिक मेहनत आणि कौशल्य आवश्यक आहे. केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून त्यासोबत विविध प्रकारची कौशल्य असणे गरजेचे झाले आहे. त्यामुळेच नव कौशल्यांचे महत्त्व वाढले आहे. नव कौशल्य म्हणजे बदलत्या काळानुसार आवश्यक असलेली नवीन कौशल्य. ही कौशल्य व्यक्तीला जीवनातील विविध परिस्थितींना समोर जाण्यास मदत करतात आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना देतात.

आजच्या काळात तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संगणक वापरणे, इंटरनेटचा योग्य उपयोग करणे, डिजिटल साधनांचा वापर करणे, ही कौशल्य जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात आवश्यक झाली आहेत. अनेक कामे आता डिजिटल पद्धतीने केली जात असल्यामुळे तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे झाले आहे. उदाहरणार्थ शैक्षणिक क्षेत्रात ऑनलाईन वर्ग, डिजिटल प्रेझेंटेशन, आणि ईमेलचा वापर वाढला आहे. व्यापार आणि उद्योग क्षेत्रातही संगणक आणि इंटरनेटशिवाय काम करणे कठीण झाले आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे हे आजच्या काळात आवश्यक झाले आहे.

तंत्रज्ञान कौशल्या बरोबरच संवाद कौशल्यही खूप महत्त्वाचे आहे. एखाद्या व्यक्तीचे विचार स्पष्टपणे मांडणे, इतरांचे मत समजून घेणे आणि योग्य पद्धतीने संवाद साधने ही अत्यंत महत्त्वाची कौशल्य आहेत. आज कामे समूहामध्ये केली जातात. त्यामुळे इतरांची योग्य प्रकारे संवाद साधता येणे आवश्यक असते. प्रभावी संवादामुळे व्यक्तीला समाजात आणि कार्यक्षेत्रात यश मिळणे सोपे जाते.

याशिवाय समस्या सोडवण्याचे कौशल्य ही महत्त्वाचे आहे. जीवनात अनेक वेळा विविध अडचणी आणि समस्या येतात. त्या समस्यांकडे शांतपणे आणि विचारपूर्वक पाहून त्यावर योग्य उपाय शोधणे ही एक महत्त्वाची क्षमता आहे. ज्याच्याकडे समस्या सोडवण्याचे कौशल्य असते ते लोक कोणत्याही परिस्थितीत योग्य निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे ते जीवनात अधिक यशस्वी होतात.

हे देखील एक महत्त्वाचे नव कौशल्य आहे. सृजनशील म्हणजे नवीन कल्पना सुचवण्याची आणि वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची क्षमता. आजच्या स्पर्धात्मक जगात केवळ पारंपरिक पद्धतीने विचार करून चालत नाही. नवीन कल्पना आणि नवीन मार्ग शोधणे आवश्यक असते.

समाजाच्या आणि देशाच्या प्रगतीसाठीही नव कौशल्य अत्यंत महत्त्वाची आहेत. कौशल्यपूर्ण मनुष्यबळ असल्यास उद्योगधंदे आणि विविध क्षेत्रांचा विकास होऊ शकतो. त्यामुळे देशाची आर्थिक आणि सामाजिक प्रगती अधिक वेगाने होऊ शकते. म्हणूनच सरकार आणि विविध संस्था कौशल्य विकास यावर भर देत आहेत.

अशाप्रकारे बदलते मानवी जीवन आणि नव कौशल्य यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. काळानुसार जीवनात बदल होणे स्वाभाविक आहे. या बदलाशी जुळवून घेण्यासाठी आणि जीवनात यश मिळवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने सतत नवीन कौशल्य शिकत राहणे आवश्यक आहे. त्यामुळे बदलत्या जगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी नव कौशल्य आत्मसात करणे ही काळाची गरज बनली आहे.

# सोशल मीडिया : उत्पन्नाच्या संधी

**प्रतिक्षा चंद्रकांत वंगे**
बी. ए. प्रथम वर्ष

सोशल मीडिया आज केवळ मनोरंजनाचे साधन नसून उत्पन्नाचा एक मोठा स्रोत बनला आहे. युट्युब, इंस्टाग्राम, फेसबुक यासारख्या माध्यमातून कंटेंट क्रिएशन, Affiliate मार्केटिंग , ब्रँड प्रमोशन आणि ऑनलाईन क्लासेस द्वारे कलाकार, व्यावसायिक व गृहिणी घरबसल्या लाखो रुपये कमवू शकतात. ही एक डिजिटल क्रांती असून योग्य कौशल्याने करिअरची सुवर्णसंधी आहे. सोशल मीडिया उत्पन्न म्हणजे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून मिळवले जाणारे उत्पन्न. हे उत्पन्न विविध प्रकारचे असू शकते, जसे की जाहिरात, स्पॉन्सरशिप, Affiliate मार्केटिंग, प्रॉडक्ट सेल्स, आणि सबस्क्रीप्शन.

युट्युब स्वतःचे चैनल तयार करून शैक्षणिक, मनोरंजक किंवा माहिती पूर्ण व्हिडिओ बनवून स्पॉन्सरशिप आणि चॅनल मेंबरशिपद्वारे उत्पन्न मिळवता येते. इंस्टाग्राम आणि फेसबुक इन्फ्लुएन्सर म्हणून ब्रँड प्रमोशन ,पेड पार्टनरशिप आणि रिल्स द्वारे पैसे कमवता येतात. येथे वस्तूंची जाहिरात करून थेट विक्री करता येते. मार्केटिंग ॲमेझॉन, फ्लिपकार्ड यासारख्या कंपन्यांच्या उत्पादनांची लिंक सोशल मीडियावर शेअर करून त्याद्वारे होणाऱ्या विक्रीवर कमिशन मिळवणे, डिजिटल मार्केटिंग, सेवा पुरवणे, लहान व्यवसायांना सोशल मीडिया मॅनेजमेंट करून देणे, कंटेंट निर्मिती आणि जाहिरात चालवण्यासाठी सेवा देऊन पैसे कमावणे, स्वतःचे उत्पादन विकणे, हस्तकला, घरगुती पदार्थ, कपडे इत्यादी उत्पादनांचा प्रचार फेसबुक ग्रुप किंवा instagram शॉप द्वारे करून ऑनलाईन व्यवसाय वाढवणे. यशस्वी होण्यासाठी टीपः सोशल मीडियावर यश मिळवण्यासाठी, सातत्य, उच्च दर्जाची माहिती, आणि प्रेक्षकाशी संवाद साधणे आवश्यक आहे. हे माध्यम योग्य प्रकारे वापरल्यास नक्कीच चांगले उत्पन्न मिळू शकते. सोशल मीडिया मॅनेजर अनेक छोटे मोठे व्यवसाय स्वतःची सोशल मीडिया हँडल करू शकत नाहीत, तुम्ही त्यांच्यासाठी पोस्ट करणे, फॉलोवर्स वाढवणे आणि मेसेजेसना उत्तर देणे ही कामे करून महिन्याला चांगली रक्कम कमवू शकता .

**इन्फ्लुएंसर मार्केटिंग:**

जर तुमच्या कडे इंस्टाग्राम, युट्युब किंवा फेसबुक वर चांगले फॉलोवर्स असतील तर ब्रँड्स त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी तुम्हाला पैसे देतात.

**कंटेंट रायटिंग आणि क्रिएशन:**

तुम्ही ब्लॉग लिहून, किंवा ग्राफिक डिझाईन करूनही पैसे कमवू शकता. सातत्य नियमितपणे पोस्ट करणे, चागंले विषय, शिक्षण, फॅशन, तंत्रज्ञान, आरोग्य अशा एखाद्या विषयावर लक्ष केंद्रित करणे, नवनवीन कल्पना लोकाचे लक्ष वेधून घेणारी माहिती सादर करणे, सोशल मीडियावर यशस्वी होण्यासाठी सुरुवातीला संयम आणि मेहनत घेणे गरजेचे आहे. एकदा फालोअर्स वाढले की उत्पन्नाचे अनेक मार्ग खुले होतात.

**प्रॉडक्ट सेल्स:**

प्रोडक्ट सेल्स म्हणजे उत्पादनांची विक्री करून उत्पन्न मिळवणे. हे विक्री विविध प्रकारची असू शकते. जसे की

ऑनलाईन सेल्सः ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर प्रॉडक्ट्सचे विक्री करून उत्पन्न मिळवू शकतो.

ऑफलाइन सेल्सः ऑफलाइन स्टोअर्स मध्ये प्रॉडक्टची विक्री करून उत्पन्न मिळवू शकतो.

डायरेक्ट सेल्सः डायरेक्ट सेल करून उत्पन्न मिळवू शकतो.

योग्य कौशल्य आणि संयमाने सोशल मीडिया हे एक उत्तम करिअर बनू शकते. सोशल मीडिया आज केवळ मनोरंजनाचे साधन नसून उत्पन्नाचे उत्तम व्यासपीठ बनले आहे. युट्युब, इंस्टाग्राम, फेसबुक यावर दर्जेदार माहिती, व्हिडिओ किंवा डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून तरुण घरबसल्या रोजगार व उत्पन्न मिळवू शकतात. यूट्यूबर्स, इन्फ्लुएन्सर आणि सोशल मीडिया मॅनेजर यासारख्या भूमिकामंधून करिअरच्या नवनवीन संधी उपलब्ध झाल्या आहे.

कनेक्टिंग चे बरेच फायदे आहेत जसे की मित्र बनवणे, नोकरी शोधणे, पुनरावलोकन करणे, किंवा माहितीचे तुकडे मिळवणे, कल्पनांची देवाणघेवाण करणे आणि बरेच काही. फेसबुक, इंस्टाग्राम आणि ट्विटर यासारख्या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा प्राथमिक उद्देश जगभरातील लोकांशी जोडणे हा आहे. अनेक कंपन्या आपली उत्पादने किंवा सेवा लोकापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करतात. व्यावसायिक स्तरावर मार्केटिंग धोरणे आखून किंवा एखाद्या ब्रँडचे प्रमोशन करून चागंल्या संधी उपलब्ध होतात.

सोशल मीडियाचा योग्य आणि कल्पकतेने वापर केल्यास ते करिअर साठी एक उत्तम व्यासपीठ ठरू शकते. तथापि, यासाठी सातत्य, दर्जेदार कंटेंट आणि प्रेक्षकाशी असलेला संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो.

# अभ्यासक्रमातील बदल व उद्याची कौशल्य

**सार्थक जोगदंड**
बी ए प्रथम वर्ष

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात शिक्षण पद्धतीत ही मोठे बदल होत आहेत. केवळ पाठांतरावर आधारित शिक्षण पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्य, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि संवाद कौशल्य विकसित करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे आधुनिक शिक्षण व्यवस्थेत अभ्यासक्रमात अनेक बदल केले जात आहेत. या बदलांचा उद्देश विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास, सक्षम बनवणे हा आहे.

**अभ्यासक्रमातील बदल:**

अभ्यासक्रमातील खालील महत्त्वाचे बदल करण्यात येत आहेत.

**कौशल्य आधारित शिक्षण :**

पूर्वी शिक्षणात केवळ सैद्धांतिक ज्ञानावर भर दिला जात होता. आता प्रत्यक्षात प्रयोग आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांची काम करण्याची क्षमता वाढते.

**तंत्रज्ञानाचा वापर:**

शिक्षणात कम्प्युटर, इंटरनेट, डिजिटल क्लासरूम, स्मार्ट बोर्ड इत्यादींचा वापर. ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना जगभरातील माहिती सहज उपलब्ध.

**प्रकल्प आधारित शिक्षण :**

विद्यार्थ्यांना विविध प्रकल्प, असाइनमेंट आणि सादरीकरण दिले जातात. त्यामुळे संशोधन वृत्ती आणि सृजनशीलता वाढते.

**बहु विषयक शिक्षण :**

एका विषया पुरते मर्यादित न राहता विविध विषयांचा एकत्रित अभ्यास केला जातो.

उदा.: विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, व्यवस्थापन यांचा संबंध समजून घेतला जातो.

**व्यक्तिमत्व विकासावर भर :**

अभ्यासक्रमात संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, आत्मविश्वास वाढवणाऱ्या उपक्रमांचा समावेश केला जात आहे.

यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकसित होत आहे.




**उद्याची कौशल्य:**

**संवाद कौशल्य :**

आपले विचार स्पष्टपणे मांडण्याची क्षमता महत्त्वाची आहे.

चांगले बोलणे, लिहिणे आणि ऐकणे ही कौशल्य आवश्यक आहेत.

**समस्या सोडवण्याची क्षमता :**

जीवनात आणि नोकरीत अनेक समस्या येतात. त्या योग्य पद्धतीने सोडवण्यासाठी विश्लेषण आणि विचारशक्ती आवश्यक असते.

**तंत्रज्ञान कौशल्य :**

आजच्या युगात कम्प्युटर, इंटरनेट आणि नवीन तंत्रज्ञान समजणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल कौशल्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात.

**सृजनशीलता :**

नवीन कल्पना मांडणे आणि नाविन्यपूर्ण उपाय शोधणे हे भविष्यात महत्त्वाचे ठरणार आहे.

**टीम वर्क :**

अनेक कामे गटाने केली जातात.

त्यामुळे इतरासोबत सहकार्याने काम करण्याची क्षमता आवश्यक आहे.

**नेतृत्व गुण :**

योग्य निर्णय घेणे, इतरांना प्रेरणा देणे आणि जबाबदारी स्वीकारणे हे नेतृत्वाचे गुण आहेत.

अभ्यासक्रमातील बदल आणि नवीन कौशल्यांचा विकास यामुळे विद्यार्थी फक्त परीक्षेसाठी नव्हे तर जीवनासाठी तयार होतात, आधुनिक शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच कौशल्य, मूल्य आणि आत्मविश्वास देणे हा आहे. त्यामुळे अभ्यासक्रमातील हे बदल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आणि उपयुक्त आहेत.

# सोशल मीडिया उत्पन्नाच्या आधुनिक संधी

**अक्षता राजाभाऊ आडे**
बी. ए. तृतीय वर्ष

एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचे आणि इंटरनेटचे युग आहे. एकेकाळी केवळ मित्र-मैत्रिणींशी गप्पा मारण्यासाठी किंवा फोटो शेअर करण्यासाठी वापरला जाणारा ' सोशल मीडिया' आज जागतिक बाजारपेठ बनला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब आणि लिंकडइन सारख्या प्लॅटफॉर्म केवळ मनोरंजनाचे साधन न राहता तरुणांसाठी करिअरच्या आणि उत्पन्नाच्या अफाट संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. पारंपरिक नोकऱ्यांच्या पलीकडे जाऊन स्वतःच्या कौशल्याच्या जोरावर घरबसल्या अर्थार्जन करणे आता सहज शक्य झाले आहे.

कन्टेन्ट क्रिएशन अँड इन्फ्ल्युएन्सर मार्केटिंग :

सोशल मीडियावरील उत्पन्नाचा सर्वात लोकप्रिय मार्ग म्हणजे ' कंटेंट क्रिएशन' जर तुमच्याकडे एखादे खास कौशल्य असेल जसे की स्वयंपाक, गाणे, अभिनय, शिक्षण किंवा तांत्रिक ज्ञान तर तुम्ही त्याचे व्हिडिओ बनवून लोकांपर्यंत पोहोचू शकता.

युट्युबः

व्हिडिओला मिळणाऱ्या व्ह्यूज वर 'ऑडियन्स द्वारे' पैसे मिळतात. याशिवाय ब्रँड प्रमोशन आणि स्पॉन्सरशिप हे उत्पन्नाचे मोठे स्रोत आहेत.

इंस्टाग्राम इन्फ्ल्युएन्सर :

तुमचे फॉलोअर्स जास्त असल्यास विविध कंपन्या त्यांच्या उत्पादनांच्या जाहिरातीसाठी तुम्हाला पैसे देतात यालाच ' इन्फ्ल्युएन्सर मार्केटिंग' म्हणतात.

डिजिटल मार्केटिंग अँड ब्रँडिंगः

आज प्रत्येक छोटा मोठा व्यवसाय ऑनलाइन जाण्याचा प्रयत्न करत आहे पण प्रत्येक व्यावसायिकाला सोशल मीडिया नीट हाताळता येतोच असे नाही. अशावेळी ' सोशल मीडिया मॅनेजर' ची गरज असते.

सोशल मीडिया मॅनेजमेंटः

कंपन्यांची खाती साभाळणे, पोस्ट शेड्यूल करणे आणि ग्राहकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे या कामातून चागंली कमाई करता येते.

फेसबुक आणि इंस्टाग्राम ॲड्सः

व्यवसायाची जाहिरात योग्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'ॲड एक्सपर्ट' म्हणून काम करता येते.

ॲफिलिएट मार्केटिंग :

या पद्धतीत तुम्हाला स्वतःचे उत्पादन बनवण्याची गरज नसते. ॲमेझॉन किंवा फ्लिपकार्ट सारख्या कंपन्यांच्या उत्पादनांची लिंक तुम्ही तुमच्या सोशल मीडिया हँडलवर शेअर करू शकता. जेव्हा कोणी तुमच्या लिंक वरून वस्तू खरेदी करते तेव्हा तुम्हाला ठराविक टक्के कमिशन मिळते. कमी गुंतवणुकीत हा एक उत्तम व्यवसाय आहे.

ऑनलाइन कोर्सेस आणि वेबिनारः

तुमच्याकडे एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान असेल उदाहरणार्थ योग, शेअर मार्केट, कोडींग, भाषा इत्यादी तर तुम्ही फेसबुक किंवा इंस्टाग्राम वरून त्याचे प्रमोशन करून ऑनलाईन कोर्सेस विकू शकता.  झूम किंवा गुगल मीटच्या माध्यमातून पेड वेबिनार घेऊन तुम्ही तुमचे ज्ञान पैशात रूपांतरित करू शकता.

स्वतःचा ई-कॉमर्स व्यवसाय :

सोशल मीडिया हे एक विनामूल्य दुकान आहे. व्हाट्सअप बिजनेस आणि इंस्टाग्राम स्टोअर्सच्या माध्यमातून तुम्ही स्वतः बनवलेल्या वस्तू उदा. केक, दागिने, कपडे इत्यादी थेट ग्राहकांना विकू शकता. यामुळे मधल्या दलालांची गरज उरत नाही आणि नफा जास्त मिळतो.

शैक्षणिक वर्ष 2025-2026 मध्ये एनसीसी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील एकूण 54 विद्यार्थ्यांना मैदानी चाचणी घेऊन प्रवेश देण्यात आला, त्यापैकी ‘सी प्रमाणपत्र’ परीक्षेसाठी एकूण 19, ‘बी प्रमाणपत्र’ परीक्षेसाठी एकूण 17, व ‘ए’ साठी एकूण 18 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. सदरील शैक्षणिक वर्षात सीनियर अंडर ऑफिसर म्हणून प्रणव कांबळे याची निवड करण्यात आली. यावर्षी नॅशनल कॅम्प ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ साठी प्रणव कांबळे आणि महेक चाऊस यांनी इडियापट्टी, तामिळनाडू येथे उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. तसेच आर्मी अटैचमेंट संभाजीनगर येथे प्रणव कांबळे, आर्मी अटैचमेंट पुणे येथे काकडे प्रशांत आणि पवन पवार, आर्मी अटैचमेंट अहिल्यानगर (अहमदनगर) येथे काटकर वल्लभ आणि जोगदंड गणेश या कॅडेट्सने सहभाग नोंदविला.

दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन भालचंद्र ब्लड बँक यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते या उपक्रमामध्ये एनसीसी कॅडेट्स विद्यार्थी प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत देशभक्तीची भावना प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली. रक्तदानाचे महत्त्व समाजात पोहोचवणे आणि गरजू रुग्णांसाठी जीवनदायी रक्त गोळा करणे हे या शिबिराचे प्रमुख उद्दिष्ट होते.

राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि रोटरी सॅटेलाईट क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी व कर्मचारी वर्गासाठी संपूर्ण कार्डिओपल्मनरी रीससिटेशन (CPR) प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश तरुण कॅडेट्स, प्राध्यापक व अपप्रशासकीय कर्मचाऱ्यांना जीवन वाचविण्याच्या महत्त्वपूर्ण कौशल्यांनी सक्षम करणे हा होता, ज्यामुळे आपत्कालीन प्रसंगी निर्णायक फरक पडू शकतो. शंभरहून अधिक सहभागी या कार्यशाळेत उपस्थित होते. या सत्रात सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देखील घेण्यात आली.

देशभरात राबविण्यात येणाऱ्या "एक दिन – एक घंटा – एक साथ स्वच्छता" या संकल्पनेला प्रतिसाद देत दयानंद कला महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी परिसर स्वच्छता उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये दयानंद गेट समोरील परिसर, आजूबाजूचा भाग तसेच रस्त्याच्या कडेला साचलेला कचरा हटवून स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड आणि एनसीसी अधिकारी सीटीओ डॉ शिवकुमार राऊतराव यांच्या उपस्थितीत सकाळी 9 ते 10 या ठरलेल्या वेळेत करण्यात आले. यामध्ये प्राचार्यांनी स्वच्छतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर कॅडेट्सनी झाडलोट, कचरा गोळा करणे, प्लास्टिक वेगळे करून ठेवणे, गवत काढणे अशा विविध कामातून परिसर सुंदर व स्वच्छ करण्यासाठी योगदान दिले. कॅडेट्सनी या उपक्रमाद्वारे "स्वच्छ भारत अभियान", "स्वच्छता हीच सेवा" व "माझे कर्तव्य – माझी जबाबदारी" याचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी एक तास समाजहितासाठी श्रमदान करून "स्वच्छतेतूनच आरोग्य आणि प्रगती साधता येते" हे दाखवून दिले.

महाविद्यालयातील कॅडेट्स 15 ऑगस्ट व 26 जानेवारी या राष्ट्रीय दिनानिमित्त लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे पथसंचलनात सहभाग नोंदविला त्याचप्रमाणे 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आणि विद्यापीठ दिनानिमित्त महाविद्यालयात परेडचे आयोजन करण्यात आले होते. वरील सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे विद्यार्थीप्रिय प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. संतोष पाटील, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. सुभाष कदम, डॉ. नितेश स्वामी महेश जंगापल्ले आणि इतर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे यांचे सहकार्य लाभले.

**लेफ्टनंट (डॉ) शिवकुमार राऊतराव**

असोसिएट एनसीसी ऑफिसर

# सांस्कृतिक विभाग

दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी अनेक विषयाचे ज्ञान संपादन करत करत सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून आपली कला विकसित करून महाविद्यालयाचा नावलौकिक करतात. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे अनेक विद्यार्थी टीव्ही कलाकार म्हणून महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ नादेडच्या युवक महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचा दबदबा आजही कायम टिकून आहे. केवळ विद्यापीठ पातळीवरच नाही तर राज्य व राष्ट्रीय पातळीवर देखील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे आपली कला सादर करून सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेवर सांस्कृती विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्री. अर्जुन मुरली पवार याची गुणवत्तेच्या आधारावर निवड करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष 2025-26 चे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा अंतर महाविद्यालयीन " ज्ञानतीर्थ " युवक महोत्सव ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपूरी, ता. जि. नादेड. येथे दिनांक 09 ते 12 ऑक्टोबर 2025 या कालावधीत संपन्न झाले. सदरील युवक महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी होऊन 30 कला प्रकारात भाग घेतला

ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात दयानंद कला महाविद्यालय लातूर यानी एकूण 11 पारितोषिके प्राप्त केली.

1. व्यंग्य चित्र – ज्ञानेश्वर साठे (सुवर्ण पदक),

2. कथाकथन – कु. सई शिंदे (रौप्य पदक),

3. मिमिक्री – स्नेहल विभाते (रौप्य पदक),

4. सुगम भारतीय गायन – भूषण पाटील (रौप्य पदक),

5. स्थळ छायाचित्र – ज्ञानेश्वर साठे (रौप्य पदक),

6. चित्रकला – ज्ञानेश्वर साठे (रौप्य पदक),

7. फोक ऑर्केस्ट्रा – द्वितीय (रौप्य पदक), यात अमित वाघमारे, अनमोल कांबळे, सार्थक जोगदंड, यशवंत कातळे, ओंकार भंडारे तसेच राम पाचाळ, सुमित घाडगे, गायत्री बेडजवळगे, शीतल सगर यानी यश संपादन केले.

८. सूरवाद्य – सुमित घाडगे (कांस्य पदक),

९. शास्त्रीय नृत्य – वेदिका साळुंके (कांस्य पदक),

10. पोस्टर मेकिंग – ज्ञानेश्वर साठे (कांस्य पदक),

11. रांगोळी – निलेश झिरमिरे (कांस्य पदक) यांनी यश प्राप्त केले.

शैक्षणिक वर्ष 2025-26 चा इंद्रधनुष्य राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दिनांक 05 ते 09 नोव्हेंबर-2025 या दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे आयोजित करण्यात आला. सदरील युवक महोत्सवात साठे ज्ञानेश्वर हनमंत (पोस्टर पेंटिंग / चित्रकला / कलात्मक जुळवणी), अनंत ओम खलुले (लोकसंगीत / लोकनृत्य) या 02 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शैक्षणिक वर्ष 2025-26 चा 39 वा पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दिनांक 25 ते 29 नोव्हेबर 2025 दरम्यान एम जी एम युनिव्हर्सिटी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदरील युवक महोत्सवात साठे ज्ञानेश्वर हनमंत (पोस्टर पेंटिंग / चित्रकला), अनंत ओम खलुले (लोकसंगीत / लोकनृत्य) या 02 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शैक्षणिक वर्ष 2025-26 चा 39 वा आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव दिनांक 10 ते 14 मार्च 2026 दरम्यान सत्यभामा इन्स्टूट ऑफ सायन्स अँड टेक्नोलॉजि , जेप्पियार नगर, एमएच ४९, चेन्नई, तामिळनाडू येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदरील राष्ट्रीय युवक महोत्सवात अनंत ओम खलुले या विद्यार्थ्यांस लोकसंगीत / लोकनृत्य कला प्रकारामध्ये कास्यपदक प्राप्त झाले

सांस्कृतिक विभागाच्या यशस्वी वाटचालीमध्ये संस्थाध्यक्ष मा.श्री.लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा.श्री. रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ.एस.पी.गायकवाड , उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी यांचे मार्गदर्शन लाभले तर डॉ.देवेंद्र कुलकर्णी, डॉ.संदीप जगदाळे, प्रा.शरद पाडे, प्रा.हरी कुंभार, प्रा. सूरज साबळे, प्रा. विजय मस्के, प्रा.आदित्य शिरोळे यांनी सांस्कृतिक विभागाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**प्रा.डॉ. संतोष गुणवंतराव पाटील**
प्रभारी, सांस्कृतिक विभाग

# क्रीडा विभाग

शैक्षणिक वर्ष 2025-26 या वर्षात दयानंद कला वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनीनी विविध खेळात सहभाग नोंदवुन दैदिप्यमान यश संपादन केले आहे. व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, वेटलिफ्टिंग, पॉवर लिफ्टिंग, बेस्ट फिजिक, अॅथलेटिक्स, क्रॉसकंट्री, तायकाँदो, कबड्डी, क्रिकेट, टगऑफवार, हँन्डबॉल इत्यादी खेळात सहभाग नोंदवला. खालील दिलेल्या क्रीडा प्रकारात दैदिप्यमान यश संपादन करुन महाविद्यालयाचा नावलौकिक केला.

1. व्हॉलीबॉल : दि. 26 व 27 सप्टेंबर, 2025 अ विभागामध्ये संभाजी महाविद्यालय , मुरुड येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलीचा संघ प्रथम आला.

2. व्हॉलीबॉल : दि. 26 व 27 सप्टेंबर, 2025 अ विभागामध्ये संभाजी महाविद्यालय , मुरुड येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलाचा संघ द्वितीय आला.

3.बॅडमिंटन : दि. 13,14 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय बॅडमिंटन स्पर्धा दयानंद विधी महाविद्यालयाने आयोजित केल्या या स्पर्धेत मुलींचा संघ द्वितीय आला.

4. वेटलिफ्टिंग: दि. 20 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धा दयानंद कला महाविद्यालयाने आयोजित केल्या या स्पर्धेत महाविद्यालयास जनरल चॅम्पियनशिप प्राप्त झाली.

5. बेस्ट फिजिक: दि. 20 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय बेस्ट फिजिक स्पर्धा आझाद महाविद्यालय, औसा यांनी या र्स्पर्धा आयोजित केल्या यामध्ये महाविद्यालयास जनरल चॅम्पियनशिप प्राप्त झाली या स्पर्धेत मुलींचा संघ द्वितीय आला.

6. पॉवर लिफ्टिंग: दि. 21 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा दयानंद इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी महाविद्यालयाने आयोजित केल्या या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयास जनरल चॅम्पियनशिप प्राप्त झाली.

7. मैदानी स्पर्धा : दि. 4 व 5 ऑक्टोबर 2025 रोजी अ विभागीय मैदानी स्पर्धा राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झाल्या त्या स्पर्धेत खालील प्रमाणे यश मिळवुन मुलींच्या संघाने जनरल चॅम्पियनशिप प्राप्त केली.

100 मी. धावणे, 200 मी. धावणे, 400 मी. धावणे, 800 मी. धावणे, प्रथम,

1500 मी. धावणे द्वितीय, भाला फेक प्रथम, हातोडाफेक द्वितीय असे प्राविण्य प्राप्त केले.

**अ विभागीय, आंतर विभागीय महाविद्यालयीन स्पर्धा व प्रशिक्षण शिबिर :**

1. वेटलिफ्टिंग : दि. 20 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय वेटलिफ्टिंग (मुले) स्पर्धा आयोजन
2. टेबल टेनिस : दि. 13 व 14 ऑगस्ट 2025 रोजी अ विभागीय (मुले-मुली) स्पर्धा आयोजन
3. टेबल टेनिस : दि. 06 व 07 सप्टेंबर 2025 रोजी आंतर विभागीय (मुले-मुली) स्पर्धा आयोजन
4. व्हॉलीबॉल : दि.05 ते 7 ऑक्टोंबर 2025 अ विभागीय कोचिंग कॅम्प (मुले) चे आयोजन
5. वेटलिफ्टिंग : दि.30 ऑगस्ट ते 2 सप्टेंबर 2025 अ विभागीय कोचिंग कॅम्प(मुले) चे आयोजन
6. पॉवर वेटलिफ्टिंग : दि.30 ऑगस्ट ते 2 सप्टेंबर 2025 अ विभागीय कोचिंग कॅम्प(मुले) चे आयोजन

**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ प्रशिक्षण शिबीर आयोजन :**

1. वेटलिफ्टिंग : दि.11 ते 18 नोव्हेंबर 2025 या कालावधीत ( मुले-मुली )आंतर विद्यापीठ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले.
2. पॉवर वेटलिफ्टिंग : दि. 20 ते 23 फेब्रुवारी 2026 या कालावधीत ( मुले-मुली )आंतर विद्यापीठ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले.
3. बेस्ट फिजिक : दि.21 ते 14 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आंतर विद्यापीठ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले.

**डॉ. नितेश स्वामी**
क्रीडा विभाग प्रमुख

# मराठी विभाग

विद्यार्थ्यांना घडविताना 'ज्ञानाचे रुपान्तर शहाणपणात' करण्यासाठी अभ्यासक्रमाबरोबरच अभ्यासक्रमपूरक व अभ्यासक्रमाव्यतिरिक्त व्यक्तिमत्व घडविणारे उपक्रम घेणे आवश्यक असते. मराठी भाषा आणि वाङ्मय विभागातंर्गत असे कार्य करताना संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. रमेशजी बियाणी यांचे मौलिक मार्गदर्शन आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे प्रोत्साहन लाभले; विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले आणि विभागातील सहकारी प्राध्यापक यांच्या अथक प्रयत्नातून विद्यार्थ्यांना उत्तमोतम ज्ञानशिदोरी कशी देता येईल याचा प्रयत्न केला जातो याची फलश्रुती म्हणजे हा शैक्षणिक आलेख उंचावणारा अहवाल होय.

**उल्लेखनीय शैक्षणिक उपलब्धी :**

दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्येही मराठी विभागाने शैक्षणिक गुणवतेत आपले स्थान अव्वल राखले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदव्युत्तर गुणवत्ता यादीत पहिले तिन्ही क्रमांक विभागातील विद्यार्थ्यांनी मिळवले. विद्यापीठात सर्वप्रथम श्री. व्यंकट पांचाळ, सर्वद्वितीय श्री. जयपाल मेकले सर्व तृतीय कु. प्रतीक्षा राऊतराव यांनी यशाची कमान उंच ठेवली. पदवी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी अंकिता बादाडे या विद्यार्थिनीची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळावर निवड झाली. अखिल भारतीय साहित्य परिषद आयोजित "साहित्योत्सवात" कवितालेखन स्पर्धेत रवी वाघमारे या विद्यार्थ्याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

**गुणवत्ता विकास कार्यक्रम / उपक्रम**

मराठी भाषा आणि वाङ्मय विभागातंर्गत भाषा कौशल्य विकसित करणारे, समाजाप्रती जाणीवजागृती करणारे, देशप्रेम जाणीवजागृती करणारे, काळानुरूप होत चाललेल्या विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती अशी जाणीव विकसित करणारे उपक्रम घेण्यात आले त्यातील काही उल्लेखनीय कार्यक्रम/उपक्रम पुढे दिले आहेत.

१. भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या रु.१,००,०००/- अनुदानातून मराठी विभागाने "बोलीचा जागर" या कर्यक्रमाचे आयोजन केले होते. दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या ग्रंथदिंडी, शोभायात्रा, व्याख्याने आणि सास्कृतिक सादरीकरण अशा भव्य आणि भरगच्च कार्यक्रमात १०९ विदयार्थी, २० प्राध्यापक आणि १० संशोधक यानी सहभाग घेतला. बोली म्हणजे काय? बोलींचे स्वरुप, वास्तव, तिचा जिवंतपणा याबरोबरच प्रमाणभाषेला तिच्यातून मिळणारा जीवनरस यावर प्रकाश टाकण्यात आला. या उपक्रमाचा महाविद्यालय आणि इतर महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी लाभ घेतला.

२. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या रु.६०००/- अनुदानातून मराठी विभागाने १५ सप्टेंबर रोजी "हैद्राबाद मुक्तिसंग्राम समजून घेताना" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. साधन व्यक्ती प्राचार्य विजयकुमार कुलकर्णी यांनी हैद्राबाद मुक्तिसंग्राम का? कसा? यावर प्रकाश टाकला तसेच लढ्यासाठी ज्यांनी योगदान दिले अशा नेतृत्वाचा, त्यांच्या कार्याचा परिचय करून दिला.

३. ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी 'अभिजात मराठी भाषा दिन' आणि मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक प्रा. संदीपान मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. उत्तम साहित्य अनुभवातून साहित्य कसे आकारास

येते यावर प्रकाश टाकत जगभरच्या उत्तमोतम साहित्यकृतीचा परिचय प्रा. मोरे यांनी करून दिला. अनुभवाने समृद्ध आणि ओघवत्या शैलीत केलेले है विवेचन प्रभावी ठरले.

४. १० ऑक्टोबर २०२५ रोजी "काव्यमैफिलीचे" आयोजन करण्यात आले होते. यात लातूर परिसरातील तसेच महाविद्यालयातील कवी/कवयित्रीनी आपल्या रचना सादर करुन श्रोत्यांना भारावून टाकले. कवी आणि श्रोत्यांची एकतानता यामुळे ही काव्यमैफिल संस्मरणीय ठरली.

५. मराठी विभाग आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, मराठी विभाग यांच्यात असलेल्या सामंजस्य करारांतर्गत १४ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रा. डॉ. संभाजी पाटील (राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत, लातूर) यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. राजन गवस याचे साहित्य या विषयावरील या व्याख्यानाचा मराठी पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

६. विद्यार्थ्यांनी साहित्यिक अभिरुची जोपासावी या उद्देशाने दिनाक २० ते २२ फेब्रुवारी, २०२६ या काळात "साहित्योत्सव शैक्षणिक सहल आयोजन करण्यात आली. बीजभाषक डॉ. अभिराम भडकमकर, अनेक नामवंत साहित्यिक समीक्षक, दूरचित्रवाणी व चित्रपट क्षेत्रातील कलावत याचा परिचय विद्यार्थ्यांना झाला त्याचबरोबर त्यांच्यात सुप्त साहित्यिक दडला होता त्यास न्याय मिळाला. रवी वाघमारे, पर्णवी धावरे या विद्यार्थ्यांना उतेजनार्थ पुरस्कार मिळाले.

७. मराठी भाषा दिनानिमित दिनाकं २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी कवयित्री समिधा कोलगणे यांचे काव्यनिर्मितीवर व्याख्यान झाले, मायबोलीतील दुर्मिळ ग्रंथाचे ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आले. प्रस्तुत उपक्रमास विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.

८. प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षातर्गत सेवा या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे म्हणून अलमेल गुणवता हमी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. दिनाक २८ मार्च, २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमातील साधन व्यक्ती (दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. ब्रिजमोहन दायमा यानी मौलीक मार्गदर्शन केले. पद्व्यूतर वर्गातील विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक यानी व्याख्यानाचा लाभ घेतला.

९. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वाचनाभिरुची वाढवण्यास वाचनकट्टा, ग्रंथालय ग्रंथसंपदेची ओळख, उत्कृष्टवाचक असे उपक्रम राबविले.

१०. व्यावसायिक दृष्टिकोनातून भाषाकौशल्य विकसित करण्याच्या हेतूने कार्यशाळा व्याख्याने तर आम्ही घेतोच शिवाय चित्रपट निर्मितीत संवाद, पटकथा, अभिनय, सादरीकरण रंगमंच आणि रुपेरी पडद्यावरील निर्मिती हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता यावे म्हणून संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशनचे रेडिओस्टेशन, चित्रपट निर्मिती स्टुडिओ, पत्रकारिता विभाग, पैठणी व इतर हातमाग कापड निर्मिती प्रयोगशाळा, व्ही ट्यून्स म्युझिक स्टुडीओ, लातूर इत्यादी ठिकाणी सहली घेतल्या.

विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवताना काळानुरुप बदलांचा स्वीकार करत परिश्रमपूर्वक बहुआयामी उपक्रमाचे आयोजन केले. या कार्यात दयानंद शिक्षण संस्थेचे पाठबळ, प्राचार्याचे प्रोत्साहन लाभले त्यांची मी ऋणी आहे.

**प्रा. डॉ. सुनीता सांगोले**
विभागप्रमुख

# हिंदी विभाग

**1) शैक्षिक अहवाल :**

महाविद्यालय का हिंदी विभाग वर्ष 1961 से निरंतर सक्रियरूप से कार्यरत है। शैक्षिक वर्ष 2025-26 में हिंदी अध्यापन कार्य के साथ-साथ विविध शैक्षिक एवं सह-शैक्षिक गतिविधियों का सफलतापूर्वक आयोजन किया गया।

१) १४ सितंबर 'हिंदी दिवस' के उपलक्ष्य में 'हिंदी साहित्य मंडल' की स्थापना कर उद्घाटन नांदेड के सुप्रसिद्ध हास्य कवि श्री. बजरंग पारिख के करकमलों द्वारा संपन्न हुआ।

२) दिनांक 23/09/2025 को एम.ए. प्रथम वर्ष के छात्रों के 'स्वागत समारोह' का आयोजन किया गया। कार्यक्रम के मुख्य अतिथि प्रा. डॉ. संतोष पाटील, संचालक, अंतर्गत गुणवत्ता प्रकोष्ठ (IQAC) उपस्थित थे, उन्होंने छात्रों को हिंदी भाषा एवं साहित्य के महत्वपर मार्गदर्शन किया।

३) 'हिंदी पखवाड़ा' के अंतर्गत विविध स्पर्धाओं का आयोजन किया गया। जैसे-निबंध लेखन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा एवं पोस्टर (भित्तिपत्रक) आदि। इन प्रतियोगिताओं में छात्रोंने उत्साहपूर्वक सहभाग लिया। जिससे उनके व्यक्तित्व विकास को प्रोत्साहन मिला।

४) 'स्नेहसम्मेलन' के निमित्त विभिन्न स्पर्धाओं का आयोजन किया गया। जैसे-स्वरचित काव्यवाचन स्पर्धा, वाक् प्रतियोगिता आदि।

**2) विभाग की उपलब्धियां :-**

पिछले अनेक वर्षों से एम.ए. हिंदी के छात्र विश्वविद्यालय में प्रथम, द्वितीय एवं तृतीय स्थान पर आते रहे हैं। इस परंपरा का पालन शैक्षिक वर्ष 2025-26 में भी हुआ है। मार्च-अप्रैल 2025 की स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय, नांदेड की स्नातकोत्तर परीक्षा में सर्वप्रथम, द्वितीय एवं तृतीय क्रमांक पर हमारे विभाग के ही छात्र रहें हैं।

* विश्वविद्यालय स्तर पर प्रथम, द्वितीय एवं तृतीय स्थान प्राप्त कर विभाग का गौरव बढ़ानेवाले पुरस्कृत छात्रों में हैं:

१) प्रथम आनेवाली छात्रा कु. गाजरे कल्पना को संस्था की ओर से १०,००० रुपये छात्रवृत्ति प्राप्त हुई। और प्रोफेसर डॉ. प्रदीप सूर्यवंशी के पिता कालकथित शिवराम सूर्यवंशीजी के स्मृति में ५००० रुपये नगद एवं साथ में स्मृतिचिन्ह देकर सम्मानित किया गया।

२) द्वितीय आनेवाली छात्रा कु. गायकवाड भगवती को संस्था की ओर से 7000 रुपए की छात्रवृत्ति प्राप्त हुई। और प्रोफेसर डॉ. प्रदीप सूर्यवंशीजी की माता कालकथित सुंदराबाई सूर्यवंशीजी के स्मृतिमें 3000 रुपए नगद एवं स्मृतिचिन्ह देकर सम्मानित किया गया।

३) तृतीय स्थान पर कु. कुमठेकर आम्रपाली को संस्था की ओर से 5000 रुपए छात्रवृत्ति दी गई है।

प्रथम स्थान हेतु 10,000 रुपए, द्वितीय स्थान हेतु 7,000 रुपए तथा तृतीय स्थान हेतु 5,000 रुपए पुरस्कार प्रदान किए गए।

इसप्रकार विश्वविद्यालय में प्रथम, द्वितीय एवं तृतीय क्रमांक से उत्तीर्ण होने की परंपरा इस वर्ष भी कायम रही।

*दिनांक 10 अप्रैल 2026 को एम.ए. द्वितीय वर्ष के छात्रों को 'विदाई समारोह' का आयोजन किया गया। इस कार्यक्रम के प्रमुख अतिथि के रूप में महाविद्यालय के प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड उपस्थित थे।

**3) विशेष आभार :**

पूरे शैक्षिक वर्ष में विभाग को सहकार्य करने में महाविद्यालय के छात्रप्रिय प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड एवं अंतर्गत गुणवत्ता प्रकोष्ठ के संचालक डॉ. संतोष पाटील आदि के प्रति धन्यवाद ज्ञापित किया जाता है।

वर्ष 2025-26 में हिंदी विभाग ने शैक्षणिक, साहित्यिक एवं सांस्कृतिक क्षेत्रों में उल्लेखनीय कार्य किया है। छात्रों का सक्रिय सहभाग एवं प्राध्यापकों के मार्गदर्शन से विभाग निरंतर प्रगति की शिखर पर है।

**प्रो.डॉ. प्रदीप सूर्यवंशी,**
विभागाध्यक्ष, हिंदी विभाग

# English Literary Association

For the Academic Year 2025-26 Office Bearers of English Literary Association were elected. Following were the Office Bearers:

1. Sanika Shinde – (MASY)President
2. Saurabh Borade- (MAFY) V. President
3. Gayatri Betjawalge (BATY) Secretary
4. Shradha Kadam (BASY) Member
5. Urmila Taur (BASY) Member
6. Seeta Madane (BAFY) Member
7. Vaishnavi Ingale (BAFY) Member

The Association was inaugurated on 20/08/2025 at the auspicious hands of Mr. Pratik Pitambare (Director, Pitambare's Institute of IAS, Latur). Prin. Dr. S P Gaikwad presided over the function. The President and Guest congratulated the Office Bearers and wished them success.

Under the Association Freshers Wel-come was organized. Vice- Principal Dr. A B Joshi and IQAC Director Dr. Santosh Patil were the guests for the function. Senior students shared their learning experience in the Department and suggested the Freshers to avail the opportunity of learning in the Department.

ELA also organized a guest lecture on Importance of English in Competitive Exams. An alumnus Mr. Pratik Pitambare (Director, Pitambare's Institute of IAS, Latur) guided the students on how English played huge role in his success.

**Dr. Nitin Doke**

# P G & Research Department of English

### 1. Extension Lecture on Publication Ethics

47 Research Students are pursuing their research in the Departmental Research Center. So an Extension Lecture was arranged by the Department to caution them about publication and the ethical values to be followed while publishing their research. Dr. Jogdand extensively elaborated the topic and the students through question answer satisfied their queries.

### 2. External Evaluation of M A I (II Sem) Field Project

The students of MA English (III Semester) have to do Field Work/ Project as a part of their Course completion. The work is to be presented in the form of PPT before an External Examiner. Dr, P. D Shitole was invited as an External Examiner for the viva-voce and he guided and evaluated the students and gave remarks.

### 3. External Evaluation of M A II (III Sem) Field Project

The students of MA English (III Semester) have to do Field Work/ Project as a part of their Course completion. The work is to be presented in the form of PPT before an External Examiner. Dr, M. B. Karajgi was invited as an External Examiner for the viva-voce and he guided and evaluated the students and game remarks.

### 4. External Evaluation of M A II (IV Sem) Research Project

The students of MA English (IV Semester) have to do Research Project as a part of their Course completion. The work is to be presented in the form of PPT before an External Examiner. Dr, P.D. Shitole was invited as an External Examiner for the viva-voce and he guided and evaluated the students and gave remarks.

### 5. Workshop on Research Methodology

All three Language students (MA Marathi, Hindi & English undertake Field Project & Research Projects in different semesters, they received sufficient knowledge regarding how to choose the topic, collect the material, prepare questionnaire, drafting. The Resource Person Dr. K.R.Ghavane (BoS Member and Prof. Dept of English MUM Udgir) through PPT shared his expertise with the students.

### 6. District Level Avishkar Festival Students' Research

Every year the parent university organizes Avishkar Research Festival where the students form various colleges and streams participate with their research. In Languages & Humanities Category Miss. Sofiya Shaikh (MA II English) presented her research on Boutiques in Latur: A Comparative Study.

**Dr. Nitin Doke**

# लोकप्रशासन विभाग

महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर सामाजिक मूल्यांची जाणीव विकसित व्हावी आणि त्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने लोकप्रशासन विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातंर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.

या कार्यक्रमांना मा. अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी व सहसचिव मा. श्री. रमेशजी बियाणी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड आणि विभागप्रमुख प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांच्या नेतृत्वाखाली व विभागातील सर्व शिक्षकवर्गाच्या सहकार्याने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले.।

*** संशोधन पर मार्गदर्शन :**

स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या NEP आधारित अभ्यासक्रमानुसार एम.ए. प्रथम लोकप्रशासन विषयात प्रवेशित एकूण 15 विद्यार्थ्यांना तसेच एम.ए. द्वितीय लोकप्रशासन 13 विद्यार्थ्यांना प्रकल्प लेखनासाठी वेगवेगळ्या विषयावर संशोधनपर मार्गदर्शन करण्यात आले.

*** एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या :**

| | |
|---|---|
| बी.ए.प्रथम - | 71 |
| बी.ए.द्वितीय | 35 |
| बी.ए.तृतीय- | 33 |
| एम.ए.प्रथम- | 15 |
| एम.ए.द्वितीय- | 3 |

*** गुणवंत विद्यार्थी :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी 2025 मध्ये झालेल्या पदव्युत्तर परीक्षेत लोकप्रशासन विभागाने पुन्हा एकदा आपला शैक्षणिक दबदबा सिद्ध केला आहे. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विभागाचे एकूण तीन विद्यार्थी स्थान पटकावण्यात यशस्वी ठरले असून, आजपर्यंत लोकप्रशासन विभागाचा विद्यापीठ गुणवत्ता यादीत दबदबा कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे.

या यशामध्ये सर्वप्रथम कुमारी दीपिका राम यादव हिने प्रथम क्रमांक मिळवत दयानंद शिक्षण संस्थेतर्फे दहा हजार रुपयाची शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच द्वितीय क्रमांक पटकावणारा विद्यार्थी राहुल कांबळे याला सात

हजार रुपये, तर तृतीय क्रमांक मिळवणारी कुमारी पूनम आदमाने हिला पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या उल्लेखनीय यशामुळे लोकप्रशासन विभागाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा आणि सातत्य अधोरेखित होत असून, विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाने संस्थेचा गौरव अधिक वृद्धिंगत झाला आहे.

*** उत्तेजनार्थ बक्षीस :**

दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून लोकप्रशासन विभागात शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याची एक प्रेरणादायी परंपरा जोपासली जाते. या अंतर्गत बी.ए. प्रथम वर्ष, बी.ए. द्वितीय वर्ष आणि एम.ए. प्रथम वर्षातील प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विभाग प्रमुखांच्या वतीने सन्मान करून त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस प्रदान करण्यात येते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, अभ्यासाची आवड आणि उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्याची प्रेरणा निर्माण होते. तसेच, या गौरवामुळे इतर विद्यार्थ्यांनाही अधिक मेहनत घेऊन यश संपादन करण्याची सकारात्मक ऊर्जा मिळते, ज्यामुळे विभागात गुणवत्तेची परंपरा अधिक दृढ होत जाते.

*** दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत :**

येथे लोकप्रशासन विभागाच्या वतीने एम.ए. प्रथम वर्ष व बी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ दिनाकंः ११/०९/२०२६ रोजी पार पडला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नव्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. वशिष्ठ गणपतराव बन, प्रा. स्फूर्ती समुद्रे, प्रा. आश्विनी धायगुडे, प्रा. चैतन्य शिंदे याची उपस्थिती होती. कार्यक्रमात एम.ए. प्रथम वर्ष व बी.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे पेन व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच स्वा. रा.ती.म. विद्यापीठ नांदेड लोकप्रशासन विषयात सर्वप्रथम येण्याचा बहुमान दिपीका यादव या विद्यार्थीनीने प्राप्त केला आहे. या कार्यक्रमात तिचाही सत्कार व कौतुक करण्यात आले. यावेळी डॉ. वशिष्ठ बन यांनी लोकप्रशासन हा विषय व्यवहारीक जीवनासाठी किती आवश्यक आहे. लोकप्रशासन विषयातुन प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक निर्माण झाले पाहिजेत यासाठी या विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे महत्त्व, जबाबदारीची जाणीव आणि संशोधन क्षेत्रातील संदर्भात मार्गदर्शन केले.

*** संसदीय अभ्यासवर्गासाठी विद्यार्थी कु.स्नेहा कदम हिचा सहभाग :**

नागपूर येथील विधान भवनात ९ ते १३ डिसेंबर दरम्यान झालेल्या ५१ व्या संसदीय राष्ट्रकुल संसदीय अभ्यास मंडळ नागपूर हिवाळी अधिवेशन साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामार्फत दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील लोकप्रशासन विभागाची एम ए द्वितीय वर्षात शिकणारी विद्यार्थी कु. स्नेहा कदम नागपूरला सहभागी होत दयानंद कला महाविद्यालया चे नेतृत्व केले.

*** महिला धोरण व जागृरूकता कार्यक्रम उत्साहात संपन्न**

लोकप्रशासन विभागाच्या वतीने 'मुलींसाठी महिला धोरण आणि जागरूकता' या विषयावर एक माहितीपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड होते. यावेळी लोकप्रशासन विभागातील प्रा. स्फूर्ती समुद्रे, प्रा. अश्विनी धायगुडे आणि प्रा. चैतन्य शिंदे याची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकप्रशासन विभागाचे विभागप्रमुख डॉ. रामेश्वर खंदारे यांनी शासनाच्या महिला धोरणाबंबत सविस्तर माहिती देत, महिलांनी आपल्या हक्काविषयी सजग

राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना दिलेले अधिकार व सन्मान यांचा विशेष उल्लेख करत त्यांनी विद्यार्थिनींना प्रेरित केले. डॉ. गीता गिरवलकर यांनी विद्यार्थिनींना महिला धोरणांची सखोल माहिती देत त्यांचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर कसा करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांची सुरक्षा, कौटुंबिक अत्याचार प्रतिबंध, तसेच वाढत्या सायबर गुन्ह्याविषयी जागरूकता निर्माण करत, कोणत्याही अन्यायाविरुद्ध ठामपणे आवाज उठवण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनींसोबत थेट संवाद साधत त्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेत मार्गदर्शनही केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी महिलांच्या सुरक्षा, शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी शासनाच्या विविध धोरणाचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःची ओळख निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

*** दयानंद कला महाविद्यालयात SET-NET व स्पर्धा परीक्षांवरील मार्गदर्शन आणि एम.ए. लोकप्रशासन विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ**

दि. ११ एप्रिल रोजी दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील लोकप्रशासन विभागाच्या वतीने "SET-NET स्पर्धा परीक्षाचे बदलते स्वरूप" या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम तसेच एम.ए. लोकप्रशासन द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. रामेश्वर खंदारे यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, लोकप्रशासन विषयामध्ये विविध क्षेत्रांत करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी या संधींना गोग्य उपयोग करून आपल्या जीवनात यश संपादन करावे, तसेच स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारी मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य जपणे तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या कार्यक्रमाच्या निमिताने शै. वर्ष 2025-26 मध्ये एम.ए. प्रथम वर्षात प्रथम क्रमांक मिळविणारी तसेच संसदीय राष्ट्रकुल अभ्यास मंडळ, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात सहभागी झालेली विद्यार्थिनी स्नेहा हंसराज कदम हिचा पेन व बुके देऊन सन्मान करणात आला.  कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून जयक्रांती कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथील प्राध्यापिका प्रार्थना कसबे  उपस्थित होत्या. त्यांनी SET-NET परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असणाऱ्या पटकांवर सविस्तर मार्गदर्शन केले. वेळेचे योग्य नियोजन, अभ्यासक्रमाचे टप्प्याटप्प्याने अध्ययन आणि सातत्यपूर्ण अभ्यास या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनामार्गदर्शन करताना सांगितले की, दयानंद कला महाविद्यालयातून घडणारा विद्यार्थी हा सामाजिक जाणीव आणि संस्कारांनी समृद्ध असतो. असा विद्यार्थी समाजाला सकारात्मक दिशा देण्यास सक्षम असतो. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर उपस्थित विद्यार्थ्यांना टोप्याचे वाटप करण्यात आले, ही उपक्रमाची विशेष बाब ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृती पंडित यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनश्री शेळके यांनी मानले. या प्रसंगी लोकप्रशासन विभागातील प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. अश्विनी धायगुडे, प्रा. स्फूर्ती समुद्रे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एम.ए. लोकप्रशासन प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रा.डॉ.रामेश्वर खंदारे**

लोकप्रशासन विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर (स्थापना १९६१) येथील अर्थशास्त्र विभाग आर्थिक जागरूकता, आर्थिक साक्षरता आणि सामाजिक जबाबदारी यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवत आहे.

१. 'सायबर सुरक्षा ही गरज' या विषयावर निबंध स्पर्धा

सायबर पोलीस ठाणे, लातूर याच्या पत्र क्र./सायबर पो. स्टे. लातूर/सायबर अवेअरनेस/निबंध स्पर्धा/९९४/ लातूर दिनांक ०८/१०/२०२५ च्या संदर्भानुसार, अर्थशास्त्र विभाग तर्फे सायबर जागरूकता उपक्रमातंर्गत 'सायबर सुरक्षा ही गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन प्रो. डॉ. बालाजी घुटे, विभागप्रमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धा ११ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडली. यात एकूण ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षितता व जबाबदार ऑनलाइन वर्तनाबाबत जागरूकता निर्माण झाली.

२. पदवीधर मतदार नोंदणी अभियान (सामाजिक कार्य):

अर्थशास्त्र विभागाने ११ ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एक आठवड्याचे पदवीधर मतदार नोंदणी अभियान राबविले. हे अभियान औरंगाबाद विभाग (लातूर जिल्हा) येथील पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदणी व जागरूकता यासाठी होते. विद्यार्थी व शिक्षकांनी (१००) उत्साहाने सहभाग घेतला. या माध्यमातून लोकशाही मूल्ये व नागरिक जबाबदारी बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

३. क्रिएटिव्ह रील स्पर्धा - आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६

आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ निमित्ताने अर्थशास्त्र विभागाने १० मार्च ते २० मार्च २०२६ या कालावधीत केवळ वर्तमान UG व PG विद्यार्थ्यांसाठी 'भारतातील महिलांचे बचत आणि गुंतवणूक' या विषयावर क्रिएटिव्ह रील स्पर्धा आयोजित केली. या करिता विद्यार्थ्यांना १५ ते ६० सेकंदाच्या रील्स तयार करण्यास सांगण्यात आले. त्यात खालील मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला:

- ग्रामीण भागातील महिलांच्या बचत प्रवृत्ती
- महिलांच्या स्वयंसहायता गटाद्वारे उद्योग निर्मिती
- स्वयंसहायता गटाद्वारे सामूहिक शेती, सामूहिक साधन खरेदी
- वैयक्तिक मासिक बचत (पगार/घरगुती भत्ता)
- बँक बचत खाते व रेकरिंग डिपॉझिट

- महिला उद्योजकांसाठी शासकीय योजना
- घरगुती उद्योग (टिफिन सर्व्हिस, बेकरी, केटरिंग, ब्युटी पार्लर, टेलरिंग, ऑनलाइन विक्री, हस्तकला, ट्यूशन, डे-केअर)
- महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य व स्वतंत्र निर्णयक्षमता

या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला.

४. 'अडॉप्ट फाईव्ह पॉवरफुल हॅबिट्स' कार्यशाळा

अर्थशास्त्र विभागाने 'अडॉप्ट फाईव्ह पॉवरफुल हॅबिट्स' या विषयावर मंगळवार दिनांक १७/०३/२०२६ रोजी प्रेरणादायी कार्यशाळेचे आयोजन केले. या करिता कार्यशाळेचे मुख्य अतिथी म्हणून श्रीमती वैशाली शेठ, अध्यक्ष म्हणून दयानंद कला महाविद्यालय, लातूरचे प्राचार्य, डॉ. शिवाजी गायकवाड होते, तर विशेष उपस्थिती उपप्राचार्या, डॉ. अंजली जोशी, IQAC समन्वयक डॉ. संतोष पाटील यांची होती. या कार्यशाळेचे आयोजक अर्थशास्त्र विभागप्रमुख, डॉ. बालाजी घुटे, यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. सुभाष कदम यांनी आभार मानले.

या कार्यशाळेद्वारे प्राध्यापकांना व्यक्तिगत व व्यावसायिक विकासासाठी पाच शक्तिशाली सवयी आत्मसात करण्याचे प्रोत्साहन देण्यात आले.

अर्थशास्त्र विभाग शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच सामाजिक, आर्थिक आणि सर्जनशील उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या, प्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील आहे. वरील सर्व कार्यक्रमांना विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

**डॉ. बालाजी घुटे**
विभागप्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांना दरवर्षी माहिती आणि ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष समाजउपयोगी आणि व्यवहारिक मार्गदर्शन केले जाते. त्या अनुषंगाने समाजशास्त्र विभागातर्फे यावर्षी पुढील उपक्रम राबवण्यात आले.

**उपक्रमांचे उद्देश :**

1. विद्यार्थ्यांनी वर्गात बसून पुस्तकी ज्ञान घ्यावेच पण त्याचबरोबर समाजाला समजून घेऊन समाजातील लोकांचे सामाजिक जीवन आणि त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात
2. सामाजिक समस्यांची कारणे समजून घेण्यासाठी क्षेत्रभेट द्यावी
3. क्षेत्रभेटीमध्ये सर्वेक्षणाद्वारे सामाजिक आकलन करून घ्यावे. स्वतः आणि इतरांमध्ये जाणीव जागृती वाढवावी.
4. समाजशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि आत्मभान यावे.

**उपक्रम:**

9 जुलै 2025 रोजी धुम्रपान आणि तंबाखू प्रतिबंधासाठी प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना शपथ देण्यात आली. याद्वारे तंबाखू आणि धूम्रपान प्रतिबंधासाठी जागृती करण्यात आली.

22 जुलै 2025 रोजी समाजशास्त्र शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसह ग्रंथालयास भेट आयोजित करण्यात आली. सव्वा लाख पुस्तकांचे संग्रह असणारे दयानंद कला महाविद्यालयाचे ग्रंथालय ज्ञान निर्मितीसाठी कशा पद्धतीने उपयुक्त ठरावे याविषयी ग्रंथालयाकडून डॉ अपर्णा पसारकर, श्रीकांत जोशी यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथालयातील शब्दकोश, परिभाषा कोश, संदर्भ ग्रंथ, संशोधन प्रबंध, पुस्तके यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

9 ऑक्टोबर 2025 रोजी संवेदना या दिव्यांग पुनर्वसन केंद्रास विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली.याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील 64 विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये पदवी आणि पदव्यूत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांना प्रकल्प कार्य कसे करावे, दिव्यांग विद्यार्थ्यांचे जीवन, त्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाय याविषयी जागृती करून देण्यासाठी संवेदना केंद्राच्या संचालिका सौ दीपा पवार आणि संवेदना केंद्रातील अनेक शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन विद्यार्थ्यांना जवळून पाहता आले. दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी दिले जाणारे इलेक्ट्रॉनिक्सचे, चित्रकलेचे, शिवणकामाचे शिक्षण, त्यांच्या हस्तकलांचे भरवले जाणारे प्रदर्शन याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. दिव्यांगांना समाजात आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांनी दिले.

17 नोव्हेंबर 2025 रोजी नवरात्र निमित्ताने दयानंद कला महाविद्यालय परिसरातील स्वच्छता करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आणि त्यांच्या आरोग्यवर्धनासाठी त्यांना खजूर वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ अंजली जोशी तसेच कार्यालय अधीक्षक श्री संजय व्यास यांनी महाविद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना खजूर वाटप केले आणि त्यांचा सन्मान केला. याप्रसंगी सर्व कर्मचाऱ्यांना प्राचार्य कक्षात बोलावून त्यांचा सन्मान केल्याबद्दल सर्व महिला कर्मचाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आणि स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचे आश्वासन दिले.

4 फेब्रुवारी 2026 रोजी समाजशास्त्र विषय शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी मातोश्री वृद्धाश्रमाला भेट दिली.

गेल्या आठ वर्षापासून मातोश्री वृद्धाश्रमाशी दयानंद कला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने अंतर्गत सामंजस्य करार (MOU) केलेला आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमात वृद्धांना भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला, त्यांची दैनंदिनी समजून घेऊन त्यांच्या समस्यासंबंधित चर्चा केली. मातोश्री वृद्धाश्रमाचे पालकत्व लातूर येथील विवेकानंद रुग्णालयाने घेतलेले असल्याने तेथील स्वच्छता, वृद्धांच्या आरोग्याची काळजी, आणि वृद्धांचे जीवन पाहून विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. आपल्या पालकांना जीवनात कधीही अंतर न देण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांनी दिले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमाचे सर्वेक्षण केले. त्यातून त्यांना संशोधनाविषयी मार्गदर्शन मिळाले.

13 मार्च 2026 रोजी ' पेटंट फिलिंग प्रक्रिया, संशोधन आणि त्यातील अडचणी' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक डॉ. बालाजी कळंबे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. ही कार्यशाळा सर्व प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी डॉ बालाजी कळंबे यांनी पेटंट फिलिंग प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितली. प्राध्यापकांच्या याबाबतच्या अडचणींचे समाधानकारक निवारण केले. संशोधन आणि पेटंट याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ अंजली जोशी यांनी पेटंट फिलिंग प्रक्रिया का महत्त्वाची आहे यावर प्रस्ताविक मांडले. आयक्यूएसी चे समन्वयक डॉ संतोष पाटील, प्रा संजय स्वामी, प्रा ज्योती कदम तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

समाजशास्त्र विभागाअंतर्गत कौटुंबिक हिंसाचार, स्त्री-पुरुष समानता, मतदार जागृती, तरुणांचा राजकारणातील सहभाग अशा विषयांवर विद्यार्थ्यांचे सेमिनार आणि ग्रुप डिस्कशन घेण्यात आले.

समाजशास्त्र विभागाकडून पदवी आणि पदव्युतर वर्गासाठी मिळून 4 प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवण्यात आले.

**पदवी वर्गासाठी:**

a ट्रॅफिक सेक्युरिटी अँड सोशल अवेअरनेस,

b कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी

**पदव्युत्तर वर्गासाठी :**

a जेंडर एथिक्स अँड इक्वलिटी

b इम्पॉर्टन्स ऑफ सोशल व्हॅलुस

मागील शैक्षणिक वर्षात 2024- 25 मध्ये प्रत्येक वर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला स्नेहसंमेलना निमित्ताने पुस्तके भेट देण्यात आली. पदवी प्रथम वर्षातून प्रथम अनुराधा शिंदे, द्वितीय वर्षातून प्रथम राधा कांबळे आणि तृतीय वर्षातून प्रथम सुरज गोरे.

दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांनी विविध उपक्रमांसाठी मान्यता दिली. तसेच समाजशास्त्र विभागात तात्पुरत्या स्वरूपात कार्य करणारे डॉ भगवान बोकडे, डॉ संजय स्वामी आणि प्रा ज्योती कदम या सर्वांचे सहकार्य मिळाले त्यासाठी सर्वांचे आभार व्यक्त करते.

**डॉ. अंजली जोशी**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
आणि उपप्राचार्य

# फॅशन डिझाईन विभाग

शैक्षणिक वर्ष 2025-26 सुरुवात फ्रेशर्स डे याद्वारे करण्यात आली. प्रथम वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थिनीद्वारे करण्यात आले कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान नवनिर्वाचित विद्यार्थ्यांची ओळख तसेच मजेदार गेम्स व खूप सार मनोरंजन याद्वारे कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मिस आणि मिस्टर फ्रेशर्स ठरविणे आणि ही प्रक्रिया खालील काही राऊंडद्वारे घेण्यात आली

**मिस्टर आणि मिस फ्रेशर्स (Mr. & Miss Fresher) :**
हा पार्टीचा सर्वात महत्त्वाचा भाग असतो. याची निवड करण्यासाठी तीन फेऱ्या घेण्यात आल्या.
१. रॅम्प वॉक (Ramp Walk)ः आत्मविश्वास आणि स्टाईल तपासण्यासाठी.
२. टॅलेंट राऊंडः गाणे, डान्स किंवा कोणतीही कला सादर करणे.
३. प्रश्न-उत्तर फेरीः व्यक्तिमत्व आणि बुद्धिमत्ता तपासण्यासाठी परीक्षकांनी विचारलेले प्रश्न.

वरील सर्व राऊंडद्वारे मिस फ्रेशर कु. वैदेही मुंदडा तसेच मिस्टर फ्रेशर श्री. करण थोरे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड तसेच उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी समवेत विभागातील सर्व स्टाफ उपस्थित होते.

दि. 13/8/2025 रोजी योगा वर्कशॉप शिल्पा कदम योग ट्रेनर याच्याद्वारे फॅशन डिझाईन विभागातील विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आले होते. यामध्ये दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व तसेच सोप्या पद्धतीने योगासने कशी करावी याचे प्रात्यक्षिक योग ट्रेनरद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आले. योग प्रशिक्षणाठी जवळपास 80 ते 90 विद्यार्थी व 8 स्टाफ उपस्थित होता.

दिनांक 9/9/2025 रोजी पूनम डिझायनर स्टुडिओ लातूर यांच्यामार्फत विभागामध्ये कॅम्पस मुलाखत आयोजित करण्यात आली होती. मुलाखतीसाठी बी.ए. फॅशन डिझाईन तृतीय वर्ष तसेच एम.ए. फॅशन डिझाईन द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी यांनी मुलाखत दिली. यामध्ये बी.ए. तृतीय वर्षातील बोराडे विद्या, वैष्णवी कापरे, खूलगे साक्षी या विद्यार्थिनींची निवड असिस्टंट ज्युनिअर डिझायनर या पदासाठी करण्यात आली. मुलाखतीसाठी जवळपास 40 ते 50 विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक 20/09/2025 रोजी फॅशन डिझाईन विभागाची सहल बीड येथील कपिलधारा तसेच आंबेजोगाई या ठिकाणी घेऊन जाण्यात आली होती . ट्रीप साठी 120 विद्यार्थी व आठ स्टाफ उपस्थित होता.

दिनांक 20/09/2025 रोजी Intellectual property Rights या विषयावरती प्राध्यापिका प्रिया पाटील, दयानंद विधी महाविद्यालय याच्याद्वारे एक्सपर्ट लेक्चर एम. ए. फॅशन डिझाईन प्रथम व द्वितीय वर्ष या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना डिझाईनिंग क्षेत्रामधील पेटंट कसे तयार करायचे तसेच कॉपीराईट ॲक्ट याबद्दल सविस्तर अशी माहिती देण्यात आली. लेक्चरसाठी जवळपास 80 ते 90 विद्यार्थी व 08 स्टाफ उपस्थित होते.

राजर्षी शाहू महाविद्यालयात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय 'रक्तदान श्रेष्ठदान' या विषयावर पोस्टर प्रजेंन्टेशन स्पर्धेत तृतीय बीए फॅशन डिझाईन तृतीय वर्षातील विद्यार्थिनी आदिती बंडे हिचा प्रथम क्रमांक आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड याच्याद्वारे सत्कार करण्यात आला

दिनांक 30/12/2025 रोजी हरहायनेस डिझायनर स्टुडिओ यांच्यामार्फत फॅशन डिझाईन विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्यू आयोजित करण्यात आला होता जवळपास 60 ते 70 विद्यार्थ्यांनी interview दिला स्टुडिओचे संचालक आदित्य लाटकर व सायली पवार यांच्याद्वारे मुलाखत घेण्यात आली .

**फ्युजन 2026 – राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा संपन्न दिनांक 25/02/2025**

दयानंद शिक्षण संस्था, दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील फॅशन डिझाइन विभाग मागील 15वर्षांपासून बी. ए. व एम. ए. वर्गासाठी अविरत अत्याधुनिक फॅशन डिझाईन विषयाचे शिक्षण देत आहे. अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर यशस्वी उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत. विभागाच्या वतीने भव्य व दिमाखदार ‘फ्युजन २2026 राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा दिनांक 25/2/2026 रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली.

या उपक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय लक्ष्मीरमणजी लाहोटी साहेब, सचिव श्री. रमेशजी बियाणी साहेब तसेच श्री. विशालजी आग्रवाल तसेच सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाची मोलाची साथ लाभली. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सौ. संगीता लाहोटी, डॉ. पद्मजा बियाणी,परीक्षक वसुधा माने तसेच श्रध्दा सोनटक्के बंगलोर, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांमधून २६० युवक-युवतींनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध सत्रे व फेऱ्यांमधून ही स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली.

स्पर्धक विद्यार्थ्यांनी केवळ आकर्षक वेशभूषाची निर्मितीच केली नाही, तर आत्मविश्वासपूर्ण कॅटवॉक व प्रभावी सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. ही स्पर्धा युवक-युवतींसाठी करिअरच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरली.

संस्थेचे सुसज्ज सभागृह, नेत्रदीपक प्रकाशयोजना, उत्कृष्ट संगीत संयोजन आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी व संस्मरणीय ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख प्रा. सुवर्णा लवंद (नाईक), प्रा. हर्षा जैन , प्रा. कुलकर्णी, प्रा. नीलावार, प्रा बिराजदार प्रा. मानसी आग्रे प्रा भाग्यश्री कुलकर्णी आणि फॅशन डिझाइन विभागातील विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले सूत्रसंचालन डॉ. मीना घुमे व सविता कोतवाल यांनी केले. स्पर्धकांना प्रथम पारितोषक 11000 रुपये तसेच द्वितीय 7000 व तृतीय 5000 त्याचबरोबर प्रत्येक थीमनुसार प्रथम 10000 द्वितीय 700 व तृतीय 500 असे एकूण 25 बक्षिसे ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात आले. दयानंद कला महाविद्यालयाच्या फॅशन डिझाइन विभागाने साकारलेला हा उपक्रम निश्चितच नेत्रदीपक व अविस्मरणीय ठरला. शैक्षणिक वर्ष 2025-26 सांगता तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देऊन करण्यात आला.

**प्रा. सुवर्णा लवंद नाईक**
फॅशन डिझाईन विभाग

# प्रशासकीय सेवा विभाग

दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवासांठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून देणे तसेच स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी घडवून आणणे या उद्देशाने बी.ए. प्रशासकीय सेवा हा पदवी अभ्यासक्रम जून २०१६ पासून सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासन तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची मान्यता प्राप्त आहे.

अलिकडच्या काळात स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व आणि प्रशासकीय सेवामंध्ये करिअर करण्याची विद्यार्थ्यांची वाढती इच्छा लक्षात घेऊन दयानंद शिक्षण संस्थेने हा अभ्यासक्रम सुरू केला. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना नियमित पदवी शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास एकाच वेळी करण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे.

बी.ए. प्रशासकीय सेवा हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असून, राज्य व केंद्र शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत अशा स्वरूपात त्याची रचना करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिपाई पदापासून ते जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, तहसीलदार, गटविकास अधिकारी, कर निरीक्षक, लिपिक तसेच इतर विविध शासकीय पदांसाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये विद्यार्थ्यांना प्राप्त होतात.

या अभ्यासक्रमात मराठी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, सामान्य विज्ञान, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी व अंकगणित इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

विभागामध्ये सध्या प्रा. डॉ. संतोष पाटील हे विभागप्रमुख म्हणून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण आठ प्राध्यापक अध्यापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडत आहेत. अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार अध्यापन, नियमित सराव परीक्षा, मार्गदर्शन व्याख्याने, मुलाखत प्रशिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून दिले जाते.

विभागाच्या स्थापनेपासून आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी विविध शासकीय विभागामंध्ये वेगवेगळ्या पदांवर यश संपादन करून नियुक्ती मिळविली आहे. त्यामुळे बी.ए. (प्रशासकीय सेवा) विभागाने स्पर्धा परीक्षा क्षेत्रात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ निर्माण करण्याची आपली परंपरा यशस्वीपणे कायम राखली आहे.

### बी.ए. प्रशासकीय सेवा विभाग पदवी कोर्सचे वैशिष्ट्ये

1. स्पर्धा परीक्षेची परिपूर्ण तयारी
2. UPSC/MPSC/BANKING/RAILWAY/SSC/कृषी / अभियांत्रिकी व इतर सर्व स्पर्धा परीक्षांची परिपूर्ण तयारी
3. अनुभवी व उच्चशिक्षित शिक्षकवृंद
4. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष

5. अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अभ्यासिका (Reading) ग्रंथालय, क्लासरुम, डिजिटल हॉल इ. सुविधा उपलब्ध
6. UPSC / MPSC आयोगाच्या धर्तीवर सराव पेपर
7. अधिकाऱ्यांचे गेस्ट मार्गदर्शन
8. प्रिंटेड नोट्स व डिजीटल पध्दतीद्वारे अध्यापन केले जाते.
9. प्राध्यापकाकडून विद्यार्थ्यांचे वेळोवेळी समुपदेशन (Counselling)
10. प्रत्येक शनिवारी सराव पेपर व पेपर विश्लेषण

**बी.ए. प्रशासकीय सेवा विभागातील सुविधा**

1. स्वतंत्र अद्ययावत सुविधासह सुसज्य इमारत
2. एक लाखापेक्षा जास्त पुस्तकांचा समावेश असणारे अप्रतिम ग्रंथालय
3. घटकनिहाय प्रिंटेड नोट्स
4. शंका निरसन सुविधा
5. डिजीटल क्लासरुम
6. सर्व स्पर्धा परीक्षांची सखोल माहिती व मार्गदर्शन
7. दर्जेदार मासिके व वार्षिकी उपलब्ध आहेत
8. अनुभवी व तज्ज्ञ सुप्रसिद्ध शिक्षकवृद
9. प्रत्येक घटकावर सराव प्रश्न
10. अधिकाऱ्यांशी संवाद

**बी.ए. प्रशासकीय सेवा विभाग अभ्यासक्रमातील विषय**

| | |
|---|---|
| भाषा विषय | 1. मराठी |
| | 2. इंग्रजी |
| C. SAT विषय | 3. गणित |
| | 4. बुध्दीमत्ता चाचणी |
| | 5. मराठी व इंग्रजी उतारे |
| सामान्य अध्ययन | 6. इतिहास |
| | 7. भूगोल |
| | 8. भारतीय राज्यव्यवस्था |
| | 9. पंचायत राज |
| | 10. सामान्य विज्ञान |

शैक्षणिक वर्षे 2025-26 मध्ये विभागातर्फे वर्गातील अध्यापनाव्यतिरिक्त विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला 31 जूलै 2025 रोजी बी.ए. प्रशासकीय सेवा प्रथम वर्षे प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. गायकवाड सर उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर श्री. आस्लम

तडवीसर, गटविकास अधिकारी, लातूर ऐश्वर्या चितारी मॅडम, सहाय्यक गटविकास अधिकारी, लातूर स्नेहल कदम मॅडम तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी मॅडम, प्रशासकीय सेवा विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील सर, तसेच विभागातील प्रा. उत्तम दुधभाते, प्रा. शिवलिंग गोगे, प्रा. यशवंत जगताप, प्रा. गोविंद जाधव, प्रा. महेश मोरे, प्रा. भाऊसाहेब पुरी, प्रा. प्रधान धावारे, प्रा.भाऊसाहेब हलगरे व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक यांनी स्पर्धा परीक्षा विषयी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले तर प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. 14 मार्च 2026 ते 28 मार्च 2026 या कालावधीमध्ये विभागाच्या वतीने UPSC / MPSC स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे सात दिवशीय आयोजन करण्यात आले होते. या सात दिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. गायकवाड सर विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील सर प्रमुख मार्गदर्शक PSI अजय पवार सर याची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन सई शिंदे व आशुतोष काटे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. उत्तम दुधभाते यांनी केले या कार्यशाळेत सात दिवस विविध मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | विषय | मार्गदर्शक प्राध्यापक |
|---|---|---|---|---|
| 1 | 14.03.2026 | 2 ते 5 | MPSC/UPSC अभ्यासक्रम | अजय पवार (PSI) |
| 2 | 16.03.2026 | 2 ते 5 | जनरल माहिती | अमीर जब्बार सय्यद (PSI) |
| 3 | 17.03.2026 | 2 ते 5 | चालू घडामोडी | प्रा. रमेश भारती |
| 4 | 18.03.2026 | 2 ते 5 | मराठी | प्रा. शरद दाणे |
| 5 | 20.03.2026 | 2 ते 5 | पोलीस भरती | सुरनर देवानंद<br>गोरे सुमित<br>सायली सुरनर |
| 6 | 27.03.2026 | 2 ते 5 | MPSC/UPSC<br>अभ्यासक्रमाचे नियोजन | आकाश मुंढे<br>(कृषी अधिकारी) |
| 7 | 28.03.2026 | 2 ते 5 | सामान्यज्ञान | प्रा. राजु बैरागी |

या सात दिवशीय कार्यशाळेत कार्यशाळा प्रमुख प्रा. उत्तम दुधभाते, प्रा. शिवलिंग गोगे, प्रा. यशवंत जगताप, प्रा. भाऊसाहेब पुरी, प्रा. निलेश निला, प्रा. गजानन कस्तुरे प्रा. मनीषा साबळे, प्रा. भाऊसाहेब हलगरे याची व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**बी.ए. प्रशासकीय सेवा विभागाच्या वतीने**

**पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ले दर्शन व कोकण दर्शन**

या शैक्षणिक सहलीचे दि. 19 फेब्रुवारी 2026 ते दि. 22 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये प्रा. शिवलिंग गोगे व 44 विद्यार्थ्यांनी सहभाग नोदविला या सहलीत पाचगणी, विशालगड, पन्हाळा, महाड, पंचगंगा मंदीर, सिंधुदुर्ग किल्ला इ. स्थळे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

बी.ए. प्रशासकीय सेवा विभागातून उत्तीर्ण झालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षामंध्ये यश संपादन करून राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागामंध्ये उल्लेखनीय पदावंर नियुक्ती मिळविली आहे. त्यापैकी काही विद्यार्थ्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहेः

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| 1 | गोविंद जगताप | न्यायालयीन लिपीक, लातूर |
| 2 | विशाल नारके | महसूल सहाय्यक |
| 3 | प्रेरणा चव्हाण | उत्पादन शुल्क कॉन्स्टेबल, लातूर |
| 4 | सचिन जाधव | आरोग्य सेवक |
| 5 | वैष्णवी शिंदे | रत्नागिरी पोस्टमॅन |
| 6 | धरती राठोडे | चंद्रपूर पोस्टमॅन |
| 7 | प्रांजली गवाले | पोस्ट ऑफिस |
| 8 | संगमेश्वर मठपती | सॅक |
| 9 | धनराज नागरगोजे | मनपा कर्मचारी, लातूर |
| 10 | बालाजी सातपुते | अग्निशामक |
| 11 | पूनम नवघरे | NDF पुणे |
| 12 | आदित्य सांळुके | फुड इनस्पेक्टर (Indian Army) |

या विद्यार्थ्यांच्या यशामुळे विभागाची शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची परिणामकारकता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागाने केलेले प्रयत्न अधोरेखित होतात. विभाग भविष्यातही गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रशासकीय व इतर शासकीय सेवामंध्ये यश मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

सन २०२६ मध्ये कु. पूनम नवघरे व श्री. आदित्य साळुंखे यांनी स्पर्धा परीक्षामंध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शासकीय सेवेत निवड मिळविल्याबद्दल बी.ए. प्रशासकीय सेवा विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवा विभागातील विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2025-26 शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील सर व सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूचसंचालन कु. श्रेया पुरी व श्री. आशुतोष काटे या विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमात प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे त्याची विविध शासकीय पदावर निवडीसाठी यशस्वी प्रयत्न करणे हे विभागाचे उद्दिष्टये आहे.

**प्रा. डॉ. संतोष पाटील**
समन्वयक

# मराठी वाङ्मय मंडळ

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये साहित्य, कलागुणाची आवड निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी मराठी भाषा व वाङ्मय विभागातंर्गत मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात येते. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष 2025 26 मध्ये मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड निबंध स्पर्धेचे आयोजन करून त्यातून गुणाानुक्रमे करण्यात आली. चालू शैक्षणिक वर्षातील मराठी वाङ्मय मंडळाचा अध्यक्ष म्हणून एम. ए. प्रथम वर्षातील श्री. ओमकार सुरवसे याची निवड करण्यात आली.

मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रा. संदिपान मोरे याच्या हस्ते करण्यात आले .या मंडळातंर्गत वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी एम .ए .द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एम .ए . प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करून त्याचे स्वागत करण्यात आले. 14 जानेवारी ते 28 जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने 'राजन गवस याचे वाङ्मयीन कार्य' या विषयावर विस्तारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ.संभाजी पाटील याची उपस्थिती होती. तसेच प्रा.डॉ.रवींद्र बेंबरे यानी 'संत साहित्याचे योगदान' या विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या पंधरवडा निमित्त आंतरजिल्हा निबंध स्पर्धा, कवी संमेलन, पुस्तक परीक्षण, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा ,कथाकथन, वाचन कट्टा इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

27 फेब्रुवारी हा दिवस कवी कुसुमाग्रज याचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो त्यानिमित्त मराठी भाषेचा गौरव व्हावा या उद्देशाने सौ.समिधा कोलगणे याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .मराठी भाषेला भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा घोषित केल्यानंतर आनंदोत्सव साजरा करण्यासाठी अभिजात मराठी भाषा गौरव सोहळा साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील स्नेहसंमेलन 'कला तीर्थ '2026 निमित्त कथाकथन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी स्पर्धकांना स्नेहसंमेलनामध्ये बक्षीस ही वितरण करण्यात आले .भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग, मुंबई व दयानंद कला महाविद्यालय, मराठी विभाग याच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार 'बोलींचा जागर 'ही राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली .याप्रसंगी सकाळी ग्रंथ दिंडी आयोजित करून दुर्मिळ ग्रंथाचे ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आले होते. दुपारच्या सत्रामध्ये डॉ.हंसराज भोसले व डॉ. विठ्ठल जंबाले या बोली तज्ज्ञाचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. एम ए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आयोजित करून त्याना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.अशा विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांचे साहित्याविषयी अभिरुची निर्माण करण्याचे कार्य या मंडळाने वर्षभरात केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड याच्या मार्गदर्शनानुसार या मंडळाचे प्रभारी प्राध्यापक म्हणून काम पाहिले.

**प्रा. राजकुमार मोरे**
प्रभारी
मराठी वाङ्मय मंडळ

# अंतर्गत तक्रार निवारण समिती

2014 साली न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी निकालाद्वारे सूचित केल्यानुसार दयानंद कला महाविद्यालयामध्ये 2014-15 या शैक्षणिक वर्षापासून अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

अंतर्गत तक्रार निवारण समिती

मार्गदर्शनः प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड

अध्यक्षः उपप्राचार्य डॉ अंजली जोशी

सदस्यः 1. श्रीमती कुमुदिनी भार्गव (जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या)
2. प्रा सुवर्णा लवंद
3. प्रा दुर्गा शर्मा
4. प्रा अंजली बनसोडे
5. श्रीमती अश्विनी सुरवसे
6. अधीक्षक संजय व्यास

समितीचे उद्देशः

1. महिलांना निर्भीड वातावरणामध्ये काम करता यावे आणि त्यांच्या तक्रारी त्यांना मोकळेपणाने मांडता याव्यात.
2. महिलांविषयी समभाव जागृत व्हावा
3. महिलांना सुरक्षा मिळावी
4. त्या दृष्टिकोनातून समुपदेशनाचे कार्य व्हावे.

वरील अनुषंगाने दयानंद कला महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार निवारण समिती पुढील उपक्रम राबवते.

1. अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि अक्ष कौन्सिलिंग सेंटर याच्यामध्ये एक सामंजस्य करार ( MOU) करण्यात आला. त्यानुसार कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अक्ष कौन्सिलिंग सेंटर तर्फे काउन्सलिंग उपलब्ध करून देण्यात येईल. आणि त्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम करण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाईल.

2. वरील MOUअंतर्गत ' Sukoon : A journey within ' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत कला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी याच्यासाठी मानसशास्त्रीय जागृती घडवणारे सेशन आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रा उर्मिला भादंर्गे, मानसशास्त्र विभाग प्रमुख, उपकेंद्र,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या कुमुदिनी भार्गव याची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी या कार्यशाळेद्वारे मानवी शरीरातील मानसशास्त्रीय घडामोडी, त्यामुळे निर्माण होणारे ताणतणाव आणि त्याचे निवारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड, अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ अंजली जोशी, डॉ दुर्गा शर्मा,डॉ सुवर्णा लवंद , प्रा अंजली बनसोडे, श्रीमती अश्विनी सुरवसे तसेच सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेत उपस्थित कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्यात आली. संयोजन डॉ दुर्गा शर्मा आणि प्रा सुवर्णा लवंद यांनी केले.

3. 31 डिसेंबर 2025 रोजी महिला प्राध्यापकांची आणि कर्मचाऱ्यांची पर्यावरण पूरक सहल आयोजित करण्यात आली. लातूर जवळील ऍग्रो फार्म येथे नैसर्गिक पर्यावरणामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या सहलीस बहुताश

महिला प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी पर्यावरण हानी टाळण्यासाठी जागृती वाढवण्याचे आवाहन करण्यात आले.

4. 16 जानेवारी 2026 रोजी Menstrul Pad Awareness Program' आयोजित करण्यात आला. महिलांना मासिक पाळी दरम्यान येणाऱ्या अडचणी आणि त्यामध्ये यावेळी वापरण्यात येणाऱ्या पॅडचा योग्य वापर यावर श्रीमती शिरोळे यांनी मार्गदर्शन केले आणि सुती पॅडचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमास महिला प्राध्यापिका आणि कर्मचारी उपस्थित होत्या. या कार्यशाळेतून अनेक बाबींचे ज्ञान महिलांना मिळाले.

5. 9 मार्च 2026 रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात 'महिला दिन' साजरा करण्यात आला. महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनी एकत्रित येऊन ' मै अपनी फेवरेट क्यू हू? ' या विषयावर ग्रुप डिस्कशन केले. महिलांच्या सुप्त शक्तींना चालना देण्यात आली. त्याद्वारे महिलांनी गाणे, नृत्य, कविता सादर केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांनी सर्व महिलांचा सन्मान केला. याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ प्रशांत दीक्षित उपस्थित होते. महिला दिनाच्या कार्यक्रमाचे संचलन प्रा दुर्गा शर्मा आणि प्रा सुवर्णा लवंद यांनी केले.

6. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने दयानंद कला महाविद्यालयामध्ये संवाद मंचाची स्थापना करण्यात आली. या संवाद मंचा अंतर्गत दोन प्राध्यापिकांनी पुढाकार घेऊन एक महत्त्वाचा विषय महिलांना अभ्यासासाठी द्यावा, त्यावर महिलांनी मनमोकळी चर्चा करून आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधावीत अशी संकल्पना मांडण्यात आली. या व्यासपीठावरून ' आपण स्वतःवर का प्रेम करतो? हा विषय पहिल्या बैठकीमध्ये देण्यात आला. याप्रसंगी सर्व प्राध्यापिका आणि कर्मचारी यांनी आपले मनोगत उत्कृष्टपणे आणि धाडसाने व्यक्त केले. त्यातून त्यांचा आत्मविश्वास दिसून आला. काहीजणींना यावर बोलता आले नाही. किमान अशा गोष्टींवर विचार करता यावा हाच या संवाद मंचाचा उद्देश होता. महिलांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांची सपोर्ट सिस्टीम तयार व्हावी हा या संवाद मंचाचा उद्देश आहे.

7. 2025-26 या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम टप्प्यामध्ये सर्व महिला प्राध्यापका आणि कर्मचारी यांनी एकत्र येऊन डबा पार्टी साजरी केली. याप्रसंगी पुढील शैक्षणिक वर्षामध्ये राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. महिलांना कोणत्या स्वरूपाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतील याविषयी चर्चा करण्यात आली.

अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे,

1. महिला कर्मचारी आणि प्राध्यापिका याच्यात संवाद वाढवण्यात आला.
2. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याच संवादातून देण्यात आली.
3. महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारी सोडवण्यात आल्या.
4. विद्यार्थिनींच्या मागणीनुसार लेडीज रूम मध्ये असणारे परंतु सध्या नादुरुस्त असणारे सॅनिटरी पॅडचे वेंडिंग मशीन बदलण्यात आले. रोटरी क्लबच्या माध्यमातून डॉ दिलीप नागरगोजे याच्या सहकार्याने नवीन वेंडिंग मशीन 13.4.2026 रोजी लेडीज रूम मध्ये बसवण्यात आले.

अंतर्गत तक्रार निवारण समितीचे हे कार्य आणि वाटचाल अशी सुरू राहण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड याचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी याच्या सहकार्याने वरील उपक्रम पूर्णत्वास गेले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**डॉ अंजली जोशी**
अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण समिती

# सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ

दरवर्षी प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड सर यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाची कार्यकारणी तयार करण्यात आली. यासाठी समन्वयक प्रा डॉ रामेश्वर खंदारे सर यांनी दि.०५/०२/२०२६;मुलाखत प्रक्रियेद्वारे पुढील कार्यकारणी व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

दयानंद कला महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड.

| | | |
|---|---|---|
| वसंत कुलकर्णी | - | अध्यक्ष |
| कामाक्षा मुदाळे | - | उपाध्यक्ष |
| त्रिमुख इगवे | - | सचिव |
| विमल पाल | - | कोषाध्यक्ष |
| देवांश पाचंगे | - | संपादक |
| विशाल भागुंरे | - | प्रसार माध्यमे प्रमुख |
| निलेश वाघमारे | - | कलामंच प्रमुख |
| सोनिया कांबळे | - | सदस्य |
| स्वाती जाधव | - | सदस्य |
| अमृता काळे | - | सदस्य |
| अश्विनी चव्हाण | - | सदस्य |
| शुभम जानापुरे | - | सदस्य |
| अभिषेक ठाकूर | - | सदस्य. |

दि.९/२/२०२६ दयानंद कला महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन दयानंद कला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी,राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ स्तरावर राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्री. भरत पवार व प्रमुख  अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लोककलावंत अपर्णा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी IQAC संचालक प्रा. डॉ संतोष पाटील सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या बोध चिन्हाचे ही अनावरण करण्यात आले प्रथमच सामाजिक शास्त्रे

अभ्यास मंडळाचे बोध चिन्ह तयार करण्यात आले होते विशेष म्हणजे या बोध चिन्हाची निर्मिती ही मंडळाचे सचिव त्रिमुख इगवे यांनी केली आहे या कार्यक्रमास प्रा स्फूर्ती समुद्रे मॅडम प्रा.चैतन्य शिंदे सर प्रा. अश्विनी धायगुडे मॅडम व सर्व पदाधिकारी सदस्य विद्यार्थी मोठी संख्येने उपस्थित होते.

लातूर. गुरुवार दि. १९/२/२०२६ रोजी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली तसेच सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे सदस्य सोनिया कांबळे, स्वाती जाधव, अभिषेक ठाकूर, वसंत कुलकर्णी, अश्विनी चव्हाण यांनी शिवकालीन प्रशासन आणि शिवरायांचे विविध दृष्टिकोन यावर भित्तीपत्रक तयार केले यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लक्ष्मी रमणजी लाहोटी सर सचिव रमेश बियाणी सर दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड सर, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड सर, मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे सर, डॉ गणेश लहाने सर, प्रा स्फूर्ती समुद्रे मॅडम, मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या सर्वांनी भित्तीपत्रकाच्या प्रदर्शनास भेटी दिल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले महाविद्यालयाच्या सर्व मान्यवर प्राध्यापकासमोर मंडळ संपादक देवांश पाचंगे यांनी शिवरायांच्या कार्यावर भाष्य केले.

तसेच मंडळाचे सचिव त्रिमुख इगवे यांनी तयार केलेल्या सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या बोधचिन्हाची उद्दिष्टे ही स्पष्ट केली यावेळी बहुसंख्येने प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते.

दि 25/03/2026 रोजी महाविद्यालयाच्या कलातीर्थ 2026 " वार्षिक स्नेहसंम्मेलनात सामनिक शास्त्रे अभ्यासमंडळाच्या लोगोबाबत व ब्रीदवाक्याची ओळख देवांग पाचंगे यांनी करून दिली. याप्रसंगी महाविदलयाचे प्राचार्य. डॉ. शिवाजी गायकवाड सर, यांनी कौतुक केले. तसेच प्रा डॉ. रामेश्वर खंदारे सर, प्रा स्फूर्ती समुद्रे मॅडम आणि मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते

**डॉ. रामेश्वर खंदारे**

समन्वयक

# ॲनिमेशन विभाग

प्रथम वर्षाच्या भरघोस प्रवेशासह ॲनिमेशन मधील शैक्षणिक वर्ष 2025-26 ची सुरुवात झाली. सर्वप्रथम द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टीचे आयोजन 19 ऑगस्ट 2025 रोजी केले, प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांमधून एक मिस फ्रेशर आणि एक मिस्टर फ्रेशर निवडण्यात आले.

पारंपरिक मूर्ती मधील प्लास्टर ऑफ पॅरिस आणि विषारी रसायनामुळे होणाऱ्या प्रदूषणापासून जलस्तोत्राचे संरक्षण करणे यासाठी "इको फ्रेंडली गणेशा" ह्याची तीन दिवसीय कार्यशाळा 25, 26, 27 ऑगस्ट 2025 रोजी घेण्यात आली, प्रा. सुधाकर सूर्यवंशी यांनी मातीपासून गणेशाची मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले तसेच मातीपासून गणपती विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात तयार केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला व त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. विद्यार्थिनीच नव्हे तर कार्यालयीन कर्मचारी प्राध्यापक यांनीही गणपती मूर्ती तयार केल्या आणि तयार केलेले गणपती त्यांच्या घरी प्रस्थापित करण्यात आले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी उपस्थित होते.

तसेच दिनांक 22 सप्टेंबर ते 29 सप्टेंबर 2025 रोजी ॲनिमेशन विभागातर्फे प्रा. सचिन पतंगे यांनी ग्राफिक डिझाईन वर्कशॉप दयानंद कला महाविद्यालय मध्ये घेण्यात आला त्यामध्ये विद्यार्थ्यांनी ग्राफिक डिझाईन संबंधित कौशल्य आत्मसात केली. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी उपस्थित होते. कार्यक्रमास सौ. शीतल कोरे, डॉ. रोहिणी शिंदे, विभागप्रमुख, दयानंद विज्ञान महाविद्यालय  प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील उपस्थित होते.

दिनांक 13 व 14 सप्टेंबर 2025 रोजी आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलाकार ओव्हरसीज ॲनिमेशन कंपनीचे क्रिएटिव्ह डिरेक्टर, मुंबई येथून दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यासाठी खास श्री. सतीश थोकाडे यांना आमंत्रित केले होते त्यांनी "कॅरेक्टर डिझाईन फ्रॉम स्केच टू सोल" यावर प्रात्यक्षिकासह सखोल मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या अडचणींना कसे सामोरे जायचे याबद्दल धडे दिले. या कार्यशाळेसाठी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री रमेशजी बियाणी तसेच श्री. रवींद्र व्होरा, श्री चैतन्य भार्गव, श्री नयन कुमार नावंदर, अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष श्री. जितेंद्र पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड याची उपस्थिती होती.

17 डिसेंबर 2025 रोजी सिनेमा निर्देशक स्टोरी टेलर क्रिएटिव्ह प्रोफेशनल असणारे श्री निलेश कुंजीर यांना ॲनिमेशन विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांनी स्वतः बनवलेली फिल्म दाखवून विद्यार्थ्यांना निर्देशनाबाबत मार्गदर्शन केले. अगदी सूक्ष्म प्रकारचे निरीक्षण कसे करावे हे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले, तसेच स्टोरी तुमच्या डोक्यात जरी असेल तरी त्याला स्क्रीनवर आणण्यासाठी कशाप्रकारे मेहनत घ्यावी लागते, याबद्दलही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी उपस्थित होते.

16 ते 19 डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या अभिजात इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवल मध्ये ॲनिमेशन मधील विद्यार्थ्यांनी वॉलेंटियर म्हणून काम केले. ॲनिमेशनमधील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या तीन फिल्म फेस्टिवल मध्ये प्रदर्शित करण्यात आल्या.

द्वितीय सत्राच्या सुरुवातीस 4 जानेवारी ते 8 जानेवारी यादरम्यान ॲनिमेशन विभागाची शैक्षणिक सहल असेंबलाज इंटरटेनमेंट स्टुडिओ मुंबई येथे भेट द्यावयास गेली. यावेळी असे कंपनीचे सीईओ अर्जुन माधवन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांची ओळख करून दिली. तसेच प्रोजेक्ट हेड स्वप्निल कोटकर यांनी विद्यार्थ्यांना जिद्दीने काम करण्याचा सल्ला दिला. ॲनिमेशन डिरेक्टर चेतन तहसीलदार व को-हेड विद्युत कुंद्रा यांनी कंपनीमध्ये केलेल्या कामाचे व्हिडिओ ब्रेक डाऊन इमेजेसद्वारा सादरीकरण केले या सहलीत दरम्यान छावा, उल्फ किंग अशा बऱ्याच सिनेमाचं मेकिंग विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या भेटीसाठी श्री सतीश थोकाडे यांनी मेहनत घेतली. तेथून पुढे सहल काशीद बीच मुरुड जंजिरा महाबळेश्वर येथे भेट देऊन खूप साऱ्या आठवणी घेऊन परत आली.

2 फेब्रुवारी ते 6 फेब्रुवारी 2026 यादरम्यान ॲनिमेशन मधील विद्यार्थ्यांसाठी सॉफ्ट स्किल ट्रेनिंग ही कार्यशाळा घेण्यात आली. ज्ञानदीप फाउंडेशन महिंद्रा प्राइड क्लासरूम आणि दयानंद कला महाविद्यालय ॲनिमेशन विभाग याच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी मुंबईहून मिस्टर हकीम लकडवाला कॉर्पोरेट ट्रेनर यांना बोलवण्यात आले, त्यांनी विद्यार्थ्यांना ट्रेनिंगचे धडे शिकवले. या ट्रेनिंग चे विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट ही देण्यात आले. पाच दिवस इयर सॉफ्ट स्किल ट्रेनिंगच्या समारोपावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अकॅडमिक डेव्हलपमेंट ऑफिसर डॉ. जयप्रकाश दरगड तसेच श्री. अनिल बिरादार ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर, दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी उपस्थित होते.

# कमवा व शिका

दयानंद कला महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' योजना राबविली जाते. या महाविद्यालयामध्ये येणारे बहुसंख्य विद्यार्थी हे ग्रामीण भागातून येतात. त्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची नाजूक असते. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना स्वकमाईतून शिक्षण घेण्यास मदत व्हावी या हेतूने ही योजना महाविद्यालयात राबवली जाते.

दरवर्षी आर्थिक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी सूचना काढून इच्छुक विद्यार्थ्यांची प्राचार्य कक्षात मुलाखत घेण्यात येते. उपस्थित विद्यार्थ्यांमधून व त्यांची गरज लक्षात घेऊन 20 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात हलकेसे एक तासाचे काम विभागून देण्यात येते. यामध्ये कार्यालय, ग्रंथालय, वर्ग-खोल्या स्वच्छता, झाडाला पाणी देणे, ग्रंथालयातील पुस्तकांची व्यवस्था, पुस्तक देव-घेव इत्यादी कामांचा समावेश होतो. अशा सहभागी विद्यार्थ्यांना महिन्याला ठराविक मानधन देण्यात येते. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी महाविद्यालयाकडून थोडीफार आर्थिक मदत होते. याशिवाय विद्यार्थी दशेपासूनच श्रम प्रतिष्ठेचे महत्त्वही पटवून देण्याचे कार्य महाविद्यालय करते.

**डॉ. रामेश्वर खंदारे**

समन्वयक

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर
# कनिष्ठ विभाग

विद्यार्थ्यांना यशाकडे घेऊन जाणारा सर्वात जवळचा मार्ग म्हणून ओळख असलेले दयानंद कला महाविद्यालय! अशा ख्यातनाम महाविद्यालयाचा उपप्राचार्य म्हणून काम करताना मला सार्थ अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा वसा घेऊन त्या दृष्टीने विद्यार्थी घडवण्याचे कार्य करणारे महाविद्यालय म्हणजे दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय होय. या महाविद्यालयाला यंदाच्या स्वाफ मूल्यांकनामध्ये अ+प्राप्त झाले आहे. आमच्या विद्यार्थ्यांचे यश आणि दयानंद कला महाविद्यालय हे दोन शब्द एकमेकांना पर्यायी झाले आहेत. कला शाखेत यशस्वी कारकीर्द करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील विद्यार्थी इयत्ता दहावी नंतर लातूरच्या दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयास प्रथम प्राधान्य देतात. आधुनिक तंत्र पद्धतीचा अध्ययन-अध्यापनासाठी वापर, सरावातील सातत्य, गुणवत्ता विकास वर्गाचे उत्तम नियोजन, शैक्षणिक सहली, प्रदर्शन, लेखन, वाचन, क्रीडा, सांस्कृतीक व संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी सातत्याने समन्वय असावा यासाठी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन, निवडक गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिक्षक पालक योजना या सारख्या अनेक योजना आखून दयानंद कला महाविद्यालय आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवून यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करीत आहे.

शैक्षणिक वर्ष-२०२५-२६ वर्षाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या यामध्ये वर्षभराच्या कामकाजाचे उत्तम नियोजन करण्यात आले.

यश मिळवण्यासाठी आवश्यक असणारी सर्वात मोठी शक्ती म्हणजे आत्मविश्वास हा आत्मविश्वास सरावातून निर्माण होतो. १२वी बोर्ड परीक्षेत यश मिळविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून सातत्याने सराव करून घेण्यासाठी महाविद्यालयातील परीक्षा विभाग प्रमुख प्रा. जिगाजी बुद्धुके, प्रा. दशरथ मनवरे व डॉ. सुधीर गाडवे यांच्याकडे परीक्षा विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली. परीक्षा विभागाने वर्षभराचे उत्तम नियोजन करून इयत्ता १२वी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ७ सराव परीक्षाचे आयोजन केले. त्याचेच फलित म्हणून महाविद्यालयाच्या १२वी बोर्ड परीक्षेचा निकाल ८८.१८% लागला. १२वी बोर्ड परीक्षेत ९४.३३% गुण घेऊन कु. शरयु कुलकर्णी प्रथम तर ९०.००% गुण घेऊन कु. गायत्री साखरे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली तर ८५% पेक्षा अधिक गुण घेऊन ०८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. अशा गुणवंत व हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी प्रत्येक सराव परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुक्रमे रुपये १०००/-, ७००/- व ५००/- या प्रमाणे रोख पारितोषिके महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येते.

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांत गुणात्मक स्पर्धा वाढावी म्हणून त्यांना प्रोत्साहनपर अनेक रोख रकमेची पारितोषिके, सन्मानचिन्ह दिली जातात. दयानंद शिक्षण संस्थेकडून १२ वी बोर्ड परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. १०,०००/-, द्वितीय रु. ७०००/- व तृतीय रु. ५०००/- रकमेचे बक्षीस दिले जाते. तसेच संस्था पदाधिकारी, माजी प्राचार्य, प्राध्यापक व माजी विद्यार्थी यांच्याकडूनही विविध रोख असे हजारो रुपयांच्या बक्षीसांची परंपरा कायम ठेवली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशात केवळ महाविद्यालयाचा वाटा नसतो तर त्यांच्या कुटुंबाचाही मोलाचा वाटा असतो. त्यामुळे शिक्षक व पालकांमध्ये संवाद असणे आवश्यक असते. असा संवाद साधला जावा यासाठी दर शुक्रवारी व शनिवारी प्रत्येकी वीस विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. बैठकीत विद्यार्थी व पालकांच्या समस्या समजून घेऊन व त्या समस्या सोडवून विद्यार्थी व पालकात एक विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात येते.

उपस्थिती समितीद्वारे दर महिन्याला अनुपस्थित विद्यार्थ्यांची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत अनुपस्थिती बाबत लघु संदेशाद्वारे व प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे संपर्क करुन माहिती देण्यात येते. विद्यार्थ्यांची ग्रामीण जीवनाशी नाळ जोडून ठेवण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचा एन.एस.एस. विभाग नेहमी अग्रेसर असतो. यासाठी महाविद्यालयात रा.से.यो. चे दोन युनीट कार्यरत आहेत. कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल भूरे आणि प्रा. सिध्दार्थ भालेराव यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात. या उपक्रमामध्ये स्वयंसेवक साई किशन सोनवणे आणि कु. साक्षी गोरे यांना उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून गौरविण्यात आले तसेच मौजे तळेगाव ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर या ठिकाणी सात दिवसाचे "शाश्वत विकासासाठी युवकः जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास" हे विशेष शिबीर घेण्यात आले.

मा. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी वर्गातील विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा मनसोक्त वापर करता यावा तसेच वाचन संस्कृती वाढावी यासाठी 'गोल्ड कार्ड' ही संकल्पना नव्यानेच राबविण्यात आली. त्यामुळे या योजनेचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था सुध्दा करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महाविद्यालयाचा क्रीडा विभाग देखील मोलाचे योगदान देत आहे. या विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेनिस, मैदानी स्पर्धा, जिम, क्रिकेट, कॅरम, क्रॉस कंट्री, बुद्धीबळ, लॉन टेनिस, मल्लखांब, शिकाई मार्शल आर्ट, योगा, कराटे इत्यादी इन्डोर व आऊटडोर क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्यात आले. या सर्व क्रीडा प्रकारात एकुण १६९ मुला-मुलींनी प्रत्यक्षात सहभागी झाले. यातील कृष्णकांत सुरवसे -110 किलो वेट लिफ्टिंग मध्ये भारतात ७ वा, कु. समीक्षा मंदे वेट लिफ्टिंग मध्ये राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व कु. वैष्णवी साळुंके क्रिकेट मध्ये राष्ट्रीय स्तरावर गोल्ड मेडल प्राप्त अशा अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला. अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हा व विभाग स्तरावरही सहभाग नोंदविला आहे.

डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. अंजली बनसोडे, प्रा. मनोज गवरे यांनी सांस्कृतिक विभागाच्या वतीने वर्षभरात गीतगायन, नृत्य, मिमिक्री, नाटक अशा विविध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे कार्य केले त्यामध्ये कु. सायली टाक हीने राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच अर्थशास्त्र व संगीत विभागाच्या वतीने शैक्षणिक सहलीचे आयोजन डॉ. गोपाल बाहेती, प्रा. दिनेश जोशी, प्रा. शांता कोटे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. शितल कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे

यांनी समाजाचे दायित्व विचारात घेऊन आपल्या आईच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त महाविद्यालयातील गरीब व होतकरु एकुण २१ विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क रु. २१०००, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दिक्षीत -५०००/-, प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी- १६५००/- प्रा. डॉ. संदीप जगदाळे - १०,०००/- प्रा. अंजली बनसोडे-५०००/- व प्रा. मनोज गवरे-५०००/- भरुन एक नवा आदर्श समाजासमोर निर्माण करण्याचे कार्य केले आहे.

दयानंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हिताचा विचार करता नाविन्यपूर्ण उपक्रम नेहमीच राबविले जातात. महाविद्यालयातील प्रत्येक वर्गात स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने अध्यापन करण्याचे कार्य केले जाते. ऑनलाईन ई-लर्निंग मॉडल्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीपीटी, व्हिडिओ, ऑनलाईन लेक्चर व ई बुक्स संदर्भातील माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इयत्ता ११वी च्या गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. तसेच कमवा व शिका या योजनेत विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेऊन त्यांना आर्थिक मदत करण्यातही आमचे महाविद्यालय अग्रेसर आहे.

दयानंद शिक्षण संस्थेचे मा.अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष मा. श्री. ललितभाई शाह, सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन तसेच प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे सूक्ष्म नियोजन व कार्यतत्परता आणि प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशासाठी आमचे महाविद्यालय नेहमीच कटीबध्द राहिल.

**डॉ. दिलीप नागरगोजे**

उपप्राचार्य

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. 10000/-, रु. 7000/- व रु. 5000/- दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली**

| अ.क्र. | वर्ग | नाव | गणुवत्ता क्र. | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | **पदवी** | | |
| १ | बी.ए.पारंपरिक | कुलकर्णी आदिती अनंतराव | २ | ७००० |
| २ | बी.ए. प्रशासकीय सेवा | खानापुरे मेघराज अख्तर | १ | १०००० |
| | | जाधव अक्षता गणेश | २ | ७००० |
| | | कंधारकर श्रेया गोविंद | ३ | ५००० |
| ३ | बी.ए. ॲनिमेशन | टेकाळे पराग चंद्रगुप्त | १ | १०००० |
| | | किर्चे प्रणव किशोर | २ | ७००० |
| ४ | बी.ए. फॅशन | सरवदे साधना नारायण | १ | १०००० |
| | | आदमाने भाग्यश्री धोंडीराम | ३ | ५००० |
| ५ | बी.व्होक ॲनिमेशन | आडे प्रविण बिभीषण | १ | १०००० |
| | | खडबडे गणेशकुमार सुखदेव | २ | ७००० |
| ६ | बी.व्होक फॅशन | बोले पुजा अंकुश | १ | १०००० |
| | | पठाण अक्सा इलियास | २ | ७००० |
| | | लोहिया गायत्री शिवप्रसाद | ३ | ५००० |
| | | **पदव्युत्तर** | | |
| १ | एम.ए. मराठी | पांचाळ व्यंकट विलास | १ | १०००० |
| | | मेखाले जयपाल सिद्धराम | २ | ७००० |
| | | राऊतराव प्रतिक्षा शिवाजीराव | ३ | ५००० |
| २ | एम.ए. हिंदी | गाजरे कल्पना ज्ञानोबा | १ | १०००० |
| | | गायकवाड भगवंती बालाजीराव | २ | ७००० |
| | | कुमठेकर आम्रपाली विश्वंभर | ३ | ५००० |
| ३ | एम.ए. इंग्रजी | जाधव पौर्णिमा बालाजी | २ | ७००० |
| ४ | एम.ए. लोकप्रशासन | यादव दिपीका राम | १ | १०००० |
| | | आदमाने पुनम सुनील | २ | ७००० |
| | | कांबळे राहुल भगवान | ३ | ५००० |
| ५ | एम.ए. संगीत | जोशी आकाश अरूणराव | १ | १०००० |
| ६ | एम.ए. ॲनिमेशन | रेवडकर गार्गी श्रीनिवास | १ | १०००० |
| | | साळुंके नचिकेत सुनीलराव | २ | ७००० |
| | | जोगदंड संगमित्रा दत्ता | ३ | ५००० |
| ७ | एम.ए.(फॅशन) | जोशी गौरी नारायण | १ | १०००० |

## महाविद्यालयात पदवी / पदव्युत्तर वर्गात
## प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेली दयानंद गुणवंत शिष्यवृत्ती

| अ.क्र. | वर्ग | नाव | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | बी.ए.प्रथम | राठोड पुनम सुरेश | ५००० |
| २ | बी.ए. द्वितीय | वेटजवळगे गायत्री ईश्वर | ५००० |
| ३ | बी.ए. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्रथम | गवळी साक्षी मारूती | ५००० |
| ४ | बी.ए.ॲडमिनीस्ट्रेटिव्ह द्वितीय | कासले रचना माधव | ५००० |
| ५ | बी.ए. फॅशन प्रथम | जगताप युवराज परमेश्वर | ५००० |
| ६ | बी.ए. फॅशन द्वितीय | वायलापिल्ली श्रीलक्ष्मी मोहनरॉय | ५००० |
| ७ | बी.ए. ॲनिमेशन प्रथम | मलाले यश संजय | ५००० |
| ८. | बी.ए. ॲनिमेशन द्वितीय | ओव्हाळ संज्योत सुरेंद्रकुमार | ५००० |
| ९. | एम.ए. इंग्रजी प्रथम | भुजबळ सरिता | ५००० |
| १०. | एम.ए. मराठी प्रथम | जगताप दिशा दत्ता | ५००० |
| ११. | एम.ए. हिंदी प्रथम | पठाण मुमताज दौडखान | ५००० |
| १२. | एम.ए. लोकप्रशासन प्रथम | कदम स्नेहा हंसराज | ५००० |
| १३. | एम.ए. संगीत प्रथम | बेंबळे सायली गंगाधर | ५००० |
| १४. | एम.ए. ॲनिमेशन प्रथम | गुंजळे सागर राजकुमार | ५००० |
| १५. | एम.ए. फॅशन प्रथम | मुळे मानसी चंद्रकांत | ५००० |
| १६. | एम.ए. इतिहास प्रथम | माधवे प्राणांजली अशोकराव | ५००० |
| १७. | एम.ए. राज्यशास्त्र प्रथम | वाघमारे अर्जुन अशोक | ५००० |
| १८. | एम.ए. अर्थशास्त्र प्रथम | शेख शिरीन जलील | ५००० |

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ-२०२५'**

**सांस्कृतिक विभाग**

# विविध कलाप्रकार व गुणवंत कलावंतांची नावे

| अ.क्र. | कला प्रकार | कलावंताचे नाव | पदक | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | व्यंग चित्रकला | ज्ञानेश्वर साठे | सुवर्ण | ७०००/- |
| २. | कथा-कथन | सई शिंदे | रौप्य | ५०००/- |
| ३. | मिमीक्री | स्नेहल विभाते | रौप्य | ५०००/- |
| ४. | सुगम भारतीय गायन | भुषण पाटील | रौप्य | ५०००/- |
| ५. | स्थळ छायाचित्र | योगेश पोटभरे | रौप्य | ५०००/- |
| ६. | चित्रकला | ज्ञानेश्वर साठे | रौप्य | ५०००/- |
| ७. | सुरवाद्य (वैयक्तिक) | सुमित घाडगे | कांस्य | ३०००/- |
| ८. | शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक) | वेदिका साळुंके | कांस्य | ३०००/- |
| ९. | पोस्टर मेकिंग | ज्ञानेश्वर साठे | कांस्य | ३०००/- |
| १०. | रांगोळी | निलेश झिरमिरे | कांस्य | ३०००/- |
| ११. | फोल्क ऑर्केस्टा | १. अमित वाघमारे | | |
| | | २. अनमोल कांबळे | | |
| | | ३. सार्थक जोगदंड | | |
| | | ४. यशवंत कातळे | रौप्य | ७०००/- |
| | | ५. ओमकार भंडारे | | |
| | | ६. राम पांचाळ | | |
| | | ७. सुमित घाडगे | | |
| | | ८. गायत्री बेडजवळगे | | |
| | | ९.शितल सगर | | |

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**क्रीडा विभाग**
**पश्चिम विभागीय / अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खेळाडू २०२५–२६**

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचा प्रकार | गुणवंत क्र. | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | जिशान धावडे | व्हॉलिबॉल | सहभाग | ३०००/– |
| २. | रूद्र मंठाळे | व्हॉलिबॉल | सहभाग | ३०००/– |
| ३. | लक्ष्मी चव्हाण | व्हॉलिबॉल | सहभाग | ३०००/– |
| ४. | राणी साळुंके | व्हॉलीबॉल | सहभाग | ३०००/– |
| ५. | अक्षता आडे | व्हॉलीबॉल | सहभाग | ३०००/– |
| ६. | किरण पवार | वेटलिफ्टिंग | सहभाग | ३०००/– |
| ७. | गितांजली नागरगोजे | तायक्वांदो | सहभाग | ३०००/– |
| ८. | गिताश्री गावकरे | योगासन | सहभाग | ३०००/– |
| ९. | श्रीहरी शेंद्रे | वेटलिफ्टिंग | सहभाग | ३०००/– |
| १०. | शेख यासीन | वेटलिफ्टिंग | सहभाग | ३०००/– |
| ११. | दिग्विजय देशमुख | हॉकी | सहभाग | ३०००/– |
| १२. | वैभवी सूर्यवंशी | ॲथलेटिक्स | सहभाग | ३०००/– |
| १३. | किरण पवार | पॉवर लिफ्टिंग | सहभाग | ३०००/– |
| १४. | गितांजली नागरगोजे | पॉवर लिफ्टिंग | सहभाग | ३०००/– |
| १५. | साईराज गुताडे | बेस्ट फिजिक | सहभाग | ३०००/– |
| १६. | किरण पवार | हॅण्डबॉल | सहभाग | ३०००/– |
| १७. | शरयु सुतार | बॅडमिंटन | सहभाग | ३०००/– |
| १८. | अनुष्का गायकवाड | बॅडमिंटन | सहभाग | ३०००/– |

## दयानंद कला महाविद्यालय, लातूर
## विद्यापीठ परीक्षेतील महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | नाव | विद्यापीठ गुणवत्ता यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| १. | गाडे वैष्णवी मधुकर | बी.ए. तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| २. | कैले मयुरी नामदेव | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ३. | गुलांगे स्नेहा नागेश | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ४. | कोंडमगिरे अश्विन शिवानंद | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| ५. | हाडोळे ऋतुजा बलभीम | बी.व्होक ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ६. | चौंडे ओंकार राजकुमार | बी.व्होक ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ७. | जाधव शुभम संजय | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ८. | गुंडाळे सागर राजकुमार | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ९. | जाधव समर्थ संजय | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १०. | पवार सायली दत्तात्रय | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ११. | मुळे मानसी चंद्रकांत | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| १२. | पठाण सायमा सालारखा | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १३. | सावंत सुधीर श्रीकांत | एम.ए. मराठी द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १४. | सोनार वैष्णवी गोविंद | एम.ए. मराठी द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १५. | खटके सुजाता सुदाम | एम.ए. हिंदी द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १६. | लोले सरोजा तानाजी | एम.ए. लोकप्रशासन द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १७. | कदम निकिता उत्तमराव | एम.ए. लोकप्रशासन द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| १८. | कुलकर्णी ऋजा रविंद्र | एम.ए. संगीत द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| १९. | देव पद्मजा दामोधर | एम.ए. संगीत द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| २०. | कुलकर्णी भाग्यश्री उदयराव | एम.ए फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| २१. | आयतनबोने वैष्णवी जोतिराम | एम.ए. फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| २२. | मुसळे संध्या अर्जुन | एम.ए. फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |

## दयानंद कला महाविद्यालय, लातूर
## इ. १२ बोर्ड परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | नाव | गुणवत्ता यादीतील क्रमांक | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कु. शिंदे अस्मिता भास्कर | प्रथम (९४.५०%) | १०,०००/- |
| २. | कु. जोशी ईश्वर अमोद | द्वितीय | ७,०००/- |
| ३. | कु. बस्तापुरे गार्गी संतोष | तृतीय | ५,०००/- |

## शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये प्राध्यापकांच्या संशोधन कार्याचा अहवाल

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | संशोधन पत्रिकेतील लेख | चर्चा सत्रात सादर केलेले लेख | | | | चर्चासत्र अध्यक्ष/ विषय प्रवक्ता | पुस्तकात लेख प्रकाशित | | प्रकाशित पुस्तके | | संशोधक मार्गदर्शक विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यापीठ स्तरीय | राज्य स्तरीय | राष्ट्रीय | आंतरराष्ट्रीय | | चर्चासत्र स्मरणिकेत | अन्य पुस्तकात लेख | लेखक | संपादक | एम.फील | पीएच.डी. |
| १. | डॉ. एस. पी. गायकवाड | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| २. | डॉ. ए. बी. जोशी | २ | – | – | २ | १ | १ | २ | – | – | १ | – | – |
| ३. | डॉ. आर. एस. पारवे | २ | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| ४. | डॉ. एस. व्ही. साळुंके | १ | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – |
| ५. | डॉ. एस. पी. सांगोले | – | – | ३ | ३ | – | ४ | – | ३ | – | – | – | – |
| ६. | डॉ. पी. एस. सूर्यवंशी | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ |
| ७. | डॉ. बी. टी. घुटे | १ | – | १ | १ | १ | १ | – | – | – | – | – | – |
| ८. | डॉ. ए. एन. चव्हाण | ३ | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – |
| ९. | डॉ. एस. जी. पाटील | २ | – | – | – | – | – | – | ३ | – | – | – | – |
| १०. | डॉ. एस. एम. कदम | १ | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| ११. | डॉ. एम. एच. खंडागळे | २ | – | – | २ | – | १ | – | १ | – | – | – | – |
| १२. | डॉ. एन. एन. डोके | १ | – | – | – | १ | १ | – | २ | – | – | – | – |
| १३. | डॉ. आर. एम. खंदारे | १ | – | – | – | – | – | – | – | १ | – | – | – |
| १४. | डॉ. एन. आर. स्वामी | – | – | – | १ | २ | २ | – | १ | – | – | – | – |
| १५. | डॉ. एस. बी. राऊतराव | ३ | – | – | १ | १ | – | – | २ | – | – | – | – |

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## शिक्षक कर्मचारी वर्ग

### वरिष्ठ विभाग

**प्राचार्य**– डॉ. गायकवाड एस. पी.

**उपप्राचार्य**– डॉ. जोशी ए. बी.

**मराठी विभाग**

डॉ. सांगोले एस. पी.

डॉ. चव्हाण ए. एन.

डॉ. कदम. एस. एम.

**हिंदी विभाग**

डॉ. सूर्यवंशी पी. एस.

**इंग्रजी विभाग**

डॉ. खंडागळे एम. एच.

डॉ. डोके एन. एन.

डॉ. राऊतराव एस. बी.

**अर्थशास्त्र विभाग**

डॉ. घुटे बी. टी.

**लोकप्रशासन विभाग**

डॉ. खंदारे आर. एम.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. साळुंके एस. व्ही.

**इतिहास विभाग**

डॉ. पारवे आर. एस.

**समाजशास्त्र विभाग**

डॉ. गायकवाड एस. पी.

डॉ. जोशी ए. बी.

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. पाटील एस. जी.

**क्रीडा विभाग**

स्वामी एन. आर.

### कनिष्ठ विभाग

**उपप्राचार्य** डॉ. नागरगोजे डी. एन.

**पर्यवेक्षक** डॉ. दीक्षित पी. बी.

मराठी विभाग

प्रा. दशरथ ननावरे

**इंग्रजी विभाग**

प्रा. भालेराव ए. डी.

प्रा. गवरे एम. एम.

प्रा. भुरे ए. आर.

**हिंदी विभाग**

डॉ. बाहेती जी. वाय.

प्रा. भालेराव सिद्धार्थ

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. गाडवे एस. व्ही.

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. जोशी. डी. एम.

प्रा. क्षीरसागर एस. के.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. नागरगोजे डी. एन.

**इतिहास विभाग**

प्रा. कोमटवाड व्ही.डी.

प्रा. बनसोडे ए. ए.

**समाजशास्त्र विभाग**

प्रा. कोटे एस.एन.

प्रा. बुद्रुके जे. आर.

**क्रीडा विभाग**

डॉ. दीक्षित पी. बी.

**भूगोल विभाग**

डॉ. शिरूरे डी. एस.

**संगीत विभाग**

डॉ. कुलकर्णी डी. बी.

डॉ. जगदाळे एस. जी.

**संस्कृत विभाग**

प्रा. कारंजे एस. सी.

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## अनुदानित, विनाअनुदानित प्रशासकीय कर्मचारी

### अनुदानित प्रशासकीय कर्मचारी

| | |
|---|---|
| श्री. व्यास एस. आर. | अधीक्षक |
| श्री. देशपांडे व्ही. आर. | मुख्य लिपीक |
| श्री. आडसूळ बी. एस. | कनिष्ठ लघुलेखक |
| श्री. बाजपाई एम. एस. | वरिष्ठ लिपीक |
| श्री. ढोले डी. व्ही. | वरिष्ठ लिपीक |
| श्री. जोशी एस. व्ही. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. खोगरे व्ही. बी. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. शिंदे आर. बी. | कनिष्ठ लिपीक |
| श्रीमती सुरवसे ए. ए. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. ठाकूर व्ही. आय. | ग्रंथालय परिचर |
| श्रीमती दहिरे एन. आर. | ग्रंथालय परिचर |
| श्री. गिरबने डी. एम. | ग्रंथालय परिचर |
| श्री. गायकवाड एम. एस. | ग्रंथालय परिचर |
| श्रीमती आदमाने सी. एम. | सेवक |
| श्री. बैनबोने जी. व्ही. | सेवक |
| श्री. मुगळे पी. व्ही. | सेवक |
| श्रीमती जाधव आर. आर. | सेवक |
| श्रीमती सोनवणे एम. एम. | सेवक |

### विनाअनुदानित प्रशासकीय कर्मचारी

| | |
|---|---|
| श्री. इंडे डी. पी. | लिपिक |
| श्री. प्रयाग एच. डी. | लिपिक |
| श्री. वांगस्कर एस. एम. | लिपिक |
| श्री. सूर्यवंशी टी. व्ही. | लिपिक |
| कु.. सांडूर आर. बी. | लिपिक |
| श्री. अतनुरे डी. एम. | लिपिक |
| कु. शिंदे बी. एल. | लिपिक |
| श्री. उटगे ए. एम. | लिपिक |
| श्री. वाघमारे एन. पी. | कॉम्प्युटर ऑपरेटर |
| श्री. भालेराव आर. व्ही. | लिपिक |
| श्रीमती स्वामी एस. टी. | लिपिक |
| श्री. अकनगिरे पी. आर. | लिपीक |
| श्रीमती धर्माधिकारी ए. डी. | लिपीक |
| श्री. गायकवाड एस. आर. | लिपीक |
| श्री. पुजारी जी. के. | ग्रंथालय परिचर |
| श्री. शिंदे एच. एस. | प्र. परिचर |
| श्री. भोसले ए. ए. | प्र. परिचर |
| श्री. कोरे डी. जी. | सेवक |
| श्री. लागले एन. एम. | सेवक |
| श्रीमती आदमाने ए. एस. | सेवक |
| श्री. सूर्यवंशी एन. ए. | सेवक |
| श्री. आदमाने ए. बी. | सेवक |
| श्री. चौंडे डी. एस. | सेवक |
| श्रीमती मोरे एस. डी. | सेवक |
| श्री. गोदाम पी. बी. | सेवक |
| श्री. आदमाने एस. बी. | सेवक |
| श्रीमती शेंद्रे यु. डी. | सेवक |
| श्री. धडे ए. के. | सेवक |
| श्री. बचाटे के. ए. | सेवक |
| श्री. उटगे एस. जी. | सेवक |
| श्रीमती धावारे एस. आर. | सेवक |

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## अनुदानित व विनाअनुदानित कंत्राटी तत्त्वावरील प्राध्यापक २०२४-२५

**ॲनिमेशन विभाग**

प्रा.डॉ. शर्मा डी. एस.
प्रा. काकडे एस. व्ही.
प्रा. शेख आय. ए.
प्रा. पतंगे एस. पी.
प्रा. खोंडे पी. एस.
प्रा. शिराळे जे.एन.

**ॲडमिनिस्ट्रेटिव विभाग**

प्रा. जगताप वाय बी.
प्रा. मोरे एम. एस.
प्रा. दुधभाते यु. व्ही.
प्रा. जाधव जी. यु.
प्रा. पुरी बी. बी.
प्रा. धावारे पी. एस.

**फॅशन विभाग**

प्रा. लवंद एस. बी.
प्रा. पिपडा एच. एम.
प्रा. देशमुख पी. के.
प्रा. निलावार डी. एस.
प्रा. बिराजदार पी. व्ही.
प्रा. नाईक आर. जी.
प्रा. आग्रे एम. ए.
प्रा. कुलकर्णी बी. यु.
प्रा. कोरे एस. के.

**संगीत विभाग**

प्रा. पाडे शरद
प्रा. पवार सोमनाथ

**ग्रंथालय विभाग**

डॉ. पसारकर एस. सी. ग्रंथपाल

## अनुदानित व विनाअनुदानित घड्याळी तासिका तत्त्वावरील प्राध्यापक २०२४-२५

**मराठी विभाग**

प्रा. मोरे राजकुमार
प्रा. भुरे अंगद श्रीपती
प्रा.डॉ. गिराम विद्या
प्रा.डॉ. वाघमारे स्नेहा

**हिंदी विभाग**

डॉ. फड प्रणिता
डॉ. सुरकुटे शिवकांता
डॉ. आग्रे वनिता
डॉ. शेंडगे सुलभा
डॉ. सिरसट मीना
डॉ. घुमे मीना
प्रा. कांबळे वर्षा

**नाट्यशास्त्र विभाग**

प्रा. विजय मस्के

**भूगोल विभाग**

श्रीमती यादव शुभांगी
प्रा. शिंदे पल्लवी
डॉ. बिराजदार अश्लेषा

**इंग्रजी विभाग**

प्रा. पुजा मेडे
प्रा. तोडकर क्रांती
प्रा. स्वामी सुमित

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. पाठक स्वप्नजा

**इतिहास विभाग**

प्रा. आल्टे मनिषा

**राज्यशास्त्र विभाग**

प्रा. घायाळ गजानन

**लोकप्रशासन विभाग**

प्रा. समुद्रे स्फूर्ती
प्रा. धायगुडे आश्विनी
प्रा. शिंदे चैतन्य

**समाजशास्त्र विभाग**

प्रा.डॉ. आदमाने भाऊसाहेब

**फॅशन व ॲनिमेशन इंग्रजी विभाग**

प्रा. कोत्तावार सविता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

।। सा विद्या या विमुक्तये ।।

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## Certificate of Academic and Administrative Audit

The Academic Council of the S. R. T. M. University, Nanded on the recommendations of the duly constituted Committee for the inspection of Affiliated Colleges / Institutes for **Academic and Administrative Audit** as per **the provisions in Section 117 of the Maharashtra Public Universities Act, 2016,** is pleased to declare that

**Dayanand Arts College, Latur**

affiliated to this University has been **Audited** during the **Academic Year 2025-26, has scored** 718.00 **marks out of** 750 **(Percentage:** 95.73% **),** **and has been awarded with an overall Grade 'O'**

This Certificate is valid up June 29, 2029

**Place: Nanded**

**Date: June 30, 2026**

**Deputy Registrar**

**(Affiliation Section)**

CCode 301